TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192742
UNIVERSAL LIBRARY

गी-जीवन माला, पुष्प १ लें.

# बेसूर संगीत

कु. कुमुदिनी प्रभावळकर. बी. ए.

प्रकाशिका :
सौ. सुशीलाबाई कुलकर्णी,
संचालिका,
गृहिणी-जीवन माला
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
कोल्हापूर.

( डिसेंबर १९३८ )

मुद्रक,
वासुदेव नारायण ठव
श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापू

# — वाचण्यापूर्वीं —

आज महाराष्ट्राच्या पन्नास साठ वर्षांचा इतिहास पाहिला असता डॉ. आनंदीबाई जोशी, श्री. काशीबाई कानीटकर, श्री. रमाबाई रानडे, श्री. लक्ष्मीबाई टिळक यांनीं सुबोध व उपयुक्त लेखनाच्या द्वारें स्त्रीजीवनाच्या आकांक्षा, हेतु आणि प्रपंच यांवर चांगलाच प्रकाश पाडला आहे. त्याप्रमाणेंच श्री. सौ. कमळाबाईसाहेब किबे, श्री. सौ. आनंदीबाई शिर्के, श्री. सौ. शांताबाई नाशीककर, श्री. सौ. गिरजाबाई केळकर वगैरे विदुषींनींही पूर्वीच्या थोर स्त्रियांचें अनुकरण करून अनेक लेखांच्या द्वारें स्त्रीजीवनावर योग्य प्रकाश पाडला आहे. अशा विदुषींपैकींच या मालेतील प्रथम पुस्तकाच्या लेखिका कुमारी कुमुदिनी प्रभावळकर ह्या असून त्यांनीं आपल्या कुशल लेखणीने महाराष्ट्रीय महिलांना त्यांच्या उन्नतीला उपयोगी पडेल असें भरपूर मनोरंजक साहित्य पुरविलें आहे. तेव्हां त्या दृष्टीनें या पुस्तकाकडे पाहिल्यास प्रथमदर्शनींच आदर आणि उत्सुकता उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. मालेच्या चालकांनीं आरंभींच असें पुस्तक निवडल्याबद्दल प्रथम त्यांचें आणि लेखिकेचें अभिनंदनच केलें पाहिजे.

:

पुस्तकाचें नांव ' बेसूर संगीत ' असें असून ही एक सामाजिक कादंबरी आहे. कथानक साधेंच. भाषा सुबोध आणि सजावट सर्वांना सहज समजण्यासारखी. लेखिका कु. कुमिदिनी प्रभावळकर यांच्या आजवरच्या लेखनाचें वैशिष्ट्य या कथानकात स्पष्टपणानें दिसून येतें. त्यामुळें अल्पशिक्षितांनाही हें कथानक वाचतांना गोडी वाटेल.

अलीकडे समाजात विशेषत: सुशिक्षित स्त्रियांत अपत्यांचा मनोविकास, सहशिक्षणात मनाची होणारी अस्थिरता आणि भावी जीवनाचा रचला जाणारा पाया या गोष्टी अवघड होत चालल्या आहेत. मिळणारें स्वातंत्र्य आणि त्याचा केला जाणारा उपयोग यांत सुसूत्रपणा राहिलेला नाहीं. स्वातंत्र्य द्यावें हें तत्व मान्य केल्यावर त्या स्वातंत्र्याचा उपयोग योग्य

होत आहे कीं नाहीं हें पाहाण्यांत चूक होतां कामा नये. हें ध्यानांत न राहिल्यामुळें त्याला स्वैराचाराचें विकृत स्वरूप येत आहे. या सर्व गोष्टी लक्षांत आणून प्रभाकर, कुंदाताई आणि किशोरी हीं तीन पात्रें रंगविण्याचा प्रयत्न या लेखिकेनें कादंबरींत केला आहे.

'आदर्श संगोपनाची आदर्श पद्धत' हें प्रकरण या कादंबरीचा पाया आहे असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. यातील दहा नियम प्रत्येक मातेनें आपल्या लहान मुलांच्या बाबतींत उपयोगांत आणल्यास व त्याप्रमाणें तीं वागत असतांना त्यांच्यावर त्यांना नकळत पूर्ण लक्ष ठेविल्यास स्वैरत्वाला बराचसा आळा बसेल व मुलें स्वत्वाचें संरक्षण करण्यास समर्थ बनतील असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

सुनंदेचीं दोन मुलें प्रभाकर आणि विभाकर यांच्या बाबतींत त्यांच्या पालकांनीं कोणती चूक केली हे ध्यानात घेतल्यास कुंदाताईनें अमलात आणलेल्या मनोविकासशास्त्राचें महत्त्व प्रत्येक मातेला पटेल असें वाटतें.

मातेची जबाबदारी फार मोठी आहे. 'नशिबात असेल तसें होईल.' 'सटवीनें कपाळांत लिहिलें असेल तें चुकणार थोडेंच!' 'व्यक्ति तितक्या प्रकृति आहेतच!' 'सगळींच सारखीं कशीं होतील?' वगैरे विधानें सांगून व बोलून प्रत्येक माता आपल्यावरची जबाबदारी टाळूं पाहील तर ती तिची चूक ठरेल. आणि मग 'बाळपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल। घेईल ज्या गुणाला तो गुण मति वेष्ठुनीहि फांकेल.' हें तत्त्व खोटें मानावें लागेल. यासाठीं प्रत्येक मातेनें अपत्यसंभवाबरोबरच मुलांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करून विशेषतः या कादंबरींत लेखिकेनें सागितलेले दहा नियम समजून घेऊन मुलाचा न्यूनगंड घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मुलें लहान असतांना त्यांच्या विचारांना व आचारांना योग्य वळण लावण्याची अप्रत्यक्ष रीतीनें खबरदारी घेत असतानां तीं प्रौढ झाल्यावर आजकालच्या रूढीप्रमाणें सहशिक्षणाच्या वातावरणांत जाणार, तेथील शिक्षण, शिक्षक व स्वातंत्र्य यांचा त्यांच्या मनावर परिणाम होणार आणि वयसुलभ विचारांनीं व विकारांनीं त्यांचीं मनें हालली जाणार हें ध्यानांत

# – 'माले' चें हृद्गत –

स्त्री ही राष्ट्राची जननी आहे, जग हा आदिमातेचा संसार आहे, शक्तीवांचून युक्ति नाहीं, या तत्त्वाप्रमाणें पाहिल्यास खरी कार्यकर्ती स्त्रीच ठरते. अर्थात् तिच्यासाठीं उभारलेला संसार तिनेंच सांभाळला पाहिजे. घर सुधारलें कीं राष्ट्र सुधारतें. कारण राष्ट्र हें अनेक असंख्य घरांचा समुदाय आहे. या दृष्टीनें ही सर्व सत्ता गृहिणीकडेच येते. त्यामुळें त्याचें जीवन सुखप्रद होण्याकडे सर्वांनीं लक्ष देणें अगत्याचें आहे.

आजकाल स्त्रीशिक्षणाची मर्यादा वाढत चालली आहे हें सुचिन्ह मानलें जातें आणि तें योग्यही आहे; पण हें शिक्षण एकांगी नसावें: त्यात गृहिणीला योग्य अशा अनेक उपांगांचा अंतर्भाव होणें अवश्य आहे. राजकारण, समाजकारण, व्यापार, उद्योग, नोकरी, चाकरी या बाह्य व्यवसायांप्रमाणेंच गृहव्यवस्था, अपत्यसंगोपन, आरोग्य, स्वयंपाकशास्त्र, सुखप्रसूति, कलाकौशल्य, गृहसौख्य या अन्तर्व्यवसायाकडेही स्त्रियांनीं लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. आणि अशा प्रकारें अन्तर्बाह्य सुशिक्षित व्हावयाचें असेल तर स्त्रियांना गृहिणीजीवन सुखसंतोषकारक कसें होईल याबद्दलची काळजी घेणें अगत्याचें आहे.

आतां, ही काळजी घेण्याचें काम अनुभविक स्त्रियांनीं, विचारी विदुषींनीं, आणि तुलनात्मक अभ्यास केलेल्या महिलांनीं केल्यास तें जास्त सयुक्तिक व उपयुक्त ठरेल हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. आणि त्या दृष्टीनें आम्ही गृहिणी–जीवन पुस्तकमाला सुरू करून सर्व गृहिणींना मनोरंजनाबरोबरच गृहशिक्षणाचें ज्ञान देण्याचा नवीन उपक्रम सुरू करीत आहोंत. यापूर्वी असे प्रयत्न झाले नाहींत असें नाहीं. तसें पाहिलें तर अनेक स्त्री–पुरुषांनीं या महत्त्वाच्या विषयावर मराठी भाषेंत अनेक पुस्तकें लिहिलींहि आहेत; पण बदलत्या काळाप्रमाणें गृहिणी-जीवनांत वरचेवर होणारा

फेरबदल, येणाऱ्या अडचणी, वाटणारा अवघडपणा या गोष्टी लक्ष्यांत घेतां क्रमशः असा प्रयत्न चालू ठेवणेंच इष्ट वाटतें.

या दृष्टीनें आम्ही सुप्रसिद्ध कांदबरीकर्त्री कु. कुमुदिनी प्रभावळकर बी. ए. यांना विनंति केली असतां त्यांनीं ती आनंदानें मान्य करून अगदीं थोड्या वेळांत ही कांदबरी लिहून दिल्यामुळें आम्हांला आमचा हेतु इतक्या लवकर तडीस नेतां आला याबद्दल प्रथम आम्ही त्यांचे आभार मानतों.

त्याप्रमाणेंच सदर कांदबरीला प्रस्तावना लिहून देण्याची जबाबदारीची कामगिरी केल्याबद्दल मनोविश्लेषणात्मक कांदबऱ्या लिहिणारे श्री. प. स. देसाई यांचेहि आम्ही आभारी आहों.

तसेंच ही माला मूर्तदशेस आणण्यासाठीं ज्या ज्या व्यक्तींनीं निरनिराळ्या प्रकारें सहानुभूति दाखवून व प्रत्यक्ष कार्य करून आम्हांस मदत केली त्याबद्दल आम्हीं त्या सर्वांचे सदैव ऋणी आहों.

सौ. सुशीलाबाई कुलकर्णी,
संचालिका,
गृहिणी जीवन माला, कोल्हापूर.

आणून शिकलेली व अनुभविक माता आपल्या मुलीला ' जपून जा गडे जपून जा ' असें सांगण्याला विसरत नाहीं. किशोरीच्या आईनें—कुंदाताईनें—हें मातेचें कर्तव्य बजावलें होतें. तरी पण ' किशोरी बेचैन झाली ' आणि यामुळें—तारुण्याचा कैफ चढल्यामुळें—किशोरीच्या बाबतींत एक पेंचप्रसंग निर्माण झाला. या बाबतींत प्रभाकर आणि कुंदाताई या पतिपत्नींचीं भाषणें विशेषतः पृ. ४९ ते ५१ यातील त्यांचा विचारविनिमय प्रत्येक गृहिणीनें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. घाबरून जाणें, धाकदपटशा देणें, बेफिकीर होणें, एकमेकाना दोष देणें अगर कुढ्या मनानें वागून सवता सुभा करणें यापेक्षां हा विचारविनिमय आदर्श वाटतो. आजकाल हे असे पेंचप्रसंग नेहमींच निर्माण होऊं लागले आहेत आणि त्यांत किशोरनें तर फारच पुढें पाऊल टाकलें होतें.

' कर्तव्यांची जाणीव ' हें या कादंबरींतील प्रकरण बरेंच महत्त्वाचें आहे. लोकवार्तेचे फवारे, घरांत नसती धुसफुस, आणि न बोलकेपणाची मात्रा यापेक्षां शांत मनानें विचारविनिमय करून थिजलेल्या बर्फाचें पाणी करणें हें फार चांगलें. या बाबतींत लेखिकेनें अभिनदनीय कामगिरी केलेली आहे. गृहजीवनांत याचा फारच उपयोग होईल. ' किशोरचें यूसफअलीवर प्रेम जडतें.' केवढा हा जबरदस्त धक्का ! पण कुंदाताई घाबरली नाहीं. एकाद्या अवघड व नाजूक जागीं झालेले गळूं हळुवार हातानें पोटीस बांधून जसें तें फोडून टाकावें तसेंच या ठिकाणीं झालें. लहानपणापासून किशोरीच्या मनाची केलेली जपणूक यावेळीं उपयोगी पडली. नाहीं तर प्रकरण विकोपाला जाऊन राईचा पर्वत बनला असता आणि स्वातंत्र्याचा स्वैराचार बनून ' हें असें चालायचेंच ' असा त्याचा निकाल लागला असता.

आदर्शसंगोपनानंतरचा हा पेंचप्रसंग सोडवून मुलीला खऱ्या सुखाची दिशा दाखविण्यांत लेखिकेनें कुंदाताईला पुढें करून गृहिणींना जो हा सुगम मार्ग दाखविला आहे तो प्रशंसनीय वाटतो. आणि त्या दृष्टीनें या कादंबरीला महत्त्व असल्यामुळें ती घरोघर वाचली जावी असें कोणीही म्हणेल. गृहजीवनांत नेहमीं निर्माण होणारे निरनिराळे पेंचप्रसंग ' अशा

प्रकारें अभ्यासून ते हळुवार रीतीनें सोडवून दाखविण्याचा प्रयत्न विचारी विदुषींनीं केल्यास त्याचा उपयोग फार होणार आहे.

विकार आणि विचार यांचें द्वंद्व नेहमींच चालतें. तरी पण लहानपणापासूनच आदर्शसंगोपनाच्या दृष्टीनें या द्वंद्वाचा परिहार करण्याचा प्रयत्न अमलांत आणल्यास त्यांतील अवघडपणा नाहींसा होऊन मनावर झालेले योग्य संस्कार सद्विचारांना प्राधान्य देतात, आणि विकारांच्या आधीन होऊं देत नाहींत. किशोरीचें सुखपर्यवसायी जीवन व त्याला कारण झालेली कुंदाताई यांचें हें चरित्र लिहून लेखिकेनें हीच गोष्ट दाखवून दिली आहे.

या कादंबरींत उपमा, अलंकार, कोट्या वगैरे फारशा नसल्या तरी योग्य प्रसंगीं सहज म्हणून जी तत्त्वें आलीं आहेत तीं सुभाषिताप्रमाणें वाटतात व वास्तवता दाखवितात. त्यामुळें निरीक्षण आणि अनुभव यांत लेखिका बरीच पारंगत असावी अशी खात्री होते.

एकंदरींत कथानक लहानसेंच असलें तरी चटकदारपणा आणि उपयुक्त मनोरंजकता यांचा यांत भरपूर सांठा असल्यामुळें वाचतांना आनंद तर वाटतोच; पण वाचल्यानंतर ' यात घेण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत ' असे उद्गार निघतात. अर्थात् घरोघरीं विशेषतः गृहिणींनीं व मुलीबाळींनीं हें कथानक अवश्य वाचावें, त्यापासून त्यांना आपल्या जीवनांत पुष्कळ सुगमता आणतां येईल असें सांगितल्यावांचून माझ्यानें राहावत नाहीं.

रामकृष्ण निकेतन,<br>कोल्हापूर. १२।१२।३८.

प. स. देसाई.

तर तिसरी एकादी कुंदाताईंना आतांपासूनच मनाची तयारी करण्याचा उपदेश करी.

त्यांच्या ह्या असल्या आचरट शेजारधर्मांचा कुंदाताईंना भारी राग येई. पण हटकून त्या रागाचें रडण्यांत पर्यवसान होई.

व त्या बायका गेल्यावर आईच्या गळयांत पडून रडत त्या म्हणत, " आई, खरंच कां ग असं होणार? पांचामुखीं परमेश्वर म्हणतात ! पण—पण--ह्या बायका तर अशी वाईटच वाचा काढतात—आई—आई—ग . . "

ह्यावर सुभद्राबाई म्हणत, " कुंदे, असल्या बायकांच्या वाचेला कसलं महत्त्व देतेस? अग, जनावरांच्या जखमेला टोंचून पोट भरणाऱ्या कावळयांप्रमाणें दुसऱ्यांच्या मनाला बोंचून आपल्या जिभेची तृप्ति करणाऱ्या बायका ह्या ! त्यांचं बोलणं तूं काय मनाला लावून घेतेस ? अशी कावळ्याच्या शापानें कां कुठें ढोरं मरतात ? "

आईनें असें समाधान केलें ह्मणजे कुंदाताईंना तितकेंच बरें वाटे.

पण ' अतिस्नेहः पापशङ्की ' म्हणतात तेंच खरें ! सुधाकरविषयीं कुणीं वाईट वाचा काढलेली कुंदाताईंना खपत नव्हती, परंतु कुणीं चांगली वाचा काढली तरी ती खरी होईल काय अशी त्याना शंका वाटे.

आईनें समाधान करण्याचा प्रयत्न केल्यावेळीं अचूक त्यांच्या मनांत येई, " माथेरानला किशोर घटसर्पाच्या रोगानें आजारी झाली त्यावेळीं-सुद्धां आई आपल्याला असाच धीर देत होती. पण काय झालं ? शेवटीं ती पोर गेलीच ना ? मग आतां ........ "

पण हा शेवटला विचार कुंदाताईंना असह्य होई. तरीहि पुनः पुनः तो त्यांच्या मनात आल्यावांचून रहात नसे.

आज सुधाकराच्या तापाला एकविसावा दिवस होता. गेले दोन दिवस तो बेशुद्ध होता. व रात्रीं बाराच्या सुमाराला काय तो निर्णय होणार असें डॉक्टरनीं सांगितलें होतें.

गेल्या २।३ दिवसपासून कुंदाताईंचा धीर फारच गळला होता. शिवाय सुधाकर आतां कुणालाच ओळखत नसल्यामुळें त्यांना त्याच्या खोलींत बसवतहि नव्हते; त्यामुळें त्या शेजारच्या खोलींत बसून होत्या.

प्रभाकरपंत, त्यांचे डॉक्टर मित्र, बाबासाहेब आणि सुभद्राबाई एवढीं माणसें मात्र सुधाकराच्या जवळ बसून होतीं.

हल्लीं कुंदाताई अगदींच घाबरून गेल्या असल्यामुळें प्रभाकरपंतांनीं आपलें मन प्रयत्नपूर्वक तयार केलें होतें. ते वारंवार कुंदाताईंना धीर देत.

आतां रात्रीं ११ च्या सुमारास त्यांच्याच सांगण्यावरून कुंदाताई शेजारच्या खोलींतील पलंगावर पडल्या होत्या.

त्यांना झोंप मात्र येत नव्हती. जागरणामुळें, त्रासामुळें व अश्रु गाळण्यामुळें त्यांच्या डोळ्यांची भगभग होत होती, तरी ते मिटू शकत नव्हते.

त्या आतां एवढ्या थकून गेल्या होत्या कीं, आपल्या लाडक्या सुधाकराला जीवदान देण्याविषयीं ईश्वराची प्रार्थना करण्याची शक्तिसुद्धां अंगांत नव्हती.

आतां पलंगावर पडल्या पडल्या सुधाकराच्या वेळेला दिवस गेल्यापासूनच्या हरेक घटना त्यांच्या डोळ्यांसमोर नाचत होत्या.

—जन्मतांच तारस्वरानें टाहो फोडलेला सुधाकर, पुढें कुशीं परतणारा सुधाकर, हुंकार देणारा, हंसणारा सुधाकर, रांगणारा व नंतर घोडा करणारा व पुढें डुलत डुलत तोल सांवरीत चालणारा सुधाकर, बोबडे बोल बोलणारा, नंतर शाळेंत जाणारा व आतां मृत्युशय्येवर पडलेला, असे असंख्य सुधाकर त्यांच्या नजरेसमोर नाचत होते. व त्यांतील प्रत्येक सुधाकर त्यांना सारखाच प्रिय होता !—

कुंदाताईंना हुंदका आला. पण गेल्या तीन आठवड्यांतील शारीरिक व मानसिक त्रासामुळें त्या एवढ्या दमल्या होत्या कीं, त्यांच्या अंगांत रडण्याचें देखील त्राण नव्हतें.

हुंदक्याच्या आवेगासरशीं त्यांचें शरीर मात्र गद्गदून हाललें. व अंतकरणाला भेडसावणारें तें पुढील भयानक चित्र डोळ्यांना दिसूं नये म्हणून त्यांनीं डोळे झांकून घेतले.

लागोपाठ घडलेल्या अनेक जागरणामुळें तारवठलेल्या त्यांच्या डोळ्यांना त्यामुळें किंचित् बरें वाटलें.

९ नंतर कांहीं वेळ, सुमारें ५।१० मिनिटेंच त्यांना गुंगी आली

आणि एकदम त्या दचकून जाग्या झाल्या.

प्रभाकरपंत पलंगाजवळ उभे होते—व कुंदाताईच्या खांद्याला स्पर्श करून ते त्यांना हालवीत होते.

कुंदाताई ताड्कन् उठून बसल्या. त्याचें हृदय इतक्या जोरानें धडधडत होतें कीं, त्यासरशीं त्याचें अंगहि कंपित होत होतें.

कोरड्या पडलेल्या ओंठावरून जीभ फिरवीत त्या म्हणाल्या, "का–का का–य – झा–लं ? "

प्रभाकरपंत उत्तरले, " आपल्या सुधाकराला किनई झोंप लागली आहे."

हे शब्द ऐकतांच कुंदाताई पलंगावरून उठल्या व धडपडत दाराकडे निघाल्या.

त्याबरोबर त्यांच्याजवळ जात प्रभाकरपंत म्हणाले, " असं काय करतेस कुंदे ? सुधाकर झोंपला आहे. त्याची झोंपमोड होईल ना अशानें. तूं सध्यां तिकडे जाऊं नकोस–"

" आं ? त्याची झोंपमोड होईल ? " अर्धवट रडत, अर्धवट हंसत कुंदाताईनीं प्रश्न केला.

" होय. त्याला कशी शांत, सुरेख झोंप लागली आहे. आतां त्याच्या जीवाला भय नाहीं. आतां उतार पडणार त्याच्या दुखण्याला. "

हें ऐकून कुंदाताईनीं एक खोल निःश्वास घेतला. बिचारीच्या त्रस्त मेंदूला मग्रां वाटलें कीं, आपल्या बाळाला झोंप–काळझोंप–लागली आहे !

त्यामुळें प्रभाकरपंतांचे आतांचे हे शब्द ऐकतांच त्यांना अपरिमित आनंद झाला !

सकृतज्ञ समाधानानें देवाला नमस्कार करण्यासाठीं तिनें हात जोडले व तशा स्थितींतच घेरी येऊन त्या खालीं पडणार तोंच प्रभाकरपंतांनीं सांवरलें !

## ५ : : मृत्युपत्रांची मौज !

संकट भीतिदायक असतें, इतकेंच नव्हे तर त्यांतून पार पडल्यानंतर त्याविषयींचा उल्लेखसुद्धां मनाला अस्वस्थ करितो; परंतु त्या संकटावर विजय मिळविल्याचा आनंद आधाराला असल्यामुळें ही अस्वस्थता तात्पुरतीच असते !

सुधाकराच्या आजाराविषयीं असेंच झालें. त्याच्या आजाराला उतार पडूं लागल्यानंतर त्या भयंकर दिवसांविषयीं आपल्या आक्काकडे किंवा सुशीलाताई, हेमलता व मिराबाई ह्या प्रिय मैत्रिणींकडे बोलताना कुंदाताईंना मधूनच जरी गहिंवरून येई तरी त्यांच्या मुद्रेवर संकटमुक्ततेचें समाधान विलसत असे !

शिवाय ह्या आजारांत एक दुहेरी मौज घडल्यामुळें त्याविषयीं इतराना सांगतेवेळीं तर कुंदाताईंना आणखीच आनंद वाटे.

ती मौज अशी कीं, सुधाकराच्या तापाला साधारण १२।१५ दिवस लोटल्यानंतर एके दिवशीं सर्व मंडळी त्याच्या खोलींत बसलेली असतांना सुधाकर कुंदाताईंना म्हणाला, " आई, तुला एक गंमत सांगूं. "

आजारानें कंटाळल्यामुळें सुधाकर हल्लीं फारसें बोलत नसे. तेव्हां तो आतां आपण होऊन हें बोलताच कुंदाताईंना फार बरें वाटलें व प्रेमानें पुढें वांकत त्या म्हणाल्या, " काय गंमत सांगतोस, सोन्या ? "

" आई, मी किनई मृत्युपत्र केलंय ग–"

सुधाकराच्या ह्या अकल्पित शब्दांनीं सर्वांनाच कसेसें झालें. व पुढल्या

अशुभाची ही सांवली तर नसेल ना, असें वाटून कुंदाताईचें तोंड गोरेंमोरें झालें.

हंसण्याचा खोटा प्रयत्न करीत त्या म्हणाल्या, बाळ, असं कांहीं तरी बोलूं नये."

" मग आई, आजोबांनीं कसं मृत्युपत्र केलं ग. परवांच मला त्यांनीं सांगितलं कीं, आपलं सोन्याचं घड्याळ नि छडा मला देण्याबद्दल त्यांनीं आपल्या मृत्युपत्रात लिहिलं आहे."

आणि ही घटना अगदीं खरी होती.

दोन दिवसांपूर्वी सुधाकराचा वेळ जाण्यासाठीं त्याच्याकडे कांहीं बाही बोलतांना बाबासाहेबांनीं खरोखरीच त्याला हें सांगितलें होतें.

" तेव्हां आई," सुधाकर पुढें म्हणाला, " माझी छऱ्याची बंदूक मीं आजोबांना देणार, ताईला माझी सायकल, व विभादादाला माझा मेकॅनो देणार. पण आई, आपल्या वृंदेला मीं काय देऊं ग?"

कुंदाताई गप्प होत्या. सुधाकराच्या ह्या बडबडण्याला आळा कसा घालावा तेंच त्याना कळेना.

एवढ्यात सुधाकरच पुनः म्हणाला, " हो, हो, आई, वृंदेला मीं माझं खेळांतलं तें मोठं, केसाळ आस्वल देईन."

कुंदाताईच्या प्रयत्नांना न जुमानतां त्यांच्या डोळयांत अश्रू उभे राहिले.

तेव्हां ही गोष्ट आपल्याला कांहींच महत्त्वाची वाटत नाहीं, ह्यांत वस्तुतः भिण्यासारखें कांहीं नाहीं असें दर्शविण्यासाठीं बाबासाहेबांनीं म्हटलें, " आणि लबाडा, तुझ्या आजीला रे काय देणार?"

चौघां नातवंडांत सुभद्राबाईंचा सुधाकर विशेष लाडका होता. आत क्षणभर विचार करून तो लबाड उत्तरला, " आजीला माझा मुका."

" आणि आईबाबाना?" सुभद्राबाईनीं प्रश्न केला.

" त्यांना मी आहेंच कीं."

सुधाकराच्या ह्या शेवटल्या उत्तरानें कुंदाताईंना जरा बरें वाटलें. आणि आतां सुधाकर आजारांतून बरा झाल्यावर ही हकीकत सर्वांना सांगतांना त्यांना निर्भेळ आनंद वाटे.

सुधाकराच्या मृत्युपत्राच्या ह्या मौजेंतून दुसरी एक मौज उत्पन्न झाली.

कुंदाताईनीं सुधाकराच्या आजारांत किशोरला आपल्या माहेरीं धाडल्यामुळें सुभद्राबाई व बाबासाहेब हीं दोघेंहि कुंदाताईच्या घरीं येऊन राहूं शकलीं नाहींत. सुभद्राबाई एकट्याच येऊन राहिल्या व बाबासाहेब आपल्या घरीं किशोरसह होते.

रोज सकाळीं व संध्याकाळीं मात्र ते सुधाकराचा समाचार घेऊन येत.

ज्या दिवशीं सुधाकराच्या मृत्युपत्राची ही मौज घडली त्या दिवशीं घरीं आल्यावर बाबासाहेबांनीं ती हकीकत किशोरला सांगितली.

आणि दुसऱ्या दिवशीं किशोरनें आपलें मृत्युपत्र तयार केलें.

ह्यांत मुख्य गंमत म्हणजे मृत्युपत्र ह्या शब्दाचा खरा अर्थ सुधाकराला किंवा किशोरला ठाऊकच नव्हता.

मृत्युपत्र म्हणजे एक तऱ्हेचें बक्षीसपत्र असेंच तीं दोघें समजत होतीं. ह्या पत्रान्वयें आपल्या वस्तू दुसऱ्याला द्यावयाच्या एवढीच त्यांची कल्पना!

आणि सुधाकर जात्याच उदारवृत्तीचा असल्यामुळें तो आपल्या आवडत्या वस्तूसुद्धां दुसऱ्यांना द्यावयास तयार झाला.

पण किशोरची वृत्ति जरा वेगळी होती. आपल्याला नको असलेल्या, टाकाऊ वस्तू मृत्युपत्रान्वयें दुसऱ्याला द्यावयाच्या असाच अर्थ तिनें धरला. व खालील तर्जुमा लिहून काढला.

किशोर प्रभाकर जोगळेकर हिनें केलेलें मृत्युपत्र.

१ आईला—माझ्या गळयांतील सांखळीमधील लॉकेट.

२ बाबांना—त्यांनीं दोन वर्षांपूर्वी मला दिलेलें फाउंटनपेन—यंदा दिलेलें नव्हे.

३ } आजीला-माझी शिवणकामाची पेटी. त्यांतील सामानाचा
४ } आजीला विशेष उपयोग नसल्यामुळें तें सर्व कुंदाताईला.

५ आजोबांना—हस्तीदंती पेपरकटर.

६ सुधाकराला—माझी बाजाची पेटी वाजविण्यापुरती, बक्षीस नव्हे.

७ वृंदेला—माझ्या नव्या रिबन्सपैकीं तीन.

८ प्रभाकराला—माझा कांचेचा सुंदर फ्लॉवर पॉट.

९ विभाकराला—कांहीं नाहीं, कारण तो मला चिडवितो.

किशोरचें हें मृत्युपत्र वाचतांच बाबासाहेबांना अनावर हसूं लोटलें. आपल्याला हव्या असलेल्या व चांगल्या वाटणाऱ्या वस्तू इतरांना न देण्याची पोरीनें किती खबरदारी घेतली होती !

सुधाकराच्या मृत्युपत्रामुळें सर्वांना पहिल्यांदा कसेंतरीच वाटलें व नंतर कौतुक वाटलें आणि किशोरच्या ह्या मृत्युपत्राची सर्वांनाच फार गंमत वाटली !

एकंदरींत संकट मोठें आलें तरी देवानेंच तें निभावून नेल्यामुळें सुधाकराच्या आजाराइतकीच आजारांतील ह्या मृत्युपत्रांच्या मौजेची सर्वांना आठवण राहिली.

सुधाकराच्या ह्या आजारापासून मात्र किशोरमध्यें खूपच फरक झाला. तिला जवळजवळ सव्वा महिना आजोळीं रहावें लागलें. शेवटल्या आठ दिवसांत कुंदाताई व प्रभाकरपंत दिवसांतून एकदां जरी तिला भेटून जात तरी अष्टौप्रहर तिच्या आजूबाजूला असणारा सुधाकर इतक्या अवधींत तिला मुळींच न दिसल्यामुळें तिला फार चुकल्यासारखें वाटूं लागलें.

आजोळीं रहाण्याच्या नवीनपणाला भुलल्यानें प्रारंभीं तिला आनंद वाटला होता. पण आतां सक्तीनें महिना, सवा महिना आजोळीं रहावें लागतांच तिला आपल्या घराची फार ओढ वाटूं लागली.

व सुधाकर बरा झाल्यानंतर ती जेव्हां घरीं रहावयास आली तेव्हां कुंदाताईना तिच्या वागण्यांत फरक दिसून आला. आपला भाऊ, आई, वडील आणि आपलें घर ह्यांबद्दल तिला कितीतरी अधिक प्रेम व आपुलकी वाटूं लागली आहे हें पहातांच कुंदाताईना फार समाधान वाटलें; व किशोरच्या भावी काळासंबंधीं त्यांना जी अज्ञात आशंका वाटत होती ती जरा कमी झाली.

## ६ : : नवी पिढी !

कुंदाताईंनीं बालमानसशास्त्राचा अभ्यास पुष्कळ केला असल्यामुळें व जात्याच त्यांना त्याची फार आवड असल्यामुळें स्वतःच्या मुलांच्या शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकासाकडे तर त्या अतिशय लक्ष पुरवीत असतच, पण आपल्या मैत्रिणींच्या आणि विशेषतः आक्काच्या मुलांकडेहि त्या शक्य तों लक्ष्य देत.

सुनंदाआक्काचे मुलगे, सुशीलाताईच्या मुली व हेमाची मुलगी ह्यांच्या वर त्यांची नजर असेच पण त्यांतल्या त्यांत सुनंदाच्या आक्काच्या प्रभाकरावर त्यांची विशेष नजर असे.

त्यांनींच मोठ्या आवडीनें त्याचें 'प्रभाकर' हें आपलें आवडतें नांव ठेवलें होतें. व तोच त्याच्या 'सरस्वतीमंदिरांतील' पहिला विद्यार्थी होता. शिवाय स्वभावानें प्रभाकर फार प्रेमळ, गरीब व भावनाप्रवण होता. ह्या सर्व कारणांमुळें कुंदाताईंची त्याच्यावर विशेष माया होती.

प्रभाकर शिकण्यांत हुषार होता. पण सुनंदाआक्काच्या चालढकली स्वभावामुळें त्याच्या शिक्षणाची जरा हेळसांडच झाली.

आक्काचा धाकटा दीर नागपुरांतच स्थायिक झाल्यामुळें त्यांच्या सासूबाई वर्षांतून सहा महिने तरी तिकडेच असत. व मग धाकट्या जावेच्या मुलांविषयीं त्यांना त्यामुळें अधिक प्रेम व लळा वाटेल ह्या भयानें प्रभाकराची शाळा खुशाल चुकवून आक्का मुलांसह नागपूरला २।२, ४।४ महिने जाऊन रहात.

त्याचा परिणाम असा झाला कीं प्रभाकर वयाच्या १९व्या वर्षीं मॅट्रिक झाला.

प्रभाकर अंगापिंडानें चांगला दांडगा होता. त्या दृष्टीनें तो मुळींसुद्धां आपल्या वडिलांच्या वळणावर गेला नव्हता. आणि ह्याच एका दृष्टीनें नव्हे तर इतर कोणत्याहि बाबतींत त्याचें भाऊसाहेबांशीं साम्य नव्हतें.

त्याचा स्वभाव भाऊसाहेबांच्या स्वभावाच्या अगदीं विरुद्ध म्हणजे नम्र, प्रेमळ व शांत होता. आणि त्याची बुद्धिहि भाऊसाहेबांच्या बुद्धीहून कितीतरी अधिक तीव्र होती.

तेव्हां तो भाऊसाहेबांच्या वळणावर मुळींसुद्धां न गेल्यामुळेंच बहुधा कुंदाताईंचा इतका आवडता झाला असणार !

धाकट्या विभाकरांत मात्र वडिलांचें व आईचेंहि खूप साम्य होतें. त्या दोघांप्रमाणें त्याची वृत्ति घमेंडखोर होती व स्वभावहि कांहींसा तऱ्हेवाईक होता. त्याचप्रमाणें तो भाऊसाहेबांसारखाच बोलका होता व त्याला तशीच युरोपिअन् पोषाखाची अति आवड होती !

त्याच्यामध्यें आपल्या उभयतांचें स्वभावसाम्य असल्यामुळेंच कीं काय तो वडिलांचा व आईचा फार लाडका होता. त्या मानानें प्रभाकर त्यांचा नावडताच होता.

कुंदाताईंची किशोर दिसावयाला सुंदर होती. थेट कुंदाताईंचा नमुना ! तोच गौरवर्ण—नाकडोळे तसेच रेंखल्यासारखे ! तेच कुरळे केंस व तीच नाजुक जिवणी ?

म्हणजे कुंदाताई १५।१६ वर्षांच्या वयावर जशी दिसे तशीच थेट किशोर आज त्या वयाला दिसत होती !

मात्र कुंदाताईंचा मुद्राविर्भाव सदैव शांत, प्रसन्न असे. आणि किशोरच्या मुद्रेवर कधीं कधीं तिच्या हटवादी स्वभावाची काळी छाया पसरलेली असे व त्या त्या वेळीं तिच्यामध्यें तिच्या मावशीचें—सुनंदाआक्काचें साम्य दिसे.

बाकी हंसतांना मात्र किशोर म्हणजे कुंदाताईंची छोटी प्रतिमाच भासे !

खरंच, ईश्वर केवढा कुशल कारागीर आहे बरं ! नऊ महिने गर्भ-

वासांत असणाऱ्या बालकामध्यें आईचें किंवा वडिलांचें कसें अचूक रूप-साम्य किंवा स्वभावसाम्य तो निर्माण करितो! केवढी अजब घटना ही!

किशोरमध्यें आईचें रूपसाम्य होतें तसें सुधाकरामध्यें वडिलांचें स्वभाव-साम्य होतें.

सुधाकराचा स्वभाव प्रभाकरपंतासारखाच विनोदी प्रेमळ, व मनमोकळा होता. त्याच्या चेहऱ्यांत बरीक आईवडिलांच्या रूपाचें मजेशीर मिश्रण होतें.

वडिलांप्रमाणें भव्य कपाळ व निमगोरा वर्ण आणि आईसारखे कुरळे केंस व हंसरे, टपोरे डोळे अशा चेहऱ्याचा सुधाकर मोठा उमदा दिसे!

टायफॉइड्मधून उठल्यापासून तो अंगानेंहि खूप सुधारला होता. पूर्वी नाजुकसर दिसणारा तो आतां दांडगा दिसूं लागला!

सुशीलाताईची थोरली मुलगी कुंदा दिसावयाला साधारण होती. तिनें आईवडिलांच्या रूपांतील अवगुण तेवढे अचूक उचलले होते. वडिलांचा काळा वर्ण व उंच कपाळ, आणि आईचें बसकें नाक व रुंद जिवणी असा मिलाफ झाल्यामुळें ती अगदीं चारचौघीसारखी रूपानें सामान्य होती.

धाकटी वृंदा दिसावयाला ह्याच फर्मासाची असली तरी नीटनेटकेपणा व रुचियुक्त पोषाक ह्याची जोड दिल्यामुळें ती खूप उठून दिसे. बारा हजारांचे लाख करणाऱ्या व्यवहारचतुर व्यापाऱ्याप्रमाणें ती आपल्या सामान्य रूपाला सुंदर स्वरूपाचें तेज आणी.

सुशिलाताईनें आपल्या मुलींवर खूप दाब ठेविला असल्यामुळें त्या स्वभावानें गरीब व सालस होत्या. शिवाय आईच्या शिस्तीविरुद्ध बंड पुकारण्याइतकी ती शिस्त अति कडक किंवा त्रासदायक नव्हती.

व त्यामुळें हेमलता आपल्या मुलीचे जे अति लाड करी त्यापेक्षां सुशीलाताई आपल्या मुलींवर ठेवीत असलेला कडक दाबच अधिक श्रेय-स्कर असें कुंदाताईंना वाटे.

कारण कडक दाबामुळें सुशीलाताईच्या मुली जरी गरीब स्वभावाच्या व साध्या वळणाच्या झाल्या तरी अतिलाडांमुळें बिघडलेल्या विजयेपेक्षां तें [illegible] असेंच कुंदाताईंना वाटे.

विजया अति लाडांमुळें फारच शेफारली होती. त्याचप्रमाणें तिला टिके, भांगले व नखरे करण्याची अति आवड होती.

लहान असे तोंवर हें सारं शोभलं. पण तरुण वयांत ह्या बाबतींत काळजी घ्यावी तितकी थोडीच असते.

निसरड्या दरडीवरून चालतांना घ्यावी लागते तेवढी काळजी मुलींनीं ह्या वयांत घेतली पाहिजे !

पण कांहीं मुलींना हें भान रहात नाहीं. व अज्ञानामुळें, औदासिन्या-मुळें किंवा अति लाडांमुळें कांहीं माता आपल्या मुलींना तारुण्याच्या दरडीवरून जपून जाण्याचा इशारा द्यावयास चुकतात ! आणि मग—

मग काय ? जरा पाय चुकला कीं आधीं शीलावर ओरखडे येतात ! —आणि कांहीं वेळीं तर एवढ्यावरसुद्धां थांबत नाहीं. शील म्हणजे जणूं कांचेचें नाजुक भांडें !—धक्का बसला कीं खळकन् फुटूनच जातें तें !

वास्तविक विजया सध्यां सारी तेराच वर्षांची होती. पण तिच्या-सारख्या तीव्र बुद्धीच्या मुलीला हेमलतेनें वेळेआधींच इशारा देणें योग्य होतें !

मात्र, आई व वडील विजयेवर जो सतत प्रेमाचा वर्षाव करीत होती त्या वर्षावाचें तिच्याभोंवतीं आपोआपच एक तऱ्हेचें कुंपण तयार झालें होतें. आणि विजया एरवीं स्वच्छंदी, लहरी असली तरी तिचें आपल्या आईवडिलांवर फार प्रेम होतें. त्यामुळें आपल्या भोंवतींचें हें मातृपितृ-प्रेमाचें कुंपण तुडवून स्वैर धाव मारणें तिला जरा कठिण वाटलें असतें !—

असे हे नव्या पिढींतील सात घटक होते ! आणि भावी काळांत आपल्या समाजरचनेला ते साहाय्यक होणार होते कीं विघातक होणार होते ?

तें आधीं कुणाला कळणार ? फार काय, कांहीं वेळीं तर असें वाटतें कीं प्रत्येक मानवी प्राण्याचें भवितव्य ईश्वराला तरी ठाऊक असतें कीं, नाहीं कोण जाणे !

कदाचित्, चावी दिलेली मोटर जशी हव्या त्या दिशेला जाते, मध्यें अडथळा येतांच भलत्या दिशेला वळते व चावी जेव्हां आणि जिथें संपेल तिथें थांबते ; तसेंच ईश्वर मनुष्यप्राण्यांच्या बाबतींत करीत असेल !

मनुष्यप्राण्यांना तो प्रेरणा मात्र देत असेल. नंतर ते प्राणी आपआपल्या शक्त्यनुसार जगांत वावरत असतील व शक्ति नष्ट होतांच कायमचे थांबत असतील ?– कुणी सांगावें ?

म्हणजे ' दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम् ' असें जें कर्णानें म्हटलें तें हरेक माणसाच्या बाबतींतहि खरें ठरेल !

अमुक एका कुलांत जन्म देणें तेवढें दैवाधीन आहे. चावी देऊन ईश्वर मनुष्यांना गति तेवढी देतो ! पुढला प्रवास मानवप्राणी आपापल्या बुद्धय-नुसार करितात !

म्हणजे आपल्या बऱ्यावाईट कृत्यांना मनुष्य स्वतःच जबाबदार असतो !

असें विधान करणें म्हणजे दैववादाला गुंडाळून ठेवून प्रयत्नवादाचा पुरस्कार करणें आहे असें पुष्कळांना वाटेल ! पण दैववादी तरी काय करितात ?

चांगली, मनासारखी घटना घडली कीं, ती मीं केली व मनाविरुद्ध घटना घडली कीं, ती दैवानें वा देवानें केली असें म्हणणारे दैववादीसुद्धां प्रयत्नवादाचाच पुरस्कार नाहीं कां करीत ?

तेव्हां सध्यांच्या बौद्धिक युगांत तरी दैववादापेक्षां प्रयत्नवादच श्रेष्ठ धरला पाहिजे !

## ७ : : दिवस जातां जातां—

इंटरच्या परीक्षेच्या वेळींच प्रभाकर आजारी पडल्यामुळें त्याचें आणखी एक वर्ष फुकट गेलें. मिळून यंदा किशोर व विभाकर मॅट्रिकला बसलीं आणि तो बी. ए. ला बसला.

सुधाकर वास्तविक किशोरपेक्षां तीन वर्षांनीं लहान, पण त्याची बुद्धिमत्ता फार तीव्र असल्यामुळें शाळेंतील मास्तरांच्या आश्वासनयुक्त शिफारसीवरून त्यानें दोन इयत्ता गाळल्या व आतां आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षी तो मॅट्रिकच्या वर्गात गेला.

वय लहान असूनहि ह्या वाढत्या अभ्यासाचा त्याच्यावर यत्किंचित्‌हि वाईट परिणाम झाला नाहीं. कारण फक्त अभ्यासच करीत राहिल्यानें मुलांच्या बुद्धीची जरी वाढ झाली तरी त्यायोगानें त्यांची शारीरिक व मानसिक वाढ व्हावी तशी होत नाहीं, असें कुंदाताईचें मत होतें.

त्यामुळें मुलांच्या अभ्यासावर त्या जसें लक्ष ठेवीत तसें मुलें नियमित व्यायाम करितात कीं नाहीं ह्याकडेहि त्या लक्ष पुरवीत व मुलांचें मन सदोदित प्रसन्न रहावें म्हणून त्यांना कांहीं तरी करमणुकीचे खेळ खेळण्यालाहि त्या उत्तेजन देत. इतकेंच नव्हे तर आपण स्वतः त्या त्यांच्याबरोबर खेळत.

नियमित व्यायामामुळें शरीर निरोगी रहातें व त्यायोगें बुद्धि उत्तम विकसित होऊं शकते. त्याचप्रमाणें प्रसन्न मनाचा बुद्धीवर कितीतरी सुपरिणाम होतो हें कुंदाताईनीं मुलांच्या मनावर चांगलें ठसविलें होतें.

त्यामुळें आपल्या प्रकृतीची मुळींहि हयगय न करितां किंवा अभ्यासाचा अति ताण न वाटतां सुधाकर भराभर शिकत होता.

व तें पाहून कुंदाताईंना आणि प्रभाकरपंतांना साहजिकच कौतुक वाटे. पण सुधाकराच्या तोंडावर वारंवार कौतुक, किंवा स्तुति तीं दोघेहि करीत नसत. त्यामुळें सुधाकर घमेंडखोर बनेल हें तर एक कारण होतेंच. पण दुसरें असें कीं, किशोरची बुद्धि तितकी तीव्र नसल्यामुळें सुधाकराचीच स्तुति केली तर लहानपणीं तिला त्याच्याविषयीं वाटणारा अकारण द्वेषभाव पुनः वर डोकं काढील असें त्यांना भय वाटे.

आणि हें अगदीं रास्त होतें. कारण आईबापांनीं मुलांना वाढवितांना योग्य काळजी न घेतल्यामुळें भावंडाभावंडांत वैरभाव व द्वेषबुद्धि उत्पन्न झाल्याचीं कितीतरी उदाहरणें आहेत !

आणि किशोरला तर बाळपणापासूनच सुधाकराविषयीं द्वेष वाटत असे !

पण कुंदाताईंनीं व प्रभाकरपंतांनीं खूप मेहेनत करून किशोरच्या मनांतील ती द्वेषबुद्धि नाहींशी केली, व मौज अशी कीं, आतां स्वतः किशोर अगदीं निर्मत्सर बुद्धीनें सुधाकराचें कौतुक करी.

'बाळपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल' असें कुंदाताईंनीं हेमलतेला जें सांगितलें तें अगदीं खरें आहे. पूर्वी किशोरची बुद्धि भलत्या दिशेला वाकूं पहात होती. पण तिच्या आईवडिलांनीं योग्य मशागत करून तिच्या 'कोमल तरुतुल्य' बुद्धीला योग्य वळण लाविलें. व त्याचा उत्कृष्ट परिणाम असा झाला कीं, किशोरला आपल्या धाकट्या भावाबद्दल सप्रेम कौतुक वाटूं लागलें व सुधाकराला आपल्या ताईबद्दल सादर प्रेम वाटूं लागलें !

किशोर मॅट्रिकला बसली. पास झाल्यानंतर अर्थातूच ती 'कॉलेजांत जाणार. म्हणजे आतां तिच्या आयुष्याला वेगळें वळण लागणार !— ह्या विचाराबरोबर कुंदाताईंच्या मनांत तिच्या लग्नाबद्दल—तिच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या घटनेबद्दल—विचार येऊं लागले.

व एक दिवस त्या प्रभाकरपंतांना म्हणाल्या "खरंच, कालस्य त्वरिता गतिः' असं म्हणतात तें खोटें नाहीं. आपली किशोर नुकती एवढीशी

पोर होती. कालपरवां तिच्या खस्ता मीं काढल्या असं मला अजुनि वाटतं. पण वास्तविक केवढी मोठी झाली ती आतां! आणखी २।४ वर्षांत तिचं लग्नसुद्धां होईल!"

"बरा प्रश्न काढलास, कुंदे. आपल्या किशोरीनें कुठल्या जातीचा नवरा पसंत करावा असं वाटतं तुला?" प्रभाकरपंतांनीं विचारलें!

व क्षणाचाहि विचार न करितां कुंदाताई उत्तरल्या, "कायस्थ जातीचा."

त्याबरोबर कृत्रिम कोपानें प्रभाकरपंत म्हणाले, अस्सं?

म्हणजे स्वतः कायस्थ जातीचा नवरा न केल्याबद्दल तुला पश्चात्ताप वाटतो आहे असं दिसतं तर."

"इश्श! कांहीं तरीच चेष्टा!" दिलगिरीपूर्वक हंसत कुंदाताई म्हणाल्या, "मीं त्या अर्थानें बोललें वाटतं? पण तसं कशाला? आपण किनई वांटेच करूं या. कुंदेनें कायस्थ नवरा करावा नि सुधाकरानें कोंकणस्थ बायको करावी."

"वाः वाः! तूं वांटे खूप करशील. पण मुलांनीं तें ऐकलं पाहिजे ना? बरं, तें राहूं दे आतां. पण असं सांग, कुंदेनें कायस्थ नवरा पसंत करावा असें तूं सहजच म्हणालीस कीं एखादा विशिष्ट मुलगा खरोखरीच तुझ्या डोऱ्यांत आहे?"

प्रभाकरपंतांनीं असा स्पष्ट प्रश्न विचारतांच कुंदाताई जरा गडबडल्या व हळूंच म्हणाल्या, "आपला तर्क बरोबर आहे. आक्काचा प्रभाकर किनई मला फार आवडतो. पण—"

"पण तो किशोरचा सख्खा मावसभाऊ लागतो, नि आपल्यांत मावस भावंडांचें लग्न होण्याचा प्रघात नाहीं. असंच कीं नाहीं?"

"अंहं, ती कांहीं मोठीशी अडचण नाहीं. आज काल परजातीमध्यें जर सरसहा विवाह होतात तर मावसभावंडांच्या विवाहाला कसली आली आहे अडचण. माझी अडचण वेगळीच आहे."

"म्हणजे? किशोरला प्रभाकर पसंत पडेल कीं नाहीं, ही होय?"

"हं, तें तर आहेच. कारण किशोर आहे जरा लहरी नि हटवादी.

ती होऊन त्याच्यावर प्रेम करूं लागली तर ठीक. पण ही अडचणसुद्धां आतां माझ्या मनांत नव्हती. मला आपलं असं वाटलं कीं—म्हणजे, हें पहा, आपलं उभयतांचं एकमेकांवर प्रेम जडलं होतं म्हणून मीं मोठ्या आवडीनें आक्काच्या मुलाचं नांव ' प्रभाकर ' ठेवलं नि तसंच आपणहि सुशीलेच्या मुलीचं नांव ' कुंदा ' ठेविलं. व त्याच वेळीं सुशीलेनें बोलून टाकलं कीं, ह्या पिढींतील कुंदा प्रभाकराचा प्रीतिविवाह जुळला तसा पुढील पिढींतील कुंदा प्रभाकराचाहि कदाचित् जुळेल! बरं, आक्काचा प्रभाकर हुषार आहे, सुस्वभावी आहे, श्रीमंत आहे. तेव्हां खरोखरीच तो आपला जांवई व्हावा अशी जर सुशीलेची इच्छा असेल, तर त्यांत आपण कसा बरं खो घालावयाचा?"

शाबास! किती सोज्वळ विचार आहेत तुझे! मैत्रिणीच्या मुलीच्या सुखाआड येणं तुला गैर वाटलं. आणि कित्येक माणसं तर आपल्या सख्ख्या भावाची अगर बहिणीची मुलगी जिथें सांगून गेली असेल तिथें खुशाल आपली मुलगी सांगून जातात!"

" पण हें किती चुकीचें आहे नाहीं? जें होणार तें कधीं चुकत नाहीं मग उगीच अतिधडपड करून, दुसऱ्यांचीं मनं दुखवून वाईटपणा पदरीं कां घ्या?"

" पण कुंदे, असा विचार करतं कोण? बाकी, तूं मात्र असा विचार करावास हें ठीकच आहे. आपल्या आईचं मन मोडून स्वतःच्या प्रीतीचं साफल्य करणं जर तुला गैर वाटलं, तर..."

" हं, हं, महाराज, त्या बाबतींत आपण माझे गुरु होतां बरं. आपल्या शिकवणीमुळें माझीं मतं तशीं बनलीं."

" पण तूं आणि मी काय दोन आहोंत?"

प्रभाकरपंतांच्या ह्या चेष्टेनें कुंदाताईना आनंद वाटला, लाज वाटली व हंसूंहि आलें.

व मानेला झटका देत त्या चेष्टेनें म्हणाल्या, " मग ठीक आहे तर! जी माझी अडचण ती आपलीहि अडचणच! तेव्हां ह्या अडचणींतून काढा आतां मार्ग!"

पत्नीच्या ह्या बोलण्यावर प्रभाकरपंत मनापासून हंसले. व हंसतच म्हणाले, " पण सुशीलेला आंतर्जातीय विवाह पसंत पडेल?"

" न पडावयाला काय झालं? इतकी कांहीं ती जुन्यांतली नाहीं."

" मग मीं म्हणतों, तूं सुशीलेला प्रत्यक्ष विचारून फोड कां करून घेत नाहींस? अं? कसं वाटतं तुला?"

" हो, हा मार्ग कांहीं वाईट नाहीं—मग तसंच करतें तर. मीं उद्यांच जाते सुशीलेकडे—"

" उद्यांच? ओहो, लेकीच्या लग्नाची एवढी घाई झाली आहे?"

त्यावर कांहीं न बोलतां कुंदाताई हंसत हंसत घरांत गेल्या.

## ८ : : विभ्रांत लग्न !

आणि खरोखरीच दुसऱ्या दिवशीं दोनप्रहरीं कुंदाताई सुशीलाताईंच्या घरीं गेल्या.

साधारण साडेतीनच्या सुमाराला त्या तिकडे पोहोंचल्या, तरी सुशीलाताईंची वामकुक्षी कांहीं पुरी झाली नव्हती.

कुंदाताई जेवल्यावर फक्त अर्धा पाऊण तास विश्रांति घेत. त्यांनीं संवयच तशी केली होती. पण सुशीलाताई चांगल्या ३।४ तास लोळत रहात व ह्यावरून कुंदाताई त्यांची खूप चेष्टा करीत.

आजहि सुशीलाताईला अद्यापि झोंपलेली पाहून कुंदाताईंनीं त्यांच्या दंडाला धरून हलविलें.

सुशीलाताई दचकून जागी झाली. व डोळे किलकिले करून पहातात तर समोर त्यांची लाडकी कुंदाताई उभी ?

त्याबरोबर आळस देत व व्यायामाचा दुष्काळ आणि झोंपेचा सुकाळ ह्या दोन्हींच्या पायीं बरेंचसें सुटलेलें आपलें शरीर सांवरीत त्या उठून बसल्या. व कुंदाताईंचा हात धरून त्यांना आपल्या शेजारीं बसवीत म्हणाल्या "कुंदे, बघ, आतां तुला पाहतांच आपण जणूं अद्यापि कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थिनीच आहोंत असं वाटलं मला ! खरंच, ते दिवस किती मौजेचे होते नाहीं ?"

" आणि सुशे, हे दिवस मौजेचे नाहींत ? "

" तसंच नाहीं केवळ. पण आतां मौजेबरोबर, आनंदाबरोबर नाना

तऱ्हेच्या काळज्या आहेत कीं तयार!"

आपल्या मनाला टोंचणाऱ्या एका काळजींतून मुक्त होण्यासाठींच आज आपण इथें आल्याची जाणीव मनाला होऊन कुंदाताई किंचित् हंसल्या व म्हणाल्या, "हो, तें तर खरंच—"

"कां ग हंसलीसशी ?" सुशीलाताईंनीं प्रश्न केला.

"अग, आज किनई, तुझ्या लेकीच्या लग्नाबद्दल ऊर्फ तुझ्या म्हणण्या-प्रमाणें सध्यांच्या तुझ्या आनंदांत वैगुण्य आणणाऱ्या एका काळजीबद्दल चौकशी करावयाला आलें आहे मीं. नि तूं आयताच तो विषय काढलास म्हणून मला हंसूं आलं."

"अस्सं होय ? पण काय ग, माझ्या लेकीच्या म्हणजे कुठल्या लेकीच्या लग्नाबद्दल चौकशी करणार तूं ? थोरलीच्या कीं धाकटीच्या ?"

"थोरलीच्या आधीं धाकटीची कां असेल घाई ?" कुंदाताईंनीं प्रश्नात्मक उत्तर दिलें.

त्यावर सुशीलाताई हंसत हंसत म्हणाल्या, "नाहीं म्हटलं माझी वृंदा तुझ्या सुधाकराला द्यावी अशी माझी फार इच्छा आहे, तेव्हां त्यासाठीं मी तुझा उंबरठा झिजविण्याऐवजीं तूंच अनायासें तो विषय काढशील तर पहावं—"

"काय ? आमच्या सुधाकराला तुझी वृंदा ?"

"मग ? त्यांत तुला एवढं आश्चर्य काय वाटलं ?"

"नाहीं, म्हटलं आमचा कायस्थ कोंकणस्थी विवाह—तेव्हां..."

"अग पण, तुझा सुधाकर किती गोड मुलगा आहे. त्यांतून तो माझ्या सख्ख्या मावसभावाचा; शिवाय, कुंदे, वृंदेचा त्याच्याकडे किती ओढा आहे म्हणून सांगूं. बघ, ५।६ वर्षांपूर्वा आमच्या वन्सं तिला एकदां सहज म्हणाल्या कीं, 'आमच्या वामनाबरोबर तुझं लग्न करावयाचं हं.' त्यासरशीं बया म्हणते कशी, 'अंहं, मीं सुधाकराबरोबर लग्न करणार' आणि ही केवळ लहानपणींची बडबड नव्हे हं. आतां सुद्धां तिचा सुधाकराकडे फार ओढा आहे. तिला शाळत किनई लोकरीचा स्वेटर विणावयाचा होता. स्वतःच्या अंगचाच काढ म्हणून सांगितलं मीं, पण नाऽहीं. तो

पोर सुधाकराचें माप घेऊन आली नि त्याच्या आवडीची राखाडी रंगाची लोंकर आणून तिनें काढावयाला घेतला कीं ! पाहिलीस गंमत ! मग सुधाकराशीं तिचं लग्न झालं तर वाईट काय ?"

"आणि सुशीले सुधाकराचासुद्धां तिच्याकडे खूप ओढा आहे. आपल्या त्या मृत्युपत्रांत त्यानें वृंदेला आपलें अतिशय आवडत रेडी बेअर–खेळांतील अस्वल–दिलं होतं कीं." कंदाताई म्हणाल्या व त्या मजेशीर–आठवणीनें दोघीहि हंसल्या.

नंतर कुंदाताईनीं म्हटलें "सुशीले ! सुधाकराला हें पंधरावं वर्ष नि वृंदेला चौदावं आणि इतक्यांतच आपण त्यांच्या लग्नाची वाटाघाट काय करीत बसलों ग ?"

"हें बघ कुंदे, मला तर असं वाटतं कीं, कांहीं कांहीं पूर्वीच्या फॅशन्स जशा हल्लीं पुनः सुरू झाल्या आहेत, तशी हल्लींची अति प्रौढविवाहाची सुधारणा नाहींशी होऊन साधारणपणें १६।१७ वर्षांवर मुलींचीं लग्न होऊं लागणार ! मग आणखी २।३ वर्षांनीं सुधाकर वृंदेचा विवाह करावयास काय हरकत आहे ?"

"वाः ! तूं तर ही सोयरीक नक्कीच करून टाकलीस ?"

"कुंदे, मीं चेष्टेनें नाहीं बोलत. पण सुधाकर आणि वृंदा ह्या दोघांना जर हें लग्न पसंत पडेल तर आमची त्याला मळींच आडकाठी नाहीं. कुंदे, तूं मला भटीणकाकू म्हणून नेहमीं चिडवितेस ना ? पण बघ, मी किती सुधारक आहे ती !"

सुशीलाताई हें शेवटलें वाक्य किती हंसून बोलल्या. पण कुंदाताई कांहीं हंसल्या नाहींत. सुशीलाताईच्या बरीक तें ध्यानांतहि आलें नाहीं; त्या पुढें म्हणाल्या, "हो, खरं, कुंदे, तूं आमच्या कुंदेच्या लग्नाबद्दल चौकशी करावयाला आली होतीस ? मग, बोल ना काय तें."

कुंदाताईंच्या इच्छित विषयाची सुशीलाताईंनीं एवढी प्रस्तावना केली तरी कुंदाताई गप्पच !

जो विषय काढण्यासाठीं कुंदाताई मुद्दाम आल्या होत्या, तो विषय आतां काढावा कीं न काढावा हाच मुळीं त्यांना प्रश्न पडला.

" तर काय ? मीं तो नाद सोडून दिला असता ! "

" खरं ? शाबास बाई ! मग प्रभाकर पक्का कायस्थ आहे तेंच बरं. तो जर आमच्या जातीचा असतां नि कधींकाळीं वन्संना दिलेला शब्द खरा करण्याचा वन्संनीं आणि इकडच्या स्वारीनें जर हेका धरला असतां तर...... "

" आतां कशाला तें जर तर ? "

" हं, हं, आपल्या मनाप्रमाणें झालं म्हणून आतां हें बोलणं. कुंदे, मुलगी जन्मतांच तिच्या लग्नाची काळजी वहातेस, असं बोलून मला चिडवीत होतीस नाहीं ? नि आतां ग ? आतां तुलासुद्धां नाहीं कां ती काळजी लागलेली ? "

" लागलेली नाहीं हं, लागलेली होती. किशोरच्या लग्नाला मला हवा होता तो मार्ग मोकळा सांपडला. आतां पुढचं किशोरच्या हातांत ! बरं, सुधाकराचं तर लग्नहि ठरलं. मग फारशी काळजी कसली ?"

" वाः म्हणजे कुंदे, किशोरच्या लग्नामधील विघ्न दूर सारायला तूं आलीस नि सुधाकराच्या लग्नाचं ठरविलंस म्हणजे नेहमीं लग्नांत विघ्न येतें. पण आतां हें विघ्नांत लग्न निघालं, नाहीं ?"

सुशीलाताईच्या ह्या कोटीनें त्या दोघी मैत्रिणी अगदीं मनापासून निश्चिंत विद्यार्थीदशेंत त्या जेवढ्या मनमोकळपणानें हंसत तेवढ्या मनमोकळेपणानें हंसल्या !

## ९ : : कॉलेज विद्यार्थिनी.

मॅट्रिक पास होऊन किशोर विल्सन कॉलेजांत जाऊं लागली. कॉलेजांत जाण्याच्या पहिल्या दिवशीं किशोरप्रमाणेंच कुंदाताई, प्रभाकरपंत व सुधाकर ह्यांचीहि खूप चलबिचल झाली!

किंबहुना किशोरपेक्षां ह्या तिघांचीच अधिक झाली.

आपली किशोर आतां मोठी झाली ह्या जाणीवेनें कुंदाताई व प्रभाकरपंत ह्यांना सकौतुक आनंद वाटत होता.

आणि आपली ताई आतां कॉलेजांत जाणार म्हणून सुधाकराला सादर विस्मय वाटत होता!

किशोर पहिल्या दिवशीं कॉलेजांतून आल्यावर एकसारखं कॉलेजविषयीं शाळेंतील जीवनापेक्षां निराळ्या असणाऱ्या तेथील जीवनाविषयीं, शाळामास्तरांच्या शिक्षणपद्धतीपेक्षां वेगळ्या असणाऱ्या प्रोफेसरी शिक्षणपद्धतीविषयीं ती सारखं बोलत होती. फार काय, कॉलेज ह्या विषयावांचून ती इतर कसल्याच विषयाचा उल्लेख करीत नव्हती!

आणि आपल्यालाही असं कॉलेजांत कधीं जावयाला मिळेल अशा विचारांत गढून सुधाकर उत्कंठित मनानें व एकदां अनुभविलेलें तें आनंदी कॉलेजजीवन आपल्याला आतां पुनः अनुभवायाला मिळणार नाहीं असें वाटून कुंदाताई व प्रभाकरपंत हुरहुरल्या उत्सुकतेनें किशोरचा नवा अनुभव ऐकत होतीं.

आपल्या वर्गांतील '२७ दक्षिणी मुलींपैकीं किशोरनें बऱ्याच जणींचीं नांवें सांगितलीं व बहुतेकींचें वर्णन केलें.

पहिल्या दिवशीं कॉलेजांत जातांना नवखेपणामुळें वाटणारी भीति व कॉलेजांत दाखल होण्याचा विजय संपादन केल्याचा संतोष ह्या दोन्ही भावना किशोरच्या बोलण्यांत आढळत होत्या.

मध्येंच कुंदाताईनीं प्रश्न केला, "आणि किशोर, तुझ्या शाळेंतील किती मुली विल्सनमध्यें आल्या आहेत ?"

"दहा जणी आल्या आहेत कीं, पण आई, शेवटीं सुमति इथें नाहींच आली. कशी वाईट आहे बघ." किशोर गाल फुगवीत म्हणाली.

"अग, कांहीं कारणामुळें तिला ह्या कॉलेजांत यावयाला जमलं नसेल."

"तर ! न जमावयाला काय झालंय ? ती तसलीच आंतल्या गांठीची आहे !"

"किशोरे, खरी स्थिति कळल्यावांचून कुणाला उगीच नांवं ठेवूं नयेत हं." कुंदाताई सौम्य शब्दांत किशोरला रागें भरल्या.

पण आपलें म्हणणें मागें न घेण्याच्या हटवादी वृत्तीला अनुसरून किशोर म्हणाली, "एवढं कशाला ? आई, सुमतीच्या आजोळीं फोन आहे. सुमति कुठल्या कॉलेजांत गेली आहे हें तिच्या मामींना ठाऊक असेल कीं, त्यांनाच विचारतें मीं."

व लगेच किशोर फोन करावयाला धांवली.

आणि सुमारें ४।५ मिनिटांनीं अगदीं उतरलेल्या चर्येनें ती परत आली. कुंदाताईनीं तें पाहिलें पण त्या कांहींच बोलल्या नाहींत.

क्षणभरानें किशोर आपण होऊनच म्हणाली, "आई, मीं सुमतीला नांवं ठेवलीं हीं माझी मोठीच चुकी झाली, आई तिला म्हणे क्षय झाला आहे ग. तीन आठवड्यांपूर्वी तिला पांचगणीला नेलं. तिला कॉलेजांत जाण्याची केवढी आवड होती ! आई मी तिला उगीच नांव ठेवलीं ग. आतां मीं तिला पत्र पाठवतें हं. काय लिहूं आई तिला ? हो, हो, तूं लौकर बरी होशील, मात्र काळजी मुळीच करूं नको व इच्छाशक्तीच्या जोरावर तापाला हटव, वगैरे लिहितें; आत्तांच लिहून टाकतें."

झालं लगेच किशोर पत्र लिहावयाला बसलीसुद्धां.

लहानपणापासून तिचा हा अस्सा स्वभाव ! अतिशय उतावीळ, हट-

वादी आणि अस्थिर; पण तेवढाच भावनाप्रवण व प्रेमळ!

श्रावण महिन्यांतील आकाश जसें घटकेंत निरभ्र तर घटकेंत अभ्राच्छादित बनतें, आतां चक्क ऊन तर लगेच धों धों पाऊस नि पुनः ऊन असा सतत खेळ जसा सुरूं असतो तसा किशोरच्या अंत:करणांत परस्पर विरोधी भावनांचा खेळ सुरूं असे!

एकादी गोष्ट तिला आतां हवीशी वाटे तर क्षणांत ती डोळ्यांसमोरहि नकोशी होई!

एखाद्या वेळीं आई—वडिलांशीं किंवा भावाशीं खूप बोलत बसण्याची तिला लहर येई तर कधीं कधीं ती तासन् तास आपल्या खोलींत एकटीच वाचीत किंवा चित्रें काढीत बसे!

तिला चित्रकलेचा नाद, नव्हे, वेड होतें. त्या कलेचें अगदीं प्राथमिक शिक्षण तिला शाळेंत मिळालें होतें तेवढेंच. पण त्यांतील नैसर्गिक आवड व ज्ञान असल्यामुळें ती फार सुंदर चित्रें रेखाटी.

ती जातिवंत कलावती होती. व त्यामुळें साऱ्या जातिवंत कलावंताप्रमाणें ती लहरी व हळवार वृत्तीची आहे असें प्रभाकरपंत म्हणत!

पण कुंदाताईचें एवढ्यानें समाधान होत नसे. त्यांना किशोरीची भारी काळजी वाटे.

महिन्या महिन्याला नव्या, नव्या मैत्रिणी जोडणाऱ्या व जुन्यांना विसरणाऱ्या किशोरच्या अस्थिर मनोवृत्तीला आळा कसा घालावा हेंच त्यांना कळत नसे. शिवाय ती 'सरळ सूत नाहीं तर जिवंत भूत' ह्या सदरांतील होती. तिच्या कलानें घेतलें तर ती सारं ऐकेल पण जबरदस्तीनें तिच्याकडून कांहीं करूं म्हटलें कीं—अं हं—मग ती हटून बसलीच! असा कांहीं विचित्र स्वभाव होता तिचा!

पण ह्या विचित्रपणांत ह्या अस्थिर, हटवादी वृत्तींत एक मात्र स्थिरता होती. आणि ती म्हणजे, आपल्याला महत्त्वाची वाटणारी प्रत्येक गोष्ट किशोर कुंदाताईना सांगे!

दिवसभरांतील इतर बऱ्या वाईट घटनांप्रमाणें आपल्या हातून घडलेली बरीं व वाईटहि कृत्यें ती आईजवळ सांगे.

त्यामुळें कुंदाताई व प्रभाकरपंत आतुर मनानें सुधाकराच्या परीक्षेची वाट पहात होतीं. आणि किशोर अगदीं मनापासून सुधाकराला उत्तेजन देत होती.

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यांत परीक्षा सुरूं झाली. व सुधाकराचे सर्व पेपर फार चांगले गेले. आणि संस्कृताचा तर फारच उत्तम गेला.

एकंदरींत हें वर्ष सर्व बाजूंनीं आनंदाचें गेलें व हा आनंद आणखी वाढविण्यासाठीं मे महिन्याच्या सुटींत लोणावळ्यास जाण्याचें कुंदाताईंनीं ठरविलें. प्रभाकरपंतांना रजा मिळत नसे. त्यामुळें दर वर्षीं कुंदाताई मुलांसह ८–१० दिवस माहेरच्या मंडळीबरोबर कुठेंतरी जाऊन येत. पण प्रभाकरपंत एकटेच मुंबईत रहात असल्यामुळें त्या जाण्यांत कुणाचें मन लागत नसे. म्हणून आतां प्रभाकरपंतांनीं महिन्याची रजा घेतांच सर्वांना फार बरें वाटलें.

मे महिन्याच्याच्या पहिल्या तारखेला मंडळी लोणावळ्याला आली.

किशोरचा लहरी स्वभाव ह्या वर्षांत जरा निवळल्यासारखा वाटत होता तो तर कायम राहिलाच पण लोणावळ्याला गेल्यावर तिच्यामध्यें आणखीच सुधारणा दिसूं लागली.

लोणावळ्याला गेल्या दिवशींच किशोर कुंदाताईंना म्हणाली, " आई, मी आणि सुधाकरानें मिळून असं ठरविलं आहे कीं, आतां तुला आणि बाबांना महिनाभर खरीखुरी सुटी द्यावयाची. आई ह्या सुटींत आम्हां दोघांनाहि अभ्यास करावयाचा नसल्यामुळें उगीच रिकामपणांत वेळ दवडण्यापेक्षां तुमच्या वाटेचीं कामं आम्हीं करूं. व्यंकटेशाला स्वयंपाकाचा बेत मी सांगावयाचा, हिशेब मी लिहावयाचा व घरांत लागलं सवरलं आणविण्याचा व रामाला बाजारांतील दुकानं वगैरे दाखवून दाणेवाल्याचं आणि इतर खातीं सुरूं करण्याचा मक्ता सुधाकरानें घ्यावयाचा. अं ? आई, बाबा, तुम्हांला हें पसंत आहे ?"

लेकीचे एवढे शहाणपणाचे, प्रेमळ बोल कुठल्या आईबापांना पसंत पडणार नाहींत ?

आपल्या लाडक्या लेकीकडे कौतुकानें पहात कुंदाताई म्हणाल्या,

" किशोर, ही कल्पना मूळ कुणाची ग? तुझी कीं सुधाकराची?"

पण किशोरला उत्तर देण्याची फुरसदहि न देतां सुधाकर म्हणाला, " ताइची, ताईची! आई ताईनें सर्व व्यवस्थित करून मग मला पढविलं ग—"

हें ऐकतांच तर कुंदाताईना भारीच आनंद वाटला.

व मुलं ठरल्याप्रमाणें आपापल्या कामांत चूर झाल्यावर त्या प्रभाकरपंतांना म्हणाल्या, "ईश्वरेच्छेप्रमाणें एकादी गोष्ट अमृतवत् किंवा विषतुल्य बनूं शकते म्हणतात तें खरं आहे. कॉलेजांत जाऊं लागल्यावर किशोर अधिकच लहरी बनेल काय, इतर कांहीं मुलींप्रमाणें ती बेफाम होईल काय अशी मला भीति वाटत होती. पण झालं वेगळंच!"

" एकूण, उगीचच तूं पोरीबद्दल काळजी करीत होतीस ना? "

" असं वाटतं खरं. कॉलेजांत जाऊं लागल्यावर ती कदाचित् शेफारून जाईल असं वाटल्यामुळें मीं भीत होतें. पण कॉलेजांत जाऊं लागल्यामुळेंच तिला इतकी समजूत आली, तिच्या अंगीं एवढा प्रौढपणा आला! चला, माझी काळजी बरीचशी दूर झाली."

एकंदरींत कॉलेजचा पायगुण चांगला झाला असें कुंदाताईना वाटलें.

पण रहाटगाडग्याप्रमाणें फिरणाऱ्या ह्या मानवी जीवनांत कुठलीहि गोष्ट चिरस्थायी असते काय?

मग कॉलेजच्या पायगुणाचा चांगुलपणा तरी कसा टिकणार?

पण वर्तमानकाळ दुःखमय असला तरी भावी काळाविषयीं माणसाला आशा वाटते, मग वर्तमानकाळ आनंददायी असला म्हणजे त्याला खूप आशा वाटल्यास नवल काय!

———

## ११ : : " जपून जा गडे, जपून जा. "

मे महिना लोणावळ्याला संपूर्ण मौजेंत घालवून मंडळी मुंबईला आली.

व जूनच्या २० तारखेला कॉलेज सुरू झालें. किशोर इंटर आर्ट्सच्या वर्गांत दाखल झाली. आणि मॅट्रिकच्या परीक्षेंत जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप व इतर बक्षिसें मिळविलेला सुधाकर एल्फिन्स्टन कॉलेजांतील प्रीव्हियसच्या वर्गांतील पहिला स्कॉलर झाला!

मध्यंतरीं २।३ महिने स्तब्ध राहिलेलें कॉलेजचें विश्व पुनः झपाट्यानें सुरू झालें.

कॉलेजच्या नवलाईचें वर्णन करण्याची आतां सुधाकराची पाळी होती.

व त्यावेळीं मुलगा व मुलगी ह्यांच्या दृष्टिकोणांत निसर्गतःच किती फरक असतो हें कुंदाताईच्या आतां नीट लक्ष्यांत आलें.

किशोरच्या कॉलेजविषयींच्या गोष्टी बऱ्याचशा व्यक्तिविषयक असत. म्हणजे वर्गांतील मुलींचे स्वभाव, वागण्याची पद्धति, कपड्यालत्त्याचा षोक, घरची परिस्थिति वगैरेसंबधीं किशोर अधिक वर्णन करी.

पण सुधारकराला आपल्या मित्रांविषयीं इतकी बारीक माहिती मुळींच नसे. कुठला मुलगा टेनिस चांगलं खेळतो, क्रिकेटची कुणाला आवड आहे व अभ्यासांत विशेष लक्ष कोण घालतो इकडेच त्याचें लक्ष असे. ह्यापलीकडे त्याला आपल्या मित्रांविषयीं कांहीं सुद्धां ठाऊक नसे.

म्हणजे मुलींची निरीक्षणशक्ति खोल असते. त्यांना मोजक्याच गोष्टी विषयीं अगदीं संपूर्ण माहिती असते.

आणि मुलांची निरीक्षणशक्ति व्यापक असते. पुष्कळशा गोष्टी विषयीं त्यांना थोडीथोडी माहिती असते !

आणि ही बाळपणांतील व विद्याथादर्शेतील मुलामुलांची वेगवेगळी निरीक्षणशक्ति पुढेंहि तशीच कायम रहाते !

* * * * * *

अशा रीतीनें जवळजवळ ६ महिने सुरळीतपणें गेले व सहामाही परीक्षा आटोपल्यावर ऑक्टोबरची सुटी होऊन दुसरी टर्म सुरू झाली.

--आणि किशोरच्या वागण्यांत हळुंहळू थोडा फरक पडूं लागल्याचें कुंदाताईच्या लक्ष्यांत आलें.

किशोरचा बोलकेपणा हल्लीं पार लोपला. ती आतां बरीच विचारमग्न दिसूं लागली. एरवी आईबरोबर आजोळीं किंवा मावशीच्या घरीं जावयाला ती उत्सुक असे पण आतां तिला तें मुळींच आवडेना.

हें सारें कुंदाताईच्या लक्ष्यांत आलें. व आजवरच्या संवयीनुसार किशोर ह्याचें कारण आपल्याला सांगेल अशी त्यांना अपेक्षा होती.

पण आजवर किशोरचें जग वेगळें होतें. आजवर ती अल्लड, निर्व्याज बालिका होती. म्हणजे कॉलेजमध्यें एक वर्ष घालविल्यानंतर तिनें तारुण्यांत पदार्पण केलें असें नव्हे, पण कॉलेजांत जाऊं लागल्यानंतर हळूंहळूं तिला आपल्या तारुण्याची जाणीव झाली!

शाळेमध्यें प्रेमळ पण कडक शिक्षकिणींच्या नजरेखालीं, प्रेमळ व खोडकर मैत्रिणींच्या घोळक्यांत असणारी किशोर तारुण्याचा स्पर्श झाला असूनहि अजाण, अल्लड बालिका होती !

मोहमयी मुंबापुरींतील विलोभनीय गोष्टींची कल्पनाहि नसलेल्या खेडवळ तरुणीप्रमाणें किशोरचें हृदय तारुण्याच्या मादकतेविषयीं अनभिज्ञ होतें !

'बाल्याची ती हिरवळ सरली, तारुण्याची घसरण आली, जपून जा गडे, जपून जा ' असें एका कवीनें उगीच नाहीं वर्णन केलें !

किशोर आतां ह्या तारुण्याच्या घसरणीवरून चालली होती व तिच्या प्रेमळ आइन तिला वेळोवेळीं 'जपून जा गडे, जपून जा ' असा इशारा

जरी दिला होता तरी तारुण्याचा कैफ चढल्यामुळें किशोर तो इशारा विसरली !

तिला एका नव्या भावनेची ओळख पटली. व त्या मादक भावनेंत तिचें हृदय मोहून गेलें.

किशोर बेचैन झाली व तें पाहून कुंदाताईहि तेवढ्याच बेचैन झाल्या.

बंदुकीचा छरा लागून विद्ध झाल्यामुळें तळमळणाऱ्या आपल्या पिलाकडे पक्षीण जेवढ्या व्याकुळ आस्थेनें पहाते, आपल्या हातून आपल्या लाडक्या पिल्लाच्या दुःखाचें निवारण होणें शक्य नाहीं हें कळल्यामुळें स्वतःच्या निष्क्रियतेपायीं तिची जशी तळमळ होते तशी कुंदाताईंची तळमळ होत होती ! तशा व्याकुळ आस्थेनें त्या किशोरकडे पहात होत्या !

त्यांनीं जवळजवळ १५।२० दिवस ह्या स्थितींत काढले व शेवटीं आपल्या मनांतील शल्य प्रभाकरपंतांकडे उघड केलें. आपल्या अपत्यांच्या बाबतींत निसर्गतःच अतिशय प्रेमळ असणाऱ्या हृदयाच्या जोरावर अपत्यांच्या सुखदुःखाचें निरीक्षण करणारी मातेची नजर अतिशय तीक्ष्ण बनत असते !

किशोरच्या हृदयांत तारुण्यसुलभ चलबिचल होतांच कुंदाताईंच्या तें लगेंच लक्ष्यांत आलें. पण प्रभाकरपंतांच्या लक्ष्यांत आलें नाहीं.

म्हणजे पुरुषाची नजर प्रेमामुळें अशी तीक्ष्ण बनूं शकत नाहीं असें नव्हे !

तारुण्यामध्यें प्रीतीचा बहर आल्यावेळीं प्रियकराची नजर आपल्या प्रेयसीच्या बाबतींत किंवा तरुण पतीची नजर आपल्या नवोढा पत्नीच्या बाबतींत अशी तीक्ष्ण बनूं शकते !

पण पुढें जीवनकलहाची तीव्रता जाणवूं लागली म्हणजे शरीराला अति त्रास पडल्यामुळें तारुण्यांतील नजरेची तीक्ष्णता मंदावूं लागते !

पण स्त्रियांची गोष्ट अशी नसते ! तारुण्य, वार्धक्य, श्रीमंती, गरिबी, वगैरेपैकीं कशावरहि त्यांच्या नजरेची ही प्रेमळ तीक्ष्णता अवलंबून नसते !

आणि हें निसर्गजनित सत्य प्रभाकरपंतांच्या आतां लक्ष्यांत आलें.

" ऐकलं कां, किशोरचं किनई, कॉलेजांतील एखाद्या तरुणावर प्रेम

जडलं असावं " हे कुंदाताईंचे शब्द ऐकतांच प्रभाकरपंतांना पहिल्यांदा फार आश्चर्य वाटलें.

किशोरच्या मनःस्थितींत झालेला हा फरक किशोरच्या आईच्या लक्ष्यांत आला आणि आपल्या नजरेला आला नाहीं?—हं!—

क्षणभर स्तब्ध राहून ते म्हणाले, "कुंदे, किशोरचं खरंच कुणावर प्रेम बसलं असेल म्हणतेस?"

"मला तर असं खात्रीपूर्वक वाटतं. पण ती आतांशी माझ्याकडे बोलण्याचेंच टाळतें. किती घुमी बनली आहे तरी!"

"मग तूंच तिला स्पष्ट विचार ना."

"आणि तिनें उडवून लावलं तर?"

"तर दुसरा कांहीं मार्ग पाहिला पाहिजे. पण आधीं सरळ प्रयत्न करावयाला नको कां?" प्रभाकरपंतांनीं आपलें मत सांगितलें.

व नंतर खिन्न स्मित करीत ते म्हणाले, "कुंदे, पुष्कळ वर्षांपूर्वीं, म्हणजे, तुझ्या आईवडिलांनीं आपल्या विवाहाला परवानगी देण्याचें नाकारलें होतें त्यावेळीं तूं व मी तुझ्या आईवडिलांच्या मनाविरुद्ध न जाण्याचें ठरविलें. तसें करणें आपलें कर्तव्य आहे हें तुला पटलं, पण तरीहि तूं भारी नाराज झालीस. तूं हंसत, खेळत होतीस तरी तुझ्या ह्या सुंदर नेत्रांत एक उदास, खिन्न छटा मधूनमधून दिसे. व त्यानंतर बऱ्याच दिवसांनीं आपली भेट झाल्यावेळीं मीं तुला पट्दिशीं ह्या खिन्न छटेबद्दल विचारलं. तेव्हां तूं मला हंसून विचारलंस, 'एका दृष्टिक्षेपांत हें तुह्मांला कसं कळलं? एक्स्-रेसारखी भेदकशक्ति आहे वाटतं तुमच्या डोळ्यांत?' कुंदे, हें आठवतं तुला?"

"होय तर. मीं तें कसं बरं विसरेन? पण ही आठवण आपल्याला आतां कां झाली?"

"कां झाली?" पुनः मघांसारखेंच खिन्न स्मित करीत प्रभाकरपंतांनीं म्हटलें, "कुंदे, त्यावेळीं तुझ्या नेत्रांतील उदास भाव माझ्या नजरेला येऊं शकला. आणि आतां किशोरच्या हृदयाला प्रीतीची जखम झाली आहे हें माझ्या नजरेला येऊं नये?"

" पण ह्यांत काय आश्चर्य? स्त्री आणि पुरुष ह्यांच्या मनोरचनेंत ईश्वरानेंच हा फरक केलेला आहे! स्त्रिया कितीहि शिकल्या तरी आपला संसार, पति व मुलं ह्यांच्यांपासून त्या दूर जाऊं शकत नाहींत. त्यांची नजर आपला पति व मुलं ह्यांच्यांभोंवतीं सतत फिरत असते. आणि म्हणून त्यांच्यासंबंधींची क्षुल्लक गोष्टसुद्धां स्त्रियांच्या नजरेला दिसून येते. पण पुरुषांची स्थिति वेगळी आहे. त्यांचें क्षेत्र कितीतरी विस्तृत असतें. आपल्या बायकोमुलांच्या क्षेमकुशलतेकडे व पोषणाकडे त्यांचे दोन्ही डोळे गुंतलेले असतात! आपल्या माणसांना कसलीहि वाण पडं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून पुरुष जपत असतात. मग एवढ्या महत्त्वाच्या कामांत गुंतलेले पुरुषांचे डोळे असल्या नाजुक गोष्टी कशा पाहूं शकतील? हें काम स्त्रियांचेंच आहे. पूर्वींच्या राजांच्या पदरीं हेर असत. व राज्यांतील हालचालींची पहाणी करून त्याबद्दल राजाला वर्दी देणं हें त्यांचं काम असे. तशी मीं आपल्या पदरची हेर आहे. आपल्या गृहराज्यांत काम कमी, जास्ती आहे त्याची पहाणी करून तें आपल्याला कळविणं हें माझें काम आहे."

कुंदाताईंच्या ह्या गोड भाषणानें प्रभाकरपंतांची खिन्नता बरीच दूर झाली. ते हंसून म्हणाले, " वा :! इतका डोळस, कुशल हेर पदरीं असल्यावर हा राजा खूप पराक्रम गाजवील!"

" मग त्यांत काय शंका?" कुंदाताई चट्‌दिशीं म्हणाल्या.

त्याबरोबर ओशाळ्या स्वरांत प्रभाकरपंतांनीं म्हटलें, " वाः वाः! मीं चेष्टा केली आणि तूं तीच माझ्या गळ्यांत घालतेस? बघ, अशी उठल्या सुटल्या जर तूं माझी स्तुति करीत बसलीस तर चढून जाईन हं मीं."

" मग तीच तर माझी इच्छा आहे. आपल्या धंद्यांत आपण दिवसानुदिवस असंच वर चढत जावं."

'वर चढणें' ह्या क्रियापदावर कुंदाताईनीं केलेला हा मजेदार श्लेष ऐकून प्रभाकरपंत मनापासून हंसले व आपल्या अंतःकरणाला जाचणाऱ्या चिंतेचा जरा विसर पडून कुंदाताईहि त्यांच्या हंसण्यांत सामील झाल्या!

---

# १२ : : तारुण्याचा कैफ !

आणि दुसऱ्या दिवशीं दोनप्रहरीं किशोर कॉलेजांतून आल्यावर कुंदाताईनीं तिला आपल्या खोलींत बोलावून घेतलें.

प्रस्तावनेदाखल अभ्यासाविषयीं वगैरे प्रश्न करून त्यांनीं म्हटलें, “ किशोर, तुला हल्लीं काय होतं आहे ? बघ, आजवर तूं प्रत्येक गोष्ट मला सांगत होतीस. मग आतां कां बरं गप्प, गप्प आहेस ? अं ? सांग बघूं मला काय तें. ”

कुंदाताई हें बोलत असतां किशोरची मुद्रा पहिल्यांदा घाबरी व नंतर लाजरी झाली. आईच्या चर्येकडे ओझरती नजर टाकून ती अर्धस्फुट स्वरांत म्हणाली, “ कॉलेजांतील एका तरुणावर–माझं–माझं–प्रेम जडलं आहे.”

कुंदाताईंना ही कल्पना होतीच. पण किशोरनें आतां त्याबद्दल स्पष्ट उल्लेख करतांच त्यांच्या डोळ्यासमोर त्यांच्या भाचाची–प्रभाकराची–प्रशांत मूर्ति उभी राहिली.

त्यांनीं हळूंच एक निःश्वास सोडला.

एकूण किशोरचें प्रभाकराकडे लक्षहि नाहीं तर ? आपल्याला व किशोरच्या वडिलांना तो पसंत आहे पण किशोरला तो पसंत नाहीं मग ?–

मग काय ? आपल्या आईवडिलांनासुद्धां वामन देशमूख व जातींतील इतर मुलगे नव्हते का पसंत ! पण आपल्याला ते पसंत नव्हते.

मग आपलीच मुलगी किशोर ! तेव्हां तिचीं मतेंहि तशींच स्वतंत्र असणार !

आणि तिच्या पसंतीचा हा तरुण जर चांगला कुलीन, सुशील असला —व तो तसा असणारच—तर आपण संमति देणेंच योग्य !

असा विचार करून कुंदाताईनीं म्हटलें, " अस्सं ? बरं, नांव काय त्या मुलाचं ? जातीनं कोण तो ? "

कुंदाताईनीं अगदीं स्पष्ट सरळ प्रश्न केला असूनही किशोर चटदिशीं उत्तर देऊं शकली नाहीं.

किंचित् अडखळत ती म्हणाली, " त्याचं—त्याचं नांव यूसफअली मिर्झा. तो—तो मुसलमान आहे."

किशोरच्या ह्या उत्तरानें कुंदाताई स्तिमित झाल्या. आवेगानें तोंडाबाहेर पडणारा सरोष आश्चर्योद्गार त्यांनीं मोठ्या प्रयत्नानें दाबला.

हं ! मुसलमान !—आपल्या हिंदू धर्माचा द्वेष करणाऱ्या, हिंदूंना तुच्छ लेखणाऱ्या जातींतील तरुण !—

कुंदाताईना काय बोलावें तेंच सुचेना.

त्या भयचकित दृष्टीनें कुठेंतरी पहात होत्या.

एकदम उठावं आणि बाहेर निघून जावं असं त्यांना वाटत होतं, पण त्यांचे पाय जागचे हालेनात !

मुसलमान ! आपली लाडकी किशोर धर्मबाह्य विवाह करणार ?—

कुंदाताईना विलक्षण खेद झाला. व तो अश्रूंच्या रूपानें बाहेर पडेल कीं काय अशी त्यांना सारखी धास्ती वाटूं लागली.

किशोर मुसलमानाबरोबर लग्न करणार हें त्यांना पसंत नसलें तरी आपल्या अश्रूंनीं तिचें मन पालटण्याचा प्रयत्न करण्याची कल्पना त्याना मुळींच रुचली नसती.

त्यामुळें कॉलेजांतून येतांच बाहेरील दारांतून सुधाकरानें ह्याच वळीं " आई " अशी आरोळी ठोकतांच, एक सुटकेचा निःश्वास सोडून त्या उठल्या.

त्यांनीं आपलें मन शक्य तों स्थिर केलें व कोरड्या पडलेल्या ओंठावरून जीभ फिरवून आपला आवाज समतोल ठेवण्याचा प्रयत्न करीत त्या म्हणाल्या, " सुधाकर आला. किशोर, चल आंत जाऊं या."

आईचें हें नेहमींसारखेंच प्रेमळ बोलणें ऐकतांच किशोरची मुद्रा उतरली.

यूसफअलीवर आपलें प्रेम जडलें आहे हें कळतांच आई आपल्याला रागावेल निदान ती त्रागा तरी करील असें किशोरला वाटलें होतें. व तसें झाल्यास आपल्या प्रेमळ आईविरुद्ध बंड पुकारण्याचा तिनें निश्चय केला होता.

पण झालं अगदींच निराळं !—

आपण मारे दुसऱ्याबरोबर भांडण्याच्या तयारीनें जावें नि दाढ दुखत असल्यामुळें त्या माणसानें सक्तीचें मौनव्रत घ्यावें म्हणजे आपल्याला जसें खजील वाटतें तसें किशोरला वाटलें.

बाकी, हेंहि तितकेंच खरें कीं, आपल्या प्रेमळ आईबरोबर भांडावयाची वेळ तितकीच पुढें गेली असें वाटून तिला समाधानहि वाटलें !

## १३ : कर्तव्यांची जाणीव !

कुंदाताईंनीं ती संध्याकाळ बाह्यतः निर्विकार मनानें कशी घालविली तें त्यांचें त्यांना ठाऊक !

प्रभाकरपंत ऑफिसांतून आल्यावर त्या नेहमींप्रमाणें जरा फिरून आल्या. नंतर जेवणें आटोपल्यावर नेहमींप्रमाणें मंडळीसह त्या दिवाणखान्यांत रेडिओ ऐकत बसल्या.

व मग दहाच्या सुमाराला मुलें आपल्या खोलींत गेल्यावर त्या प्रभाकरपंतांकडे वळून म्हणाल्या, " चलावं बरं आतां आंत "

" कुंदे, काय झालें ग ! कांहींतरी विशेष झालं आहे ना ? " प्रभाकरपंतानीं घाईघाईनें प्रश्न केला.

" एकूण आपल्या लक्ष्यांत एवढं आलं तर ? "

" अर्थात्च ? कुंदे, नेहमींप्रमाणें वागण्याचा तूं प्रयत्न खूप करीत होतीस, पण मीं कसा फसेन ? मात्र, मुलांच्या समोर तो विषय काढण्याची तुझी इच्छा नाहीं हें ओळखल्यामुळें मीं गप्प बसलों, इतकंच ! "

प्रभाकरपंतांचें हें स्पष्टीकरण ऐकून कुंदाताईंना फार बरें वाटलें. सुखाच्या क्षणांपेक्षां अशा संकटाच्या, दुःखाच्या वेळींच आपल्या माणसांच्या आपुलकीची किंमत अधिक वाटते !

प्रभाकरपंतांच्या मागून आंत जातां जातां कुंदाताईंच्या हेंच मनांत आलें कीं, " आपल्यावर कसलाहि प्रसंग कोंसळला तरी त्यांतून निभावून न्यावयाला आपले प्रेमळ, कर्तृत्ववान् पतिराज आधाराला आहेत ही देवाची केवढी कृपा ! "

आणि ह्या विचारानेंच दोनप्रहरपासून भारावलेलें त्यांचें अंतःकरण किंचित् हलकें झालें.

व त्यांनीं किशोरचें प्रेमगुपित प्रभाकरपंतांना सांगून टाकलें.

ते आवेगानें उद्गारले, " काय? मुसलमान? अरेरे! पोरीनें काय ही निवड केली ? "

" पोरच ना ती! आतां आपण तिला ह्या पोरकट नादापासून परावृत्त केलं पाहिजे!"

कुंदाताईच्या ह्या बोलण्यावर नकारात्मक मान हालवित प्रभाकरपंत म्हणाले, " अंहं, कुंदे, त्यामुळें फायद्यापेक्षां नुकसानच अधिक होईल! किशोरपेक्षां तूं किती तरी समजुतदार आहेस व होतीस. पण आपल्या लग्नाच्या वेळीं तुझ्या आईवडिलांनीं जर तुला माझ्याबरोबर लग्न करण्याची मनाई केली असती, तर तुलासुद्धां कदाचित् त्यांची इच्छा अनिच्छा धुडकावून लावण्याचा मोह पडला असता! पण तुझ्या आईवडिलांनीं मनाई केली नाहीं. हा कायस्थ–कोंकणस्थ विवाह आपल्याला पसंत नाहीं; तरीसुद्धां तुला हवं तसं तूं कर अशी त्यांनीं तुला मोकळीक दिली. व म्हणूनच आपण आपल्या कर्तव्याची जाणीव राखली. होय ना? मग किशोरच्या बाबतींत चक्क विरोधाचं धोरण ठेवून कसं चालेल ?"

" पण, आम्हांला तुझी ही निवड मान्य नाहीं, तरीसुद्धां तुला हवं तसं तूं कर असं आपण किशोरला सांगितलं तर ती खुशाल स्वतःच्या इच्छेसारखं करून मोकळी होईल! "

" असं म्हणतेस ? पण आपण विरोधाचं धोरण जरी स्वीकारलें तरीहि ती हट्टाला पेटून तसंच करील! "

" हं– " एक निःश्वास सोडून कुंदाताईनीं म्हटलें, " मग, ह्याला उपाय काय ? "

" उपाय ? तिचं मन वळवावयाचें–"

" आणि वळेल तिचं मन ? "

" प्रयत्न करणं आपलं काम आहे ना ? "

प्रभाकरपंतांच्या ह्या प्रश्नात्मक सूचनेवर क्षणभर विचार करून कुंदाताई म्हणाल्या, " बरं, मग केव्हां करणार प्रयत्न ? शक्य तों लौकर केलेला बरा. आतांच बोलवूं तिला ?"

" आतां? हो, काय हरकत आहे म्हणा ! ठीक, बोलव तिला इथें!" प्रभाकरपंतांनीं असें म्हणतांच कुंदाताईंनीं दाराबाहेर जाऊन हांक मारली, " किशोर, अग किशोर, जरा इकडे येतेस ? "

हांकेसरशीं किशोर आपल्या खोलीच्या दारांत येऊन म्हणाली, " काय आई ? कशाला बोलावलंस मला ? "

" इकडे ये बरं जरा थोडं काम आहे. जणूं कांहीं सर्वसाधारण कामासाठींच किशोरला हांक मारीत असल्याचा कुंदाताईनीं आविर्भाव केला व आईच्या पहिल्या हांकेसरशींच किशोरचें हृदय धडधडूं लागलें होतें तरी आई सहजच हांका मारीत आहे असें वाटल्याचा तिनेंहि आविर्भाव आणला.

मात्र आईच्या मागोमाग खोलींत पाऊल टाकतांना आपल्या वक्षस्थळावर डावा हात टेकून तिनें एकवार जोरानें श्वास घेतला.

आंत आल्यावर संवयीनुसार ती वडिलांच्या शेजारीं कोचावर बसणार होती पण तितक्यांत थबकून उभी राहिली.

त्याबरोबर प्रभाकरपंतांनीं म्हटलें, " ये ना पोरी, बस इथं. " व मग किशोर शेजारीं बसतांच ते म्हणाले, " किशोर, एका—एका—मुसलमान तरुणाबरोबर लग्न करण्याची तुझी इच्छा आहे हें मला तुझ्या आईकडून आतांच कळलं. किशोर, ह्या लग्नाविषयीं तूं सर्व बाजूंनीं नीट विचार केला आहेस कां ? "

" सर्व बाजूंनीं कसला विचार बाबा ? आम्हांला दोघांनाहि हा विवाह पसंत आहे. "

" पण पोरी, मला आणि तुझ्या आईला तो पसंत नाहीं. मुसलमानाशीं विवाह !—हं ! किशोर, आपल्या हिंदुधर्माविषयीं जी जात नेहमीं तुच्छता दाखविते त्या जातींत तूं जाणार? किशोर, तुझ्या आईनें व मीं जातिभेद दूर सारला हें तुला ठाऊकच आहे. तूंहि तसं केलंस, हिंदूंपैकीं

कुठल्याहि जातींतील तरुणाची तूं निवड केली असतीस तरी आम्हीं मोठ्या आवडीनें संमति दिली असती!"

"पण बाबा, तुम्हीं एकवार जातिभेदाच्या रूढीचें उल्लंघन केलेंच आहे. मग मीं त्याच रूढीचें दुसऱ्या तऱ्हेनें उल्लंघन केलं म्हणून काय हरकत आहे?"

"किशोर, रूढीचें उल्लंघन नव्हे, हें धर्माचें उल्लंघन आहे. आणि तुला आपल्या धर्माचा कदाचित् अभिमान नसेल, पण मुसलमान लोक कडवे धार्मिक असतात! त्या यूसफची मंडळी तुला कधींहि आपुलकीनें वागविणार नाहींत."

"पण आम्हीं दोघं मुळीं वेगळींच रहाणार आहोंत."

"वेडे, पाण्यांत राहून माशांशीं वैर धरून चालतं कां? अग, तुम्हीं वेगळीं जरी राहिलांत तरी वेळीं प्रसंगीं तुम्हांला नातलगांची गरज नाहींच का लागणार? किशोर, हें लग्न तूं आमच्याहि मनाविरुद्ध करणार आणि यूसफच्या नातलगांच्याहि मनाविरुद्ध करणार. अशानें तुम्हांला खरं सुख मिळेल का?"

"बाबा, असं प्रत्येकाचं मन जर संभाळूं पाहिलं तर 'म्हातारा आणि त्याचं गाढव' ह्या गोष्टीसारखी स्थिति व्हावयाची—" किशोर किंचित् चढ्या आवाजांत म्हणाली.

"बरोबर आहे." कुंदाताईनीं ह्यावर योग्यपणें उत्तर केलें, "किशोर, अगदीं खरं आहे तुझं म्हणणं. तूं फालतू लोकांचं मन नको संभाळूं. पण आपल्या आईवडिलांची गणना तूं फालतू लोकांतच करतेस काय? नाहीं ना? मग आमच्या शब्दांवर विश्वास ठेव. बघ, किशोर; ह्या लग्नानें तूं सुखी होणार नाहींस! किशोर, प्रत्येक मनुष्यप्राण्याला निरनिराळीं कर्तव्यें असतात! प्रत्येक माणूस आपल्या आईवडिलांचें, आपल्या देशाचें, आपल्या धर्माचें देणें लागत असतो! हीं देणीं योग्य तऱ्हेनें दिल्यानेंच मनुष्याला खरं सुख लागतं. आपल्या सदसद्विवेकबुद्धीची टोंचणी नसली म्हणजेच मनाला खरं समाधान लाभतं! किशोर, तूं हीं सारीं देणीं झुगारून देणार, साऱ्या कर्तव्यांना फांटा देणार?—नि तरीहि सुखाची आशा करणार?"

कुंदाताईंच्या ह्या बोलण्यावर किशोरनें लगेच उत्तर दिलें नाहीं. क्षण-भर थांबून ती म्हणाली, पण आई, असं जर सर्वांकडे लक्ष देत राहिलं तर सुखाची आशाच नको! कारण अशानें आपल्या मनासारखं कधींच होणार नाहीं."

" अंहं, किशोर, तूं थोडा घोंटाळा करते आहेस. आपल्या कर्तव्यांची जाणीव बाळगल्यानें माणसाला नेहमींच आपल्या मनासारखं वागतां येत नाहीं हें खरं आहे. पण म्हणजे अशानें त्याला सुख कधींच मिळणार नाहीं हें तुझं म्हणणं चुकीचं आहे. किशोर आपलीं कर्तव्यें यथायोग्य बजावि-ल्यानें सुख मिळविण्याची पात्रता आपल्या अंगीं येते व मग आपल्याला सुख मिळतं."

" मग आतां तुमच्या मनाप्रमाणें वागावयाला जर मी तयार झालें तर मला कसलं सुख मिळणार?" किशोरनें ठसक्यांत प्रश्न केला.

" आपल्या आईवडिलांना आपल्यापेक्षां अधिक समजतं, तेव्हां त्यांच्या सांगण्याप्रमाणें वर्तन करून आपलं कर्तव्य आपण बजाविलं ह्या जाणिवेनें तुला सुख नाहीं का मिळणार?" कुंदाताईनीं मृदु स्वरांत म्हटलें.

त्यावर कांहींशा त्राग्यानें किशोर उत्तरली, "पण आई, स्वतःच्या सुखा-पेक्षां आईवडिलांच्या सुखाची किंमत जास्ती कशी वाटेल ग!"

" पण बाळ, सर्वांच्या भावना दुखवून, आपल्या माणसांचीं मतें व प्रेम झुगारून देऊन हा धर्मबाह्य विवाह केल्यानें तुला तरी खरं सुख कसं मिळेल? किशोर, मुसलमान माणसें अतिशय चमत्कारिक असतात. त्यांना धर्माचें व्यसन, नव्हे, वेड असतें. तुला तीं माणसं कधींहि आपली म्हण-णार नाहींत. तूं आमची लाडकी मुलगी असल्यामुळें तूं कांहीं केलंस तरी आम्ही तुला टाकणार नाहीं. परंतु आपल्या समाजाची सहानुभूति मात्र तूं कायमची गमावशील. बरं, मुसलमानी समाजांतहि तूं नीट मिसळली जाणार नाहींस. मिळून हेंहि नाहीं आणि तेंहि नाहीं अशी स्थिति होईल तुझी! हिंदुधर्म तुला आपली म्हणणार नाहीं आणि मुसलमानी धर्म तुला आपला वाटणार नाहीं." कुंदाताई किती कळवळून बोलत होत्या.

किशोरच्या मनावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील?

तिनें एक मंद सुस्कारा सोडला. व क्षणभर थांबून ती म्हणाली, “ पण आई, आपण एवढी धार्मिक आहों कुठें ? ”

“ किशोर, आपण फार धार्मिक नसलों तरी आपल्या अंतःकरणांत धर्माची अखंड जागृति असते ! फार कशाला ? मला असं सांग, तूं कांहीं निव्वळ शाकाहारी नाहींस. मांसाहार तुला चालतो, पण गोमांसभक्षण करवेल तुझ्यानें ? ”

कुंदाताईच्या ह्या प्रश्नानें किशोरचें अंग सहजस्फूर्तीनें शिरशिरलें. त्याबरोबर कुंदाताई म्हणाल्या, “ पाहिलंस ? मी म्हणतें ती धर्माची जागृति हीच बरं ! आणि ही जागृति जोंवर तूं नामशेष करून टाकली नाहींस तोंवर हिंदुधर्माचा तुला विसर पडणं शक्य नाहीं. त्याचप्रमाणें किशोर, हेंहि तूं लक्षांत ठेव कीं, आपल्यावर निःसीम प्रेम करणाऱ्या आईवडिलांच्या मतांची जर तुला किंमत वाटली नाहीं तर आमच्याकडून प्रेमाची अपेक्षा करण्याचा अधिकारहि तुला रहाणार नाहीं. आणि आम्हीं जरी तुझ्याशीं पूर्ववत् प्रेमानें वागलों तरी तुझ्या हृदयाला ही जाणीव होत राहिल्यानें तूं आमच्याकडे पूर्वीइतक्या मोकळेपणानें वागूं शकणार नाहींस. आमच्यावर, आमच्या प्रेमावर तुझी आतांसारखी सत्ता उरणार नाहीं. अशा रीतीनें सर्व बाजूंनीं जें तुझें नुकसान होईल त्याची भरपाई यूसफच्या व तुझ्या परस्परांवरील प्रेमानें होईल काय ? यूसफचं तुझ्यावर खरं प्रेम आहे ? त्याच्या प्रेमाची तूं कधीं छाननी केली आहेस ? किशोर, तुझ्यासाठीं तो आपल्या धर्माचा त्याग करील ? ”

कुंदाताईनीं विचारलेल्या ह्या प्रश्नांपैकीं एकाचेंहि किशोरनें उत्तर दिलें नाहीं.

तिची चर्या उतरली होती व डोळेहि पाण्यानें भरले होते.

आपल्या भाषणाचा परिणाम झाला आहे हें कुंदाताईनीं ओळखलें; व म्हणून त्या व प्रभाकरपंत गप्प राहिलीं.

जरा वेळानें किशोर कंपित स्वरांत म्हणाली, “ पण आई, तुमच्याबद्दलच्या माझ्या कर्तव्याची जर मीं जाणीव बाळगली तर यूसफबद्दलच्या कर्तव्याची काय वाट ? ”

" पण किशोर, तें तुझें खरें कर्तव्य आहे अशी तुझी खात्री आहे काय ? किशोर, आमच्या मागें तूं फक्त यूसफच्या प्रेमावर जगूं शकशील काय ? कारण आम्हीं आहों तोंवर आपला समाज तुला विशेष त्रास देणार नाहीं. पण नंतर तुला आपल्या समाजांत कोणीं थारा देणार नाहीं. आणि तूं मुसलमानी धर्माची दीक्षा घेतल्याखेरीज तुला त्या समाजांतहि स्थान मिळणार नाहीं. तेव्हां सांग, आमचा आधार तुटल्यावर तूं निव्वळ यूसफच्या प्रेमाच्या आधारावर आनंदांत आयुष्य घालविशील काय ? "

आधीं विचारलेल्या ह्या प्रश्नाचा पुनरुच्चार करून कुंदाताई थांबल्या. व त्यांनीं किशोरकडे पाहिलें.

किशोरच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. तें पाहून कुंदाताईंचें मातृ-हृदय व्यथित झालें. त्या चट्दिशीं किशोरजवळ गेल्या व त्यांनीं तिला हृदयाशीं घट्ट धरलें.

पांच दहा क्षण किशोर आईच्या हृदयावर मस्तक टेंकून राहिली.

व नंतर तिनें पट्दिशीं डोळे पुसले. व जवळजवळ धांवत ती आपल्या खोलींत निघून गेली.

## १४ : : पुढें काय ?

त्या रात्रीं कुंदाताईंना एक क्षणभरसुद्धां झोंप लागली नाहीं. रात्रभर त्यांच्या डोळ्यांसमोर किशोरविषयींचे विचार नाचत होते.

आतां पुढें काय ही कल्पना त्यांना व्यथित करीत होती व मधून मधून त्यांना स्वतःच्या प्रेमकहाणीची आठवण येत होती.

—आपलें प्रभाकरपंतांवर प्रेम जडलें त्यावेळची त्यांना आतां आठवण आली. आपलें तें गुपित त्या सुनंदाआक्कामार्फत आईवडिलांना कळविणार होत्या आणि तितक्यांत त्या आजारी पडल्या. जाणतेपणीं हाच मोठा आजार त्यांना आल्यामुळें त्यावेळीं त्यांच्या आईनें त्यांची जी निरलस शुश्रूषा केली ती त्यांच्या अंतःकरणावर फार बिंबली व त्याचमुळें प्रभाकर-पंतांबरोबर विवाह होणें आईवडिलांना नापसंत आहे हें पुढें कळतांच आपल्या कर्तव्याची जाणीव बाळगून त्यांनीं आईवडिलांच्या इच्छेला मान दिला !

मग—मग—किशोरहि अशी कर्तव्याची जाणीव नाहीं का बाळगणार ? किशोरच्या वडिलांनीं व आपण आजवर तिच्याविषयींचें आपलें कर्तव्य चोख बजाविलें मग आतां तिच्याकडून आपण तशी अपेक्षा करूं नये कां ?

पण आईवडिलांचें आपल्यावर किती निःसीम, निःस्वार्थी प्रेम आहे हें किशोरला नीट कळत असेल काय ?

हं !—कुंदाताईच्या मनांत आलें, तहानभूक विसरून आपल्या आईनें आजारांत आपली शुश्रूषा केलेली पाहून आपल्याला आईच्या अगाध

प्रेमाची जणूं अधिक ओळख पटली! मग काय? किशोरवर तसा प्रसंग आल्यावांचून तिला आपल्या प्रेमाची ओळख पटणार नाहीं !

आपल्या ह्या कल्पनेनें कुंदाताईंना तशा स्थितींतहि हंसूं आलें.

असे मोजून मापून का कुठें प्रसंग घडवून आणतां येतात ? छेः ! आजार ही नैसर्गिक घटना आहे ! एवढेंच-नव्हे तर ती घटना प्राप्त होणें मनाला नेहमींच दुःखदायक वाटत असतें ! मग असलीं ही दुःखदायक घटना कृत्रिम उपायांनीं निर्माण करण्याचें 'विकतचें श्राद्ध' हवेंसें कसें वाटेल ?—

तेव्हां बऱ्याच विचाराअंतीं कुंदाताईंनीं ही कल्पना दूर सारली !

पण तेवढ्यानें कुठें भागत होतें ? पुढें काय ?—हा प्रश्न होताच ना ?

कुंदाताईंनीं व प्रभाकरपंतांनीं ह्यावर खूप विचार केला. कुंदाताईंनीं बाबासाहेबांचा व सुभद्राबाईंचाहि विचार घेतला. पण कांहीं उपाय सुचेना !

त्यामुळें कुंदाताई भारी बेचैन झाल्या. त्या बाह्यतः सर्व व्यवहार करीत होत्या. पण त्यांचें चित्त कशांतहि लागत नव्हतें.

किशोरकडे वागण्याची आपली पद्धत मात्र त्यांनीं मुळींसुद्धां बदलली नाहीं. त्या तिच्याकडे पूर्वीसारख्याच व पूर्वींइतक्याच प्रेमानें वागत. आपल्याला नापसंत असलेला विवाह करण्याची तिची इच्छा असल्यामुळें तिच्यावरील आपलं प्रेम कमी झालं आहे असंहि त्यांनीं दर्शविलं नाहीं व उलट पक्षीं, तिनें हा विवाह केल्यास ती केवढ्या मोठ्या मातृप्रेमाला मुकणार हें दाखविण्यासाठीं तिच्यावर मुद्दाम अधिक माया करावयालाहि त्यांनीं सुरुवात केली नाहीं !

त्या नेहमींप्रमाणेंच तिच्याबरोबर बोलत, हंसत, काम करावयाला तिची गरज भासल्यावेळीं तिला हांका मारीत व तिचें कांहीं चुकल्यास त्या नेहमीं-प्रमाणेंच तिला समजावून सांगत, अगर प्रसंगीं रागाचा एकादा दुसरा शब्द बोलत !

पण आपल्या ह्या वागण्याचा किशोरवर कसा काय परिणाम होत आहे हें मात्र त्यांना कळेना !

हल्लीं कांहीं दिवस किशोरच्या वागण्यांत झालेला फरक त्यांच्या लक्षांत

आला होता व त्याचें कारणहि त्यांनीं अचूक ताडलें होतें. पण आतां तिच्या ह्या वागण्याचें कांहीं त्यांना नीटसें आकलन होईना!

एकाद्या वेळीं किशोर घरांत अतिशय प्रेमानें वागे. आपलें घर, आपले आईवडील व आपला भाऊ एवढ्यांतच सारें जग सांठवलें आहे असेंच जणूं ती मानते आहे असें कुंदाताईंना अशा वेळीं वाटे व त्या आनंदित होत.

तर लगेच घटकाभरांत तिची लहर फिरे. ती मग तासन्‌तास आपल्या खोलींत बसून राही. कुणाशीं बोलत नसे कीं, कशांतहि भाग घेत नसे. अशा वेळीं कुंदाताईंचें मन भारी कष्टी होई!

अशा वेळीं त्यांच्या मनांत येई, आपलं चुकत तर नाहीं ना? हिंदु-धर्माशीं, आपल्या संस्काराशीं, भावनांशीं व रीतिरिवाजांशीं पूर्ण विसंगत असणारा हिंदु-मुसलमान विवाह करणें अयोग्य आहे हें किशोरला पटविण्याचा आपण प्रयत्न केला तें गैर तर नव्हे ना?

आजवर आपल्या मुलांचें चुकल्यावेळीं आपण त्यांना सुधारून घेतलें—पण—पण—त्या चुका व्यवहारांतील होत्या. आणि आतां ही हृदयाची—भावनेची बाब आहे! मग अशा प्रसंगीं मुलांच्या भावनांवर आईवडिलांनीं दाब ठेवणें योग्य कीं अयोग्य?—

पण आपल्या आईवडिलांनींहि आपल्या बाबतींत असंच केलं. त्यांनीं आपल्याला प्रभाकरपंताबरोबर विवाह करण्याची मनाई केली नव्हती! व आपणहि किशोरला यूसफबरोबर विवाह करण्याची मनाई केलेली नाहीं—

त्यासंबंधीं आपलें मत आपण सांगितलें व अशा विवाहानें ‘न अत्र न परत्र’ अशी स्थिति होऊन कुठल्याच समाजांत तिला थारा मिळणार नाहीं ही शंका आपल्याला रास्त वाटली म्हणून आपण तिला त्या बाबतींत सावध केलें. मग त्यांत गैर काय?—

पण आपल्या विवाहाला आधीं असेंच प्रतिकूल असलेलें आपल्या आईवडिलांचें मत शेवटीं अनुकूल झालें ना? मग आपलेंहि मत तसेंच पालटेल!

लाडक्या लेकीचें हृदय दुःखानें व्यथित झालेलें पहावेनासें होऊन तिला हा विवाह करण्याची परवानगी देणार काय?—

असा विचार मनांत आल्यावेळीं कुंदाताई बेचैन होत. असले हे उलट सुलट विचार त्यांना सतावून सोडत. पुढें काय?—हें त्यांना कळेनासें होई!--शेवटीं निसर्गावर सर्व भार टाकून, ज्यावेळीं जशी बुद्धि सुचेल तसें वागण्याचें त्यांनीं ठरवून टाकलें!

## १५ : : "धर्मासाठीं धर्मत्याग!"

आणि हेंच ठीक झालें. कारण कांहीं वेळीं असें होतें कीं, एखाद्या गोष्टीविषयीं आपण एकसारखा विचार करीत राहिल्यानें कांहींच सुचेनासें होतें व मग विचार करण्याचें थांबविलें कीं लगेच उपाय सुचतो!

कुंदाताईचें असेंच झालें! किशोरला जें सांगावयाचें होतें तें त्यांनीं सांगून टाकलें होतें. आतां एकसारखें तेंच तें सांगत सुटल्यानें फायद्यापेक्षां तोटाच अधिक होणार हें त्या समजून होत्या.

तरीसुद्धां किशोरला दुसऱ्या कुठल्या तरी मार्गानें पुनः एकवार धोक्याची सूचना द्यावी असें त्यांना वाटत होतें. पण तो मार्ग सुचत नव्हता.

आतां त्यांनीं त्या बाबतींत विचार करण्याचें सोडतांच त्यांना चट्दिशीं मार्ग सांपडला!—

आपल्याकडे येणाऱ्या 'समाज' मासिकाच्या अंकांत हिंदु–मुसलमान विवाहावर एकादी लघुकथा लिहून प्रसिद्ध करावी व त्यामध्यें असल्या विवाहाचें दुःखपर्यवसान योग्य स्वरूपांत दाखवावें असें त्यांनीं ठरविलें. आपल्या आईच्या अंगांतील उपजत वक्तृत्वकलेविषयीं व लेखनकलेविषयीं किशोरला अत्यंत आदर वाटत असल्यामुळें असल्या लघुकथेचा विच्यावर खास परिणाम होईल अशी त्यांना खात्री वाटली.

झालं! ही कल्पना मनांत येतांच कुंदाताईनीं 'धर्मासाठीं धर्मत्याग' ह्या शीर्षकाची एक लघुकथा लिहून काढली. लघुकथेचा वर्ण्य विषय सध्यां त्यांच्या फार जिव्हाळ्याचा असल्यामुळें कथा सुंदरच वठली.

प्रभाकरपंतांना ती वाचून दाखवून त्यांनीं संपादकाकडे धाडून दिली.

'समाज' मासिकाचे संपादक सुधारकी मताचे होते. परंतु नवमत-वादाच्या नांवाखालीं हल्लीं समाजांत बोकाळलेला बेछूटपणा त्यांना संमत नसल्यामुळें ह्या विषयाचा उहापोह करणारी असली लघुकथा त्यांना हवीच होती. पुढील आठवड्यांत प्रसिद्ध होणाऱ्या अंकांत त्यांनीं ती छापूनहि टाकली.

अंक रीतीप्रमाणें कुंदाताईकडे पोस्टानें आला. त्या अंकांतील एका सुंदर कथेच्या लेखिका म्हणून मुखपृष्ठावरच कुंदाताईचें नांव छापलें होतें.

कुंदाताईनीं स्वतः गोष्ट वाचून काढली. व किशोर कॉलेजांतून येतांच तिच्या दृष्टीला पडेल अशा बेतानें त्यांनीं अंक दिवाणखान्यांतील टेबलावर ठेविला.

त्यांच्या अपेक्षेप्रमाणें किशोरनें घरीं आल्याबरोबर तो पाहिला व कुंदा-ताईंना तिनें हंसून म्हटलें, "वाः आई, कधीं लिहिलीस तूं लघुकथा ? मला बोललीहि नाहींस."

"तूं अभ्यासाच्या गडबडींत होतीस म्हणून नाहीं बोललें" असें कुंदा-ताई पुटपुटल्या व नंतर म्हणाल्या, "चहा तयार आहे. तो आधीं घे चल."

अंक आपल्या खोलींतील खुर्चीवर टाकून किशोरनें हातपाय धुऊन चहा घेतला व लगेच ती खोलींत आली.

किशोरला लहानपणापासून ललितवाङ्मयाच्या वाचनाचा खूप नाद असल्यामुळें नव्या कादंबऱ्या व मासिकाचे ताजे अंक वाचावयाला ती सदा टपलेली असे.

आतां आपल्या खोलींतील टेबलाशीं बसून तिनें अंक उघडला व क्षण-भर पानें चाळून तिनें हवी होती ती लघुकथा काढली.

'धर्मासाठीं धर्मत्याग' हें कथेचें शीर्षक वाचून तिला गंमत वाटली. आंतील विषयाची कांहींच कल्पना नसल्यामुळें कुंदाताई बहुशः लिहीत तसलीच ही एखादी विनोदी कथा असेल असें मनांत येऊन तिला मौज वाटली. तिच्या चर्येवरहि स्मितरेखा प्रकटली.

व मग खुर्चीवर सोईवार बसून तिनें कथा वाचण्यास सुरवात केली.

"धर्मासाठीं धर्मत्याग!"

"वेस्टर्न इंडिया टेनीस टुर्नामिंट्समध्यें नांव दाखल करावयास गेल्यावेळीं तिनें प्रथम त्याला पाहिलें. तोहि टुर्नामें ट्समध्यें भाग घेणार होता.

तिनें लेडीज् सिंगल्समध्येंच भाग घेतला होता. व त्यानेंहि फक्त मेन्स सिंगल्समध्यें भाग घेतला होता.

पुरुष–भागीदाराच्या अभावीं तिला व स्त्री–भागीदाराच्या अभावीं त्याला मिक्स्ड् डबल्समध्यें भाग घेणें शक्य नव्हतें.

तिथला नांवें नोंदविणारा इसम त्या दोघांना उद्देशून सहज म्हणाला, "मग तुम्हीं दोघं भागीदार होऊन मिक्स्ड डबल्समध्यें नांवं कां घालीत नाहीं?"

तिनं हळूंच त्याच्याकडे पाहिलें व त्याचवेळीं त्यानेंहि तिच्याकडे पाहिलें.

दोघं पट्दिशीं हंसलीं व नांवें नोंदविणाऱ्या माणसाच्या सूचनेनुसार त्यांनीं मिक्स्ड डबल्समध्यें आपलीं नांवें दाखल केलीं.

टुर्नामिंट्समध्यें त्या दोघांचा खेळ इतका सुंदर जमला कीं, पुढें संसाराच्या खेळांतसुद्धां तसाच जम बसविण्यासाठीं आपण आजन्म भागीदार व्हावें असें त्यांना वाटूं लागलें!

पण–पण–ती हिंदू होती व तो मुसलमान होता—"

हें वाक्य वाचतांच किशोर दचकली. तिनें एक आवंढा गिळला व बसल्या जागींच किंचित् चाळवाचाळव केली.

—दाराआडून तिच्याकडे लक्षवूर्वक पहाणाऱ्या कुंदाताईची मुद्रा किंचित् भयभीत झाली.

क्षणभर थांबून किशोरनें पुढें वाचावयास सुरुवात केली.

"त्या उभयतांच्याहि मंडळींना हा विवाह पसंत नव्हता. पण त्यांनीं वडील माणसांकडून हट्टानें परवानगी मिळविली. मात्र ती देतेवेळीं तिच्या मंडळींनीं अट घातली कीं, तिनें हिंदुधर्माचा त्याग

करितां कामा नये. व त्याच्या माणसांनींहि त्याला मुसलमानी धर्म न बदलण्याबद्दल निक्षून सांगितलें.

रजिस्टर्ड विवाह करण्यापूर्वी त्या दोघांनीं एकमेकांना ह्या अटी सांगितल्या व त्यांनीं परस्पर अनुमतीनें ठरविलें कीं, बस्स ! प्रेमापुढें कशाचीच किंमत नाहीं. आपल्याला धर्माची मुळींच गरज नाहीं. आपल्या विवाहानंतर हिंदुधर्म व देव किंवा मुसलमानी धर्म आणि कुराण वगैरेंचा घरांत उच्चारहि करावयाचा नाहीं !

आणि ह्या ठरावानुसार, विवाहानंतरचें एक वर्ष सुरळीतपणें पार पडलें. व त्या सुमाराला तिला मुलगा झाला. व तो तीन महिन्यांचा झाल्यावर गोंवरानें फार आजारी पडला.

डॉक्टरी उपचार, औषधपाणी, अविश्रांत खटपट व अलोचन जाग्रणें करून मुलगा बरा झाला व त्या उभयतांच्या श्रमांचें सार्थक झालें.

पण त्यांचा हा आनंद फारसा टिकला नाहीं. आतांशीं तीं दोघेंहि चिंताक्रांत दिसूं लागलीं. एकमेकांकडे पूर्वीप्रमाणें प्रेमानें वागणें तर राहोच, पण नुसतं बोलण्याचीसुद्धां शक्य तों टाळटाळी सुरूं झाली.

महिना, दीड महिना असा गेला. व शेवटीं एक दिवस ती त्याला म्हणाली, ' हें पहा, माझ्या हातून एक अपराध घडला आहे. विवाहानंतर आपापल्या देवाधर्मांचा घरांत उच्चारहि करावयाचा नाहीं असं ठरलं होतं. आपला बाळ आजारी पडल्यावेळीं मीं तें सारं विसरलें. बाळाला बरं वाटलं म्हणजे गणेशचतुर्थीच्या दिवशीं तुला सोन्याच्या मोदक वाहीन असा मी गणपतीला नवस केला. आणि बाळाचं जास्ती झालं त्या दिवशीं मी चोरून मारुतीला जाऊन आलें. मला स्वतःसाठीं धर्माची व देवाची गरज वाटली नाहीं. पण—पण बाळासाठीं वाटली. नि संकटप्रसंगीं देवाचा धांवा केल्यावांचून राहणं शक्य नाहीं हें मला पटलं.'

'आणि मलाहि तें पटलं,' तो उत्तरला, 'बाळ आजारी असतांना मीसुद्धां पीराला नवस बोललों होतों आणि तुला चोरून मी रोज सकाळीं व संध्याकाळीं निमाज पढत होतों. आणि त्यामुळें माझ्या मनाला केवढा तरी धीर वाटला. तूं म्हणतेस तें खरं आहे. जन्मापासून आपल्या अंगांत धार्मिकता एवढी मुरलेली असते कीं संकटप्रसंगीं आपापल्या देवधर्मांचा आधार घेतल्यावांचून रहावत नाहीं.'

धर्मत्याग करून माणसाचं चालत नाहीं हें त्यांना पटलं! लहानपणापासून मनावर बिंबलेले धार्मिक संस्कार घालवूं म्हटल्यानें जात नाहींत हें त्यांना समजलं !

धर्म हवा!—देव हवा!—पण हिंदुधर्माचा त्याग करून मुसलमानी धर्म स्वीकारावयाला ती तयार नव्हती. आणि—आणि—तो तर कडवा मुसलमान होता! आपला पवित्र इस्लामी धर्म सोडून हिंदूंचा—काफर लोकांचा— धर्म ग्रहण करण्याची कल्पनाहि त्याला सहन होत नव्हती!

अशा रीतीनें कुणीहि नमतें घेईना. त्या उभयतांमध्यें रोज कुरापती व धुसफूस होऊं लागली. आपल्या बाळाला दोन्हीपैकीं कोणत्या धर्माची दीक्षा द्यावयाची ह्याबद्दल तर सारखे वाद चालत व शेवटीं भांडणावर मजल येई!—

त्यांचे हे हाल पाहून त्यांच्या हितेच्छूंनीं घटस्फोट करून मोकळं होण्याची त्यांना सूचना दिली.

आणि कित्येकांनीं कुचेष्टेनें सुचविलं कीं, आपापल्या देवाधर्मांच्या आधाराविना जीवन कंठणें शक्य नाहीं. हें जर त्यांना आतां पटलं आहे तर हिंदु व इस्लामी हें दोन्ही धर्म बाजूला ठेवून त्यांनीं दोघांनींहि ख्रिस्ती धर्म स्वीकारावा!

धर्मासाठीं धर्मत्याग करावा!

ही सूचना हास्यास्पद होती. पण त्या उभयतांची स्थितिहि हास्यास्पदच झाली होती. घटस्फोट किंवा धर्मासाठी धर्मत्याग हे दोनच मार्ग त्यांना मोकळे होते!"

गोष्ट वाचून संपतांच किशोरनें आपलें मस्तक बाहूंवर टेकलें. तिचे डोळे पाण्यानें भरले होते. तिनें डोळे मिटतांच २।४ अश्रू तिच्या गालावर ओघळले.

हलक्या पावलांनीं आंत आलेल्या कुंदाताईंनीं स्नेहभरानें तिच्या मस्तकावर हात ठेवला. त्यासरशीं किशोरला हुंदका आला.

तिनें आईच्या कमरेला मिठी मारली व ती स्फुंदत स्फुंदत म्हणाली, आई, आई, माझी स्थितिहि अशीच होईल काय ग ? ”

कुंदाताई शहाण्या होत्या. किशोरनें यूसफबरोबर लग्न केलें तर तिची स्थितिसुद्धां अशीच होईल, तिच्या भावनाप्रवण, प्रेमळ हृदयाला असाच ताण बसेल अशी त्यांची खात्री असूनहि त्या उघड तसें बोलल्या नाहींत.

किशोरच्या कपाळावरील केंस बाजूला सारून त्यांनीं प्रेमपूर्वक तिचें चुंबन घेतलें व मन मोकळें करावयाला तिला एकांत मिळावा म्हणून त्या खोलीबाहेर गेल्या.

## १६ : : संकट टळलें, पण—

सुमारें अर्ध्या तासानें तोंडावरून पाण्याचा हात फिरवून किशोर कुंदा-ताईकडे आली.

किशोरनें अर्धवट शिवून टाकलेला ब्लाऊज पुरा करीत कुंदाताई बसल्या होत्या. किशोर येऊन जवळ बसतांच त्या म्हणाल्या, " किशोर, मघां सुधाकर विचारत होता कीं, फिरावयाला जावयाचें कीं काय ? पण मला कंटाळल्यासारखें झालें आहे म्हणून मी नको म्हटलें."

वास्तविक कुंदाताईंना फिरावयाला जावयाचा कंटाळा आला नसून किशोरला फिरावयाला जाण्याची इच्छा नसेल असें वाटल्यामुळें त्यांनीं सुधाकरला कांहीं तरी निमित्त सांगितलें हें किशोरनें ओळखलें.

आईचा हा प्रेमळ दूरदर्शीपणा पाहून किशोरचें हृदय भरून आलें.

कुंदाताईच्या खांद्यावर हात ठेवीत ती मृदु स्वरांत म्हणाली, " आई, तुझ्या त्या लघुकथेनें माझे डोळे चांगले उघडले. आई, युसफ़सुद्धां तस्सा कडवा मुसलमान आहे. तो आपल्या धर्माचा त्याग कधींहि करणार नाहीं आणि मलाहि आपल्या हिंदु धर्माचा तितकाच अभिमान आहे. तेव्हां—तेव्हा—आई, तूं आणि बाबा काळजी करूं नका. मी हा विवाह करणार नाहीं."

किशोरनें आपण होऊन असें सांगतांच कुंदाताईंना अतिशय समाधान वाटलें. पण हल्लीं बरेच दिवस चिंतेनें भारावलेल्या त्यांच्या अंतःकरणाला आनंदाचा हा आवेग इतका असह्य झाला कीं, त्यांच्या तोंडून शब्दच

फुटेना. त्यांनीं आपल्या खांद्यावरील किशोरचा हात उचलून आपल्या हृदयावर ठेविला. जणूं कांहीं, आपल्या हृदयांतील भावना तिच्या हाताला स्पर्शानें त्या समजावीत होत्या.

आणि किशोरलाही त्या समजल्या कीं काय कोण जाणे! ओंठावर थरथरणारा निःश्वास दाबून तिनें हंसण्याचा प्रयत्न केला. व अभ्यासाची सबब सांगून ती आपल्या खोलींत परत गेली.

संकट तर टळलें. कुंदाताईंना व प्रभाकरपंतांना अत्यानंद झाला.

पण किशोरच्या हृदयाला फार खोल जखम तर झाली नसेल ना ह्या आशंकेनें तीं दोघें बेचैन झालीं.

अपत्यवात्सल्य ही भावनाच अजब आहे. ह्या वात्सल्यापायीं मातृहृदय 'आनंदेंहि रडतें, दुःखांत कसें तें होई' असें गडकऱ्यांनीं अगदीं यथार्थ वर्णन केलें आहे!

मातृहृदयाच्या ह्या असल्या हळुवार भावनाप्रवणतेमुळें त्या रात्रीं कुंदाताईंनीं व्यथित अंतःकरणानें प्रभाकरपंतांना विचारलें, "किशोरच्या मनावर नि शरीरावर ह्याचा विपरीत परिणाम तर नाहीं ना होणार?"

कुंदाताईच्या ह्या प्रश्नानें प्रभाकरपंतहि विचारांत पडले. कुंदाताईप्रमाणें त्यांनाहि भय पडलें कीं, संकट टळलें पण त्याचा परिणाम जाचक होणार काय?—

आणि त्याचवेळीं त्यांना आठवण आली कीं, आपल्या आईवडिलांच्या मनाविरुद्ध जावयाचें नाहीं असें ठरविल्यानंतर कुंदाताई भारी नाराज झाल्या होत्या, त्यांची चर्या कोमेजून गेली होती—

व मग कुंदाताईंनीं पुनः जेव्हां विचारलें कीं, "हें काय? माझ्या प्रश्नाचें उत्तर नाहीं दिलें? सांगावं ना, माझं लाडकं फूल कोमेजेल काय?" तेव्हां त्यांनीं उत्तरादाखल म्हटलें, "तुला काय वाटतें? कुंदे, तुझ्यावर असाच प्रसंग आला होता."

"होय. नि त्यावेळीं मला विलक्षण दुःख झालं होतं. आपल्याबरोबर

विवाह होणं शक्य नसेल तर कुणाबरोबरच विवाह करावयाचा नाहीं असं मीं ठरविलं होतं. मग काय? किशोरहि तसाच निश्चय करील?" कुंदा-ताईनीं केंविलवाण्या स्वरांत शेवटला प्रश्न केला.

त्यानंतर लहान मुलाची समजूत घालावी तशा स्वरांत प्रभाकरपंत म्हणाले, "मला नाहीं तसं वाटत. कारण यूसफच्या प्रेमासाठीं आजन्म अविवाहित रहावयाला जर किशोर तयार झाली तर त्याच्या प्रेमासाठीं तुझी व माझी इच्छा झुगारून द्यावयालाहि ती तयार झाली असती. पण तिचं प्रेम तितकं उत्कटहि नाहीं आणि तितकं उच्छृंखलहि नाहीं. तेव्हां कांहीं दिवसांनीं तिला त्याचा विसर पडेल!"

आपल्या पतिराजांच्या निरीक्षणशक्तीवर कुंदाताईंचा दृढ विश्वास होता. आतां प्रभाकरपंतांनीं केलेलें किशोरविषयींचें विवेचन त्यांना पटलें व त्या म्हणाल्या, "तसंच होवो बाई! नि खरंच, किशोर जर आक्काच्या प्रभा-कराबरोबर लग्न करील तर किती चांगलं होईल!"

"अंहं कुंदे, त्या बाबतींत मात्र आपण मुळ्ळीं ढवळाढवळ करावयाची नाहीं बरं. तशानें किशोर बिचकून जावयाची कदाचित्?"

"छेः छेः, मी आपण होऊन कशी त्यांत पडेन? मी त्यासंबंधीं पूर्ण काळजी घेईन."

आणि म्हटल्याप्रमाणें कुंदाताईनीं खरोखरीच पूर्ण काळजी घेतली.

यूसफबरोबर होऊं पहाणाऱ्या विवाहाचें संकट टळलें तसें किशोरच्या हृदयाला कायमची जखम होण्याचें संकटहि टळावें म्हणून त्यांनीं खूप जपलें.

त्या हल्लीं किशोरला सहसा एकटी बसूं देत नसत. अभ्यास आटोपून ती गप्प बसली आहे असें वाटलें कीं, त्या सहज म्हणून मुद्दाम तिच्याशीं गप्पा मारावयाला तिच्या खोलींत तरी जात किंवा तिला बाहेर तरी बोलावीत.

सुधाकराला युसफप्रकरणाविषयीं कांहींच ठाऊक नव्हतें. पण त्याचें आपल्या ताईवर स्वभावतःच फार प्रेम असल्यामुळें घरीं असल्यावेळीं तो नेहमींच तिच्या भोंवतीं भोंवतीं असे.

मिळून किशोरची आई, भाऊ व वडील तिच्यासाठीं आपापल्या परीनें झटत होतीं.

व त्याचें सार्थक झालें. किशोर पूर्वीसारखी बोलकी, हंसरी बनली नाहीं तरी निदान दुःखी कष्टी तरी झाली नाहीं.

कुंदाताईचें लाडकें फुल उत्फुल्ल झालें नाहीं तरी मलूलहि बनलें नाहीं!

आणि ढळढळीत दुःखापेक्षां सुखाचा मिळमिळीत अभाव खूप बरा ह्या न्यायानें कुंदाताईनीं वस्तुस्थितींत समाधान मानून घेतलें!

———

## १७ : : हवाच बिघडली?

ह्यानंतर सुमारें ८।१० दिवसांनीं तिसऱ्या प्रहरीं हेमलता कुंदाताईंच्या घरीं आली.

शाळेंतून आल्यावर विजयेला घरीं एकटें वाटेल म्हणून हेमलता कधींहि तिसऱ्या प्रहरीं बाहेर पडत नसे. ह्यावरून कुंदाताई तिला कितीतरी चिडवीत पण हेमाताईंचें आपलें होतें तें खरें!

विजया शाळेंतून येण्याऱ्या वेळीं घरीं हजर रहावयास मिळावें म्हणून हेमाताई भर दुपारीं उन्हाची मैत्रिणींकडे जात असे.

तेव्हां आज ह्या नियमाला अपवाद होतांच कुंदाताईंना फार आश्चर्य वाटून त्या म्हणाल्या, "ओहो, हेम, हें काय बाई नवल? चार वाजले कीं ग आतां. आणखी अर्ध्या तासांत तुझी विजया येईल ना घरीं!"

"होय," हेमाताईनें इतकें त्रोटक उत्तर दिलेलें पाहून कुंदाताईंनीं चकित होऊन तिच्या चर्येकडे लक्ष्यपूर्वक पाहिलें. व मग मृदु स्वरांत विचारलें, "हेम, काय झालयं ग?"

"काय सांगणार कुंदाताई? बघ, विजयेची मॅट्रिकची परीक्षा २–३ महिन्यांवर आली आहे. तेव्हां मला वाटलं कीं पोरगी अभ्यासांत दंग असणार. पण काल मला कळून आलं कीं, ती प्रेमाचे खेळ खेळण्यांत गुंग झाली आहे! कुंदाताई, काल तिनें मला सांगितलं कीं, त्या मेल्या परेरावर आपलं प्रेम जडलं आहे! आतां काय करूं ग?"

ह्यावर कुंदाताई आश्चर्यानें म्हणाल्या, "काय? १५–१६ वर्षांची

विजया प्रेमाचा धिंगाणा घालूं लागली?"

"होय ग! नि तोसुद्धां एका भिकारड्या ख्रिश्चनबरोबर!"

"हं! म्हणजे हल्लीं हवाच बिघडली आहे कीं काय?" कुंदाताई उद्गारल्या.

त्यांच्या ह्या उद्गाराचा अर्थ न कळल्यामुळें हेमलतेनें म्हटलें, "हवाच बिघडली आहे म्हणजे? असल्या ह्या घेडगुजरी लग्नांचा हवेशीं काय संबंध?"

"तसं नव्हे ग. पण हल्लीं अशीं लग्नें बरींच झालेलीं ऐकूं येतात. म्हणून मीं म्हटलं कीं, बिघडलेल्या हवेचा तर हा परिणाम नाहीं ना? हवा बिघडली म्हणजे शारीरिक रोग फैलावतात तसा हा मानसिक रोग फैलावला आहे." ज्याला उद्देशून कंदाताईच्या तोंडून एकदम हा उद्गार निघाला त्या किशोरच्या प्रेमकहाणीचा प्रत्यक्ष उल्लेख न करितां त्यांनीं आपल्या भाषणाचा उलगडा करून सांगितला.

पण त्यानें समाधान न होऊन हेमलता म्हणाली, "कदाचित् असेलहि तसं पण म्हणून काय ? त्यावर उपाय सुचीव कीं एखादा."

"उपाय ?—हें· बघ हेम, ह्याच विषयावर 'समाज' मासिकाच्या ताज्या अंकांत माझी एक लघुकथा प्रसिद्ध झाली आहे. आणि—आणि—माझ्या ओळखीच्या एका मुलीच्या डोक्यांतील असल्या विवाहाचें खूळ ही गोष्ट वाचून नि माझ्याशीं त्या बाबतींत वादविवाद करून नाहींसें झालें!"

"खरं ? कोण मुलगी ग ही ? "

हमेलतेला किशोरचें नांव कळविण्याची कुंदाताईची मुळींच इच्छा नव्हती. पण सपशेल खोटं बोलणंहि त्यांच्या जीवावर आलं. व आतां काय उत्तर द्यावें अशा पेंचांत त्या पडल्या.

परंतु हेमलतेनेंच त्यांची सोडवणूक केली. 'त्या' मुलीच्या नांवाबद्दल तिनें कुतूहल प्रदर्शित केलें तरी तिचें सर्व लक्ष स्वतःच्या मुलीमध्यें गुंतलें असल्यामुळें लगेच पूर्वपदावर येऊन तिनें म्हटलें, "मग बाई, ती लघुकथा विजयेला तरी वाचावयाला देतें, पण कुंदाताई, तूं तिला चार शब्द सांग हं. अगदीं चांऽगलं लेक्चरच दे."

त्याचवेळीं खोलींत पाय ठेविलेल्या किशोरनें हें शेवटचें वाक्य ऐकून प्रश्न केला, " हेमामावशी, आईनें कुणाला चांऽगलं लेक्चर द्यावं असं म्हणतां तुम्हीं ? "

सध्यां सर्वांकडून सहानुभूतीची अपेक्षा करणाऱ्या बिचाऱ्या हेमलतेनें लगेच उत्तर दिलें, " अग, माझ्या विजयेला हो. किशोर, विजयेला किनई प्रेमाचं वेड लागलंय. एका खिश्चन तरुणावर तिचं प्रेम बसलंय. नि ती . . . .'

पण कुंदाताईंनीं हेमलतेला अधिक बोलूं दिलें नाहीं. तिचें एवढें बोलणें ऐकतांच किशोरचें तोंड उतरलें हें पाहिल्यामुळें त्यांनीं मध्येंच प्रश्न केला, " अग पण, विजयेची नि त्या परेराची ओळख झाली तरी कुठें ?"

"अग, विजयेला गाण्याचा विलक्षण नाद आहेना. म्हणून ह्यांनीं तिच्यासाठीं दोन उत्तम रेडिओचे सेट्स घेतले आहेत. नि तिला त्यांतील माहिती करून देण्यासाठीं म्हणून त्यांतील एका रेडिओ कंपनीमधला हा खिश्चन असिस्टंट मॅनेजर ८।१० वेळां आमच्या घरीं आला. शिवाय, तो राहतोहि आमच्याच बाजूला. त्यामुळें परदेशांतील प्रोग्राम ऐकण्याच्या निमित्तानें वरचेवर तो आमच्याकडे येतो. पण ही कुणाला बाई कल्पना ? कुंदाताई, कालपासून मला नि त्यांना कांहीं सुचत नाहीं. आज तर ते ऑफिसांत सुद्धां गेले नाहींत. आमचा दोघांचा आतां तुझ्यावरच सारा भार आहे !"

"मी तरी काय करणार ग ? मीं सांगितलं ना तुला मघां कीं, आमच्या किशोरच्या एका मैत्रिणीचं असलं वेड दूर व्हावं ह्या हेतूनें मीं एक लघु-कथा लिहिली आहे म्हणून. मग ती हवं तर दे विजयेला वाचावयाला." कुंदाताईंनीं मुद्दामच किशोरच्या समोर पुनः हें बोलून टाकलें. आपली आई ही आपली खरी, विश्वासू मैत्रीण आहे. ती आपलं गुपित केव्हांहि बाहेर फोडणार नाहीं हें तिला कळून यावें हा त्यांचा उद्देश होता व तो सफलहि झाला.

मघां किंचित् उतरलेली किशोरची मुद्रा आतां आईविषयींच्या प्रेमानें व कृतज्ञतेनें उल्हसित झाली. व तें पाहून कुंदाताईंना समाधान वाटलें व त्या भरांत त्या म्हणाल्या, " शिवाय, मीहि तिला सांगून पाहीन. "

"करच तूं तेवढा प्रयत्न. कुंदाताई, तुझं भाषण किती मुद्देसूद आणि सुश्राव्य असतं. मागें घटस्फोट ह्या विषयावर लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या सभासदापुढें तूं किती उत्तम बोलली होतीस तें मला छान आठवत आहे. तेव्हां मीं म्हणतें कीं, आजकाल जें हें धर्मबाह्य विवाहाचं खूळ बोकाळलं आहे त्याला आळा बसावा म्हणून तूं तरुण मुलांमुलींना सभांमधून व्याख्यान दे."

ह्यावर किशोर उत्सुकतेनें म्हणाली, "खरंच आई, हेमामावशी म्हणतात तसं कर तूं. हल्लीं आमच्या कॉलेजांतील किती तरी मुली ख्रिश्चन व मुसलमान तरुणांबरोबर विवाह करण्याच्या बाजूच्या बनल्या आहेत. कांहीं जणी नुसती तोंडानें बडबड करितात. पण कांहीं जणी खरोखरीच तसे विवाह करणार आहेत म्हणे! आई, ह्या मुलींसाठीं खरंच तूं व्याख्यान देशील तर बरं होईल!"

ह्या विषयावर किशोर इतकं मनमोकळं बोलेल अशी कुंदाताईंना कल्पनाहि नसल्यामुळें त्यांना किशोरच्या ह्या भाषणानें फार आनंद वाटला.

मघां हेमलतेनें केलेल्या ह्याच सूचनेकडे त्यांनीं दुर्लक्ष्य केलें होतें. पण आतां त्या लगेच म्हणाल्या, "हो, मी सांगेन कीं चार शब्द. पण कुठल्या क्लबातर्फे बोलावयाचं?"

"आमच्या लेडीज युनियन् क्लबमध्यें तर तूं व्याख्यान देच. नि आई, आमच्या कॉलेजाच्या मराठी वाङ्मयमंडळातर्फें सुद्धां एक व्याख्यान झालं पाहिजे."

"आणि कुंदाताई, गिरगांवांतील स्त्रीसमाजांतहि दे बाई एक. अग, मघां तूं म्हटलेलंच खरं दिसतंय. हल्लीं हवाच बिघडली आहे. तेव्हां म्हटलं डॉक्टरीणबाई, आपण जरा ती शुद्ध करा." हेमलतेच्या ह्या बोलण्यावर कुंदाताई व किशोर मनःपूर्वक हंसल्या.

# १८ : : कुंदाताईंचें लेक्चर !

पुढल्याच आठवड्यांत शनिवारीं संध्याकाळीं लेडीज् युनियन क्लबतर्फे कुंदाताईंचें लेक्चर करविण्याची व्यवस्था किशोरनें केली.

सध्यां किशोर ह्या क्लबाची सेक्रेटरी असल्यामुळें लेक्चरला अवश्य हजर राहण्याबद्दल तिनें सर्व सभासद भगिनींना तर कळविलें होतेंच. पण त्याशिवाय मुंबईतील सर्व कॉलेजांतील विद्यार्थिनींना तिनें आमंत्रण पाठविलें होतें. त्यामुळें क्लबचा नेहमींचा हॉल अपुरा पडणार ही अटकळ तिला होती व म्हणून तिनें ह्या वेळेपुरता मारवाडी विद्यालयाचा हॉल ठरविला होता.

आणि तेंच ठीक झालें. कारण जवळ जवळ ३५०।४०० तरुणी व्याख्यानाला हजर होत्या !

आन्तर्जातीय व आन्तर्धर्मीय विवाह हे विषय हल्लीं तरुण मुलींच्या, विशेष जिव्हाळ्याचे होते ! त्यांतून त्यांना कुंदाताईविषयीं निःसीम आदर वाटत असे ! कुंदाताईंना सामाजिक सुधारणांबद्दल फार कळकळ असून त्या स्वतः त्यांत भाग घेत असतात हें मुंबईतील साऱ्या तरुण पिढीला माहित होतें.

'सरस्वती-मंदिरा'सारखी उपयुक्त शिक्षणसंस्था त्यांनीं काढिली व आज २१।२२ वर्षे ती उत्तम रीतीनें चालविली होती. सध्यांच्या पिढींतील कितीतरी मुलींच्या शिक्षणाचा पाया ह्याच शाळेंत घातला गेला होता.

त्याचप्रमाणें उत्तम लेखिका व व्याख्याती म्हणून कुंदाताई प्रसिद्ध

होत्या. अशा अनेक कारणांमुळें आजचें त्यांचें लेक्चर ऐकण्यासाठीं मुंबईतील बहुतेक साऱ्या तरुण मुली उपस्थित झाल्या होत्या!

शिवाय, कुंदाताईंच्या बऱ्याचशा मैत्रिणीहि आल्या होत्या. मिळून हॉल गच्च भरला होता.

बरोबर पांच वाजतां क्लबच्या अध्यक्षांनीं कुंदाताईचा औपचारिक परिचय करून दिला. नंतर कुंदाताईनीं भाषणाला सुरुवात केली.

आजवर कुंदाताईनीं निरनिराळ्या सभांमधून कितीतरी व्याख्यानें दिलीं होतीं. पण समाजामधील बिघडलेली हवा शुद्ध करण्याची–तरुण पिढीच्या मनोवृत्तीचा ताजवा हल्लीं बेतोल झाला होता तो समतोल करण्याची–जबाबदारी ह्या व्याख्यानावर असल्यामुळें नेहमीं आनंदी प्रसन्न दिसणारी कुंदाताईची मुद्रा आज प्रशांत गंभीर दिसत होती!

भाषण करावयाला त्या उभ्या रहातांच श्रोतृवृंदानें टाळ्यांचा कडकडाट केला. त्याबरोबर कुंदाताईच्या चर्येवर स्मित प्रकटलें.

सभागृह शांत होतांच कुंदाताईनीं किंचित् हंसत बोलावयास प्रारंभ केला.

त्या म्हणाल्या, "प्रिय भगिनींनो, आपल्या क्लबमध्यें तुम्हीं माझं इतकं मनापासून स्वागत केलं हें पाहून मला फार आनंद झाला. व मीं आतां जें तुम्हांला सांगणार आहे तें तुम्हीं लक्षपूर्वक ऐकून घ्याल अशी त्याचमुळें मला आशा वाटते आहे. आणि मुलींनो, हें तुम्हीं लक्ष्यांत ठेवा कीं, प्रेम आणि अगत्य ह्या भावना सापेक्ष असतात! तुम्हांला माझ्याविषयीं प्रेम वाटतं, अगत्य वाटतं—कारण मलाहि तुमच्याविषयीं तसंच वाटतं. आणि म्हणूनच तुमच्या भावी आयुष्याविषयीं मला आस्था वाटते, काळजी वाटते! मुलींनो, तुम्ही बाल्याची सीमा ओलांडली आहे, आतां तुम्ही अविवाहित जीवनाचा उंबरठा ओलांडाल. तो ओलांडतेवेळीं किती अडचणी येतात, किती मोहाचे प्रसंग उभे रहातात! नवखेपणामुळें तुम्हांला ठेंच लागण्याची भीति असते नि म्हणून त्या बाबतींत तुम्हांला थोडया पूर्व सूचना देण्याचा माझा विचार आहे!—

"तुम्हांला ठाऊक असेलच कीं, मी आंतर्जातीय विवाह केला आहे. मी रूढीच्या चाकोरीबाहेर घातलेलें हें पाऊल यशस्वी झालें आहे, कारण

ह्या विवाहाला माझ्या वडील माणसांनीं स्वेच्छेनें संमति दिली होती. तेव्हां हिंदुमधील भिन्न जातींत–ज्या जातींची संस्कृति, रीतिरिवाज, भाषा व राहणी समान आहे अशा जातींमध्यें–विवाह होण्यास हरकत नाहीं असें माझें मत आहे. म्हणजे, मुद्दाम असे विवाह करावे असा निष्कर्ष बरीक काढूं नका हं. माझ्या म्हणण्याचा अर्थ एवढाच कीं, असे विवाह करणें म्हणजे कमी अधिक प्रमाणांतील निर्भेळ दुधाची भेसळ करणें होय. परंतु हल्लीं हिंदु मुली मुसलमान किंवा ख्रिश्चन तरुणांबरोबर विवाह करावयास उद्युक्त होतात हें फार गैर आहे."

हें वाक्य बोलतेवेळीं कुंदाताईंनीं विजयेकडे ओंझरता कटाक्ष टाकला.

विजया तीव्र बुद्धीची असल्यामुळें कुंदाताईंचा शब्दन् शब्द ती लक्ष-पूर्वक ऐकत होती. व आतां त्यांनीं हिंदु–ख्रिश्चन विवाहाचा उल्लेख करितांच ती अधिकच लक्षपूर्वक ऐकूं लागली. मात्र तिच्या बुद्धिमत्तानिदर्शक कपा-ळावर २।४ आंठ्या पडल्या व तिचे टपोरे डोळे किंचित् आकुंचित झाले.

कुंदाताई पुढें म्हणाल्या, " मुलींनों, आपल्या मुलींनीं ख्रिश्चन किंवा मुसलमान तरुणांबरोबर लग्न करणं म्हणजे उत्तम निर्भेळ दुधांत गढूळ पाणी मिसळण्यासारखें आहे. मुलींनो, तुम्हीं विचार करा, ज्या धर्मा-मध्यें तुमचा जन्म झाला त्या धर्माचा तुम्हीं सुखासुखी त्याग करणार? धर्म म्हणजे अशी नको तेव्हां फेंकून देण्यासारखी कां वस्तु आहे? मला ठाऊक आहे, ख्रिश्चन, मुसलमान वगैरे धर्माप्रमाणें आपल्या हिंदु धर्माची व्याख्या किंवा त्यामधील तत्त्वें तोंडपाठ सांगतां येणार नाहींत! पण हिंदु धर्म सांगतां येत नसतो, तो आचरावयाचा असतो! कुणी न सांगतां, न शिकवितां आपल्या रोमरोमांत हिंदुधर्म भिनलेला असतो! असं असून आपल्या धर्माबद्दल तुम्हांला जराहि अभिमान नाहीं? आपल्या धर्माचा त्याग करून तुम्हीं खुशाल मुसलमान अगर ख्रिश्चन धर्म स्वीकारणार?–

" मुलींनों, विचार करा, परधर्मांत विवाह करून तुम्हांला खरं सुख, समाधान लाभेल? तुमच्यांपैकीं एक तरी अशी मुलगी आहे कां कीं, जिला संकटप्रसंगींसुद्धां आपल्या देवाचा धांवा करण्याची आवश्यकता वाटणार नाहीं? असं शक्य तरी आहे? वेळीं प्रसंगीं आपल्या तोंडून ' अग आई

प्रमाणें ‘ अरे देवा ’ हें संबोधन नकळत उमटतें! तें कां? लहानपणा-पासून मनावर झालेल्या संस्कारांचाच ना हा परिणाम? मग ते संस्कार एकदम पुसून जातील का? शक्य नाहीं!

“ शिवाय, असं बघा, मुसलमान लोकांची त्यांच्या धर्मावर केवढी निष्ठा असते! त्यांच्यापैकीं एक तरी चांगल्या, थोर कुळांतील मुलगी आपला धर्म सोडून हिंदु धर्मांत यावयाला, हिंदूबरोबर विवाह करावयाला तयार आहे काय? त्याचप्रमाणें, ख्रिश्चन लोकहि अतिशय धर्मनिष्ठ असतात! मग ह्या दोन जातींपैकीं एकाद्या जातींतील तरुणाबरोबर तुम्हीं जर विवाह केलात तर तीं माणसं तुम्हांला काय किंमत देणार? स्वार्थासाठीं धर्मत्याग करण्याची ही वृत्ति त्यांना किती निंद्य वाटेल? त्यांच्या धर्मनिष्ठे-पुढें तुमची धर्माबद्दलची ही अनिष्ठा त्यांना हास्यास्पद नाही का वाटणार? तुम्हांला ठाऊक आहेना, फितुरी करणाऱ्या माणसाला धड इकडेहि थारा नसतो नि धड तिकडेहि नसतो! त्याचप्रमाणें स्वधर्माशीं फितूर होणाऱ्या माणसांचीहि स्थिति असते! ‘ स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः’ हें अगदीं खरं आहे! तुम्हीं हिंदु धर्म सोडलात कीं त्याचा आधार तुम्हांला दुरावलाच. बरं, नवीन जोडलेल्या धर्माचा आधार तरी काय तुम्हांला मोठासा मिळणार? ज्या धर्मांत तुमचा जन्म झाला ज्यामध्यें तुम्ही लहा-नाच्या मोठ्या झालां तो धर्म भावनेला वश होऊन किंवा मोहाला बळी पडून तुम्हीं जर सोडलांत तर नवीन जोडलेल्या धर्माविषयीं तुम्हांला आस्था वाटेल हें कुणाला तरी पटेल काय?—

“ शिवाय, स्वधर्म, स्वभूमि व स्वभाषा ह्यांचा ओढा कांहीं विलक्षण असतो! परप्रांतांत गेल्यावेळीं आपली भाषा बोलणारा इसम भेटला कीं, त्याच्याविषयीं केवढा जिव्हाळा वाटतो! मग भावनेच्या भरांत तुम्हीं या तिन्हींचा व त्याच्या जोडीला आपल्या निकटच्या आप्तांचा जर प्रेमासाठीं त्याग केलात तर या साऱ्यांच्या आधाराविना तें प्रेम टिकूं शकेल? मुलींनो, आपलेपणाचा महिमा अजब आहे! आणि हें आपलं दुरावलं म्हणजेच त्याची खरी किंमत कळते! विकारवश होऊन तुम्हीं आपला धर्म, आपली भाषा, आपली संस्कृति, आपलीं माणसं ह्या सर्वांना दूर

साराल, पण विकाराचा मोसम सरला म्हणजे याच आपुलकीसाठीं तुम्हीं व्याकुळ व्हाल. विवाह–प्रीतिविवाह हे शब्द दिसावयाला गोड आहेत. पण विवाहित आयुष्य संपूर्ण सुखासमाधानानें घालविणं म्हणजे एक दिव्य आहे. पतिपत्नीचं विशेषतः पत्नीचं चित्त जर शान्त, समाधानी असेल, तिचं हृदय जर तृप्त असेल तरच ती आपला संसार सुखाचा करील!

" आपल्या प्रेमाच्या माणसांच्या इच्छेचा अवमान करून, त्यांना दुःखी करून जर विवाह केला तर त्या पतिपत्नींना खरं सुख कधींच लाभत नाहीं. विकारवश होऊन त्यांनीं ज्या वडीलमाणसांना दुखविलेलं असतं, त्यांच्या कष्टी हृदयाचे तळतळाट त्या उल्टू जोडप्याला भोंवल्याशिवाय रहाणार नाहींत!—ह्यावर तुम्हीं असं म्हणाल कीं, आईवडिलांचं असलं स्वार्थी प्रेम काय उपयोगाचं? मुलं स्वतःच्या इच्छेसारखीं वागलीं तर त्यांना प्रेमानें आशीर्वाद द्यावयाचा आणि इच्छेविरुद्ध वागलीं तर त्यांना शिव्याशाप मोजावयाचे हें आईबापांचं ब्रीद काय?—नाहीं, मुळींच नाहीं! आईबापांची निदान आईची माया तरी निःस्वार्थी असते म्हणतात. कबूल! पण मी म्हणतें तुम्ही जर आईबापांच्या मनासारखं वागणार नाहीं तर त्यांनीं तुमच्या मनासारखं वागावं अशी अपेक्षा करण्याचा तुम्हाला काय हक्क? अं?"

कुंदाताईचा हा मुद्दा श्रोतृवृंदाला फार पटला. कांहीं धीट तरुणींनीं तर टाळ्या देऊन आपली पसंति प्रकट केली.

कुंदाताईनीं मुद्दाम विजयेकडे बघितलें. तिच्या मुद्रेवरील त्रासिक भाव आतां पार मावळला होता. ती हंसत हंसत टाळ्या वाजवित होती. तें पाहून कुंदाताईनीं मंद स्मित केलें. व त्या पुढें बोलूं लागल्या.

"माझा हा मुद्दा तुम्हाला पटला एकूण! छान, तेव्हां माझ्या बोलण्याचं सार हें कीं, आईबापांच्या मनाविरुद्ध तुम्ही वागणार तर त्यांनीं तुमच्यावर तरीहि पूर्ववत् प्रेम करावं असं तुम्ही मानूं नये. आपल्या माणसांना धाब्यावर बसवून, आपल्या धर्माला सोडचिठी देऊन परधर्मीयांबरोबर जर तुम्ही विवाह करणार तर तुमचीं माणसं, तुमचा धर्म तुम्हाला कायमचा मुकला असं मानूनच करा.

इंग्रजीमध्यें एक म्हण आहे कीं ' You can't eat your cake and have it ' म्हणजे आपली खाद्य वस्तु खावयाला तर हवी आणि ती संपतां तर नये असा पोरकट हट्ट तुम्हीं धरलांत तर तो जेवढा तर्कशून्य तेवढाच अव्यवहार्य होईल! असा दोन दरडीवर पाय ठेवून कधींच राहतां येणार नाहीं. तेव्हां बोला, तरीहि तुम्हीं असे परधर्मीयांबरोबर विवाह करणार ? "

सभागृहांमध्यें " नाहीं, नाहीं " असा बराच कोलाहल झाला.

व नंतर एक तरुणी उठून उभी राहिली व म्हणाली, " मला कांहीं विचारावयाचं आहे,"

कुंदाताई हंसून म्हणाल्या, " अस्सं ? मग विचारा कीं."

त्यावर त्या मुलीनें म्हटलें, " म्हणजे असं पहा, आम्हीं कॉलेजांत जातों, तिथें निरनिराळ्या जातीच्या तरुणांशीं आमची मैत्री जुळते. त्यांतील एकाद्या मैत्रीची परिणति कदाचित् प्रीतींत होणं शक्य आहे. आणि जर कां परधर्मी तरुणांवर प्रीति बसली तर काय करावयाचं ?"

" बरोबर आहे तुमची शंका." कुंदाताई सौम्य स्वरांत उत्तरल्या, " पण असं बघा, एकाद्या तरुणावर प्रीति बसण्यापूर्वी त्याची जात, पात, नांवगांव तर तुम्हांला ठाऊक असतं ना ? मग परधर्मीय तरुणांबरोबर मैत्रीसुद्धां न करण्याची खबरदारी आधींपासूनच घ्यावी! नाटकांतून व कादंबऱ्यांतून प्रथमदर्शनीं प्रेम जडल्याचीं उदाहरणें असतात! पण आजकालच्या बुद्धिप्रधान युगांत असं होत नाहीं. आधीं बुद्धीला पटतं नि मग हृदयाला आवडतं. व पुढें हृदय बुद्धीला जुमानेनासं होतं. म्हणजे आधीं बुद्धीच्याच स्वाधीन सारं असतं. तेव्हां ज्या गांवाला आपल्याला जावयाचंच नाहीं त्याच्या नांवाची चौकशी तरी कशाला करावयाची ? अं ? आतां ह्या बाबतींत मुलींच्या मातांना ह्याच्याहि आधीं खबरदारी घेतां येईल! पण तो विषय वेगळा आहे. मुलींनो, आज मीं तुम्हांला ज्या धोक्याच्या सूचना दिल्या आहेत त्या नीट लक्ष्यांत ठेवा. तुमच्या मातांनाहि मीं ह्या बाबतींत थोडं फार सांगणार आहे. असं बघा, तुम्हां पोरींबद्दल मला फार सहानुभूति वाटते. मीहि एका कालीं ह्याच पंथांतील होतें हें माझ्या चांगलं लक्ष्यांत आहे. त्यामुळें मुलींनीं चांगलं वागलं

पाहिजे असा त्यांना उपदेश करितेवेळीं मुलींच्या मातांनीं त्यांना चांगलं वागविलं पाहिजे हेंहि मी समजून आहे व म्हणून तुमच्या वतीनें तुमच्या मातांना मीं ४।२ सूचना देणार आहे बरं, तुम्ही कांहीं काळजी करूं नका. तुम्हीं आपल्या कर्तव्याची जाणीव बाळगा म्हणजे तुमचे आईवडील स्वतःच्या कर्तव्याची जाणीव निःसंशय बाळगतील हें मी स्वानुभवानें सांगतें ! ”

एवढें बोलून कुंदाताई खालीं बसल्या. त्यांच्या व्याख्यानावर सर्व मुली बेहद्द खूष झाल्या होत्या. विशेषतः त्यांनीं शेवटीं जो त्यांच्याबद्दल ‘ पोरी ’ ह्या आपुलकीच्या शब्दानें निर्देश केला तो सर्वजणींना फारच आवडला.

व्याख्यानाचा विषय, व्याख्यात्याची विद्वत्ता व भाषणशैली ह्या तिन्हीं-पेक्षां व्याख्यात्याला विषयाबद्दल वाटणाऱ्या जिव्हाळ्याचा श्रोतृवर्गावर अधिक परिणाम होतो !

कुंदाताई आपल्या विषयाशीं तद्रूप होऊन बोलल्या. त्यांनीं भाषणांत सांगितल्याप्रमाणें एका काळीं त्याहि ह्याच पंथातील होत्या ह्याची आठवण ठेवून बोलल्या व म्हणून त्यांचें भाषण सर्वांना एवढें पटलें.

‘ लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण ’ ह्या वर्गातील कुंदाताई नव्हत्या. त्यांच्या भाषणांत जिव्हाळा होता, कळकळ होती, जिवंतपणा होता. त्यामुळें आपल्या वक्तृत्वाच्या सिंचनानें नव्या जोमाच्या, नव्या विचाराच्या, नव्या पिढींतील तरुणींना त्यांनीं तात्काळ ‘ आपणासारखें ’ केलें !

## १९ : : लेक्चरचे परिणाम!

सभागृहांतील सर्वच मुलींवर कुंदाताईंच्या लेक्चरचा चांगला परिणाम झाला, पण किशोरवर फारच झाला!

यूसफ प्रकरणापासून किशोर मधूनमधून थोडी नाराज, उदास होई. परंतु कुंदाताईंचें हें लेक्चर ऐकल्यापासून तिची ही वृत्ति पार मावळली. तिला आपल्या आईबद्दल अधिकच प्रेमादर वाटूं लागला!

आपल्यापेक्षां आई कितीतरी अधिक शहाणी व अनुभवी आहे. तेव्हां ती सांगते तें योग्यच असणार अशी आतां किशोरची नीट समजूत पटली.

व लेक्चरच्या दुसऱ्याच दिवशीं सकाळीं ती कुंदाताईंना म्हणाली, " आई, सुधारकांवर एक नेहमींचा आक्षेप असतो कीं ते इतराना सुधारणा शिकवितात, स्वतःच्या घरीं मात्र त्या सुधारणांचा वासवाराहि नसतो! पण आई, हा आक्षेप तुझ्या बाबतींत नाहीं हं लागूं होणार! नव्या पिढींतील तरुणींच्या चित्तावर आलेलं मोहपटल दूर सारण्याचा काल तूं प्रयत्न केलास. आणि माझी खात्री आहे कीं, पुष्कळच मुलींच्या बाबतींत तो यशस्वी होईल! ही झाली घराबाहेरील सुधारणा! पण आई, आपल्या लेक्चरनें तूं घरांतहि मोठीच सुधारणा घडवून आणलीस! आई, तूं व बाबांनीं मला जो उपदेश केला तो ऐकून व तूं लिहिलेली लघुकथा वांचून मी त्या मोहापासून परावृत्त झालें खरी. पण तुझ्यावर नि बाबांवर मीं थोडी नाराज बरीक झालें होतें, थोडी रुसलें होतें. मला वाटलं कीं, स्वतःला अनिष्ट वाटणारी गोष्ट मीं करूं नये हा तुमचा निव्वळ वडिलकीचा अट्टाहास आहे!

पण आई, कालच्या तुझ्या लेक्चरनें माझा तो भ्रम दूर झाला. तूं घराबाहेर घडवून आणलेल्या सुधारणेपेक्षां ही घरामध्यें घडवून आणलेली सुधारणा मला अधिक मोलाची वाटते! आई, आतां माझी पूर्ण खात्री झाली कीं, स्वतःला अनिष्ट वाटणारी घटना टाळण्यापेक्षां माझ्यावरील अरिष्ट टाळण्याची, माझं अनिष्ट होऊं नये म्हणून जपण्याची एकमेव इच्छाच तुझ्या व बाबांच्या अंतःकरणांत होती! आई, आई—"

एवढें बोलून किशोरनें मोठ्या प्रेमानें आईच्या गळ्यांत हात घातला.

किशोरची ही कबुली ऐकून व हा प्रेमळ आविर्भाव पाहून कुंदाताईंना अत्यानंद झाला!

मोठ्या आवडीनें व श्रमानें लावलेल्या रोपट्याची सुंदर वेल झाली म्हणजे माळ्याला केवढें सानंद समाधान वाटतें. मग इतक्या कसोशीनें प्रेमानें संगोपन केलेली पोटची पोर शहाणीसुर्ती निपजली म्हणजे त्या प्रेमळ आईबापांना केवढें समाधान वाटत असेल!—किती आनंद होत असेल!

त्या रात्रीं कुंदाताईंना आनंदामुळें झोंपसुद्धां आली नाहीं. मनुष्यस्वभावाची, त्यांतून स्त्रीस्वभावाची मौजच अशी असते कीं, कुठल्याहि भावनेचा अनपेक्षित आवेग त्यांना बेचैन करितो!

किशोर युसफबरोबर लग्न करणार असें वाटल्यावेळीं भीतीनें, दुःखानें कुंदाताईंना झोंप आली नाहीं आणि आतां तें संकट पूर्णपणें टळलें ह्या आनंदामुळें त्यांना झोंप लागली नाहीं.

व मग झोंपेच्या अभावामुळें डोळे चुरचुरताहेत अशी सकाळीं हंसत हंसत त्यांनीं प्रभाकरपंतांकडे तक्रार केल्यावेळीं प्रभाकरपंतांनीं म्हटलें, वेड्याच असतां तुम्हीं बायका! दुःखामुळें झोंपेला व्यत्यय येणं साहजिक आहे म्हणतों मी. पण आनंदामुळें झोंपायचं नाहीं!—हं! काय खुळेपणा हा!"

"हो तर!" कुंदाताईंनीं हंसून उत्तर केलें, "आम्ही स्त्रिया अशा भावनाप्रवण असतों म्हणून तुमच्या संसारांत आम्ही तद्रूप होतों बरं. लग्न होतांच माहेरच्या माणसांना सोडून आम्हीं सासरीं जातों नि तिथें पतिराजांच्या माणसांशीं, त्यांच्या आवडीनिवडीशीं ह्या भावनाप्रवणतेमुळेंच समरस होऊं शकतों."

" अगदीं खरं बोललीस कुंदे. स्त्रीहृदयाच्या ह्या हळुवार प्रेमळतेबद्दल ह्या निःस्वार्थी वृत्तीबद्दल आजवर कितीतरी वेळां मीं मनाशीं कौतुक केलं आहे. कुंदे, आईबाप, बहीणभाऊ, वगैरे निकटच्या आप्तांविना पोरका जीव मी. आपला विवाह होतांच स्नेहाला भुकेलेल्या माझ्या हृदयावर तूं पत्नीच्या प्रीतीचाच नव्हे तर मातेच्या वात्सल्याचा आणि भगिनीच्या मायेचासुद्धां अखंड वर्षाव केलास ! कुंदे, तुझ्या ह्या प्रेमळतेची ... "

" इश्श ! पुरे कीं आतां हें स्तुतिपुराण ! " कुंदाताई लाजून मध्येंच पुटपुटल्या. व प्रभाकरपंतांनीं तेंच पुराण ' पुढें चालू ' करूं नये म्हणून त्या पुढें म्हणाल्या, " खरंच, आपली किशोर भारी समजूतदार झाली आहे नाहीं अलीकडे ? आणि, खरं सांगूं, यूसफच्या त्या भानगडीपासून किनई मला ती पूर्वीपेक्षांहि प्रिय वाटूं लागली आहे. जणूं कांहीं, ती आपल्याला सोडून जाणार होती तें टळल्यामुळें ती आतां, नव्यानें मला मिळाली आहे. असं वाटतंय मला ! "

आणि हेमलतेलाहि आपल्या विजयेच्या बाबतींत थेट अस्सेंच वाटत होतें !

कुंदाताईंच्या लेक्चरचा विजयेवर इष्ट परिणाम झाला. तिनें घरीं गेल्याबरोबर परेराविषयींचा आपला मोह दूर झाल्याची कबुली आईकडे दिली. मात्र आपल्या अहंमन्य वृत्तीला साजेशी भाषा वापरावयाला ती विसरली नाहीं.

ती म्हणाली, " हें बघ आई, तूं व कुंदामावशी इतकं सांगतां आहां तेव्हां तुमचं ऐकावं असं ठरवलंय मीं. परेराबरोबर नाहीं करणार मी लग्न. —हं, हं, इश्श ! आई, हें ग काय ? केस विसकटले ना माझे—"

आपण परेराबरोबर लग्न करणार नाहीं ही लेकीच्या तोंडची सुवार्ता ऐकतांच बिचाऱ्या हेमाताईला एवढा आनंद झाला कीं, त्या भरांत तिनें लाडक्या लेकीला मोठ्या प्रेमानें जवळ ओढलें.

पण किती तरी मेहनतीनें विजयेनें बसविलेले केंस त्या गडबडींत बिघडल्यामुळें तिनें त्याबद्दल नाखुषी व्यक्त केली. व मग समोरील लंबवर्तुळ आरशांत पाहून केंसांवर नाजुक चापट्या मारून ते ठाकठीक करीत ती

म्हणाली आणि आई "उद्यां दोनप्रहरीं आपण कुंदामावशीकडे जाऊंया. हो, त्यांनाही सांगून टाकतें हें. म्हणजे आपल्या श्रमाचें सार्थक झालें म्हणून बिचारीला खूप आनंद वाटेल !"

आपण परेराबरोबर लग्न करण्याचा विचार सोडून दिला हा आपल्या आईवर व कुंदाताईंवर जणू मोठाच उपकार केला आहे असा स्पष्ट ध्वनि विजयेच्या त्या शब्दांतून निघत होता. पण हेमाताईला त्याबद्दल काहींच वाटलें नाहीं.

लेकीचें तें विवाहाचें वेड दूर झालें ह्या आनंदापुढें त्यांना दुसरें कांहींच सुचत नव्हतें.

विजयेनें ठरविल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं दोनप्रहरीं त्या मायलेकी कुंदाताईकडे आल्या.

आज रविवार असल्यामुळें कुंदाताई व प्रभाकरपंत आणि दोन मुलें मिळून मजेनें पत्ते खेळत बसलीं होतीं.

पण वडील माणसांची भीडभाड धरणें विजयेला कधीं ठाऊकच नसल्यामुळें खोलींत शिरतांच ती उच्च स्वरांत म्हणाली " कुंदामावशी, तुमचं कालचं लेक्चर मला फार पटलं नि म्हणून परेराबरोबर लग्न न करण्याचं ठरविलं मीं."

विजयेची बोलण्याची ही पद्धत ऐकून कुंदाताईंना मौज वाटली. अति लाडानें विजया शेफारली आहे हें ठाऊक असल्यामुळें कुंदाताईंना तिचा राग न येतां कींव आली.

त्या हंसून म्हणाल्या, " होय ना ! वाः ! आमची विजया तशी शहाणीच आहे ! आणि हें बघ बाळ, तुझी मॅट्रिकची परीक्षा आतां जवळ आली आहे नि तूं चांगली हुशार आहेस. तेव्हां सध्यां अभ्यासाशिवाय इतर कुठें लक्ष घालूं नकोस. मनांत आणलंस तर तूं खात्रीनं आपल्या शाळेचें नांव काढशील ! "

कुंदाताईनीं विजयेचा ' वुइक पॉइंट ' तर बरोबर ओळखला. त्यांनीं विजयेला अशी चढवितांच ती खूष होऊन उत्तरली, " हो, हो, मीं आतां अगदीं सप्पाटून अभ्यास करणार ! "

आणि मग सहामाही परीक्षेंत आपल्याला इंग्रजीमध्यें सर्वांहून अधिक मार्क कसे मिळाले, फ्रेंचमध्यें तर आपली प्रगति किती उत्कृष्ट आहे, आपल्या वर्गांत मुलगे व मुली मिळून ६७ असतांहि आपला नंबर पहिला अगर क्वचित् दुसरा कसा असतो, वगैरे वस्तुतः खऱ्या गोष्टी तिनें मोठ्या घमेंडींत सांगण्यास सुरवात केली.

व त्यांत ती एवढी रंगली कीं, घरीं जातांना निरोप घेतेवेळीं जेव्हां कुंदाताईंनीं प्रिलिमिनरींत तिचा पहिला नंबर यावा अशी इच्छा प्रदर्शित केली तेव्हां तुच्छतादर्शक स्मित करीत विजया उत्तरली, " हुं ! त्याबद्दल शंकाच नको. गेल्या १।२ महिन्यांत मी तितकंसं लक्ष दिलं नाहीं म्हणून. आतां बघा तर खरं, अहो, प्रिलिम्‌मध्येंच काय, मॅट्रिकमध्येंसुद्धां मीं पहिली येईन. "

आणि हें बोलतांना तिची मुद्रा कांहींशी मिजासखोर झाली तरी इतकी अल्लड व हंसरी दिसत होती कीं, एका वेळीं कुठल्या तरी एकाच भावनेच्या आहारीं जाण्याची तिची वृत्ति जितकी वाईट तितकीच बरीहि म्हटली पाहिजे असेंच कुंदाताईंना वाटलें.

कारण नुक्ती, ती पररोच्या प्रेमांत सर्वस्वीं गुरफटली होती—आणि आतां तें प्रेम दूर सारावयाचें असा निश्चय करितांच ती लगेच तितक्याच एकाग्रतेनें आपल्या अभ्यासांत गुरफटून गेली !

आणि ह्या तिच्या कांहींशा एककलीपणाच्या जोडीला उच्च महत्त्वाकांक्षाहि असल्यामुळें मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तम यश मिळविण्यासाठीं ती आतां खरोखरीच प्रयत्न करील असें मनांत येऊन कुंदाताईंना समाधान वाटलें !

' उथळ पाण्याला खळखळाट ' ही म्हण फक्त उथळ पाण्यालाच लागू न होतां मनुष्यप्राण्याच्या उथळ मनोवृत्तीलाहि लागू पडते !

जिथें उथळ विद्वत्ता असते तिथें वावदूकपणा आढळून यतो !

जेव्हां राजस विकारांचें आकर्षण मनाला मोह पाडतें तेव्हां त्या-बद्दलच्या लांबलांब वल्गना ऐकूं येतात !

—म्हणजे मानवी हृदयाला जेव्हां कोणताहि उथळ मनोविकार स्पर्श करितो तेव्हां मोठा थोरला खळखळाट करून माणसं त्याचें प्रदर्शन करितात !

पण त्यांच्या हृदयाला जेव्हां एकादा सखोल विकार भिडतो तेव्हां हा उथळ खळखळाट बंद पडतो ! व हृदय खोल पाण्याप्रमाणें स्थिर गंभीर बनतें !

आणि ह्या गांभीर्याचा परिणाम वाचेवर होऊन खऱ्या, निःसीम प्रीतीची ओळख पटलेली व्यक्ति अबोल बनते !

सुनंदाआक्काचा थोरला मुलगा प्रभाकर जात्या जरा अबोल होताच परंतु त्याच्या ह्या स्वभावतः अबोल वृत्तींतहि हल्लीं कांहीं तरी विशेष फरक झाला आहे हें कुंदाताईच्या लक्षांत येऊन चुकलें होतें !

दर ८।१० दिवशीं कुंदाताईकडे येत असूनहि प्रभाकर कधींहि मनमोकळें बोलत नसेच ! परंतु हल्लीं २।४ महिने तो आणखीच गप्प गप्प असतो; आपण होऊन तर तो बोलत नाहींच पण दुसऱ्या कुणीं प्रश्न विचारला

तर उगीचच केवढ्यांदा दचकतो व मग आपलें हें अनवधान कुणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून लौकर लौकर सांवरून घेण्याचा प्रयत्न करितो हें कुंदाताईंनीं पाहून ठेविलें होतें !

परंतु ह्याच सुमाराला कुंदाताईंचें सारें चित्त किशोरकडे वेधलें असल्यामुळें प्रभाकराच्या वृत्तींतील ह्या फरकाकडे लक्ष जाऊनहि दुर्लक्ष करणें त्यांना भाग पडलें होतें !

तेव्हां आतां सारं स्थिरस्थावर झाल्यामुळें संधि मिळतांच प्रभाकराला ह्याबद्दल उघड विचारण्याचें त्यांनीं ठरविलें.

आणि आज तशी योग्य संधिहि मिळाली. प्रभाकरपंत अद्यापि घरीं आले नव्हते व किशोर आणि सुधाकर आजोळीं गेलीं होतीं.

कुंदाताईंनीं आईवडिलांच्या प्रकृतीबद्दल वगैरे विचारलेल्या प्रश्नांना प्रभाकरानें नेहमींप्रमाणें जेवढ्यास तेवढीं उत्तरें दिलीं. व तो खालीं मान घालून बसला.

आतां मुख्य मुद्द्यावर कसें यावें हा प्रश्न कुंदाताईंच्या मनांत घोळूं लागला.

शेवटीं कांहींतरी बोलावयाचें म्हणून त्या म्हणाल्या, "प्रभाकर, तूं आलास पण किशोर व सुधाकर आतांच आईकडे गेलीं आहेत."

हें बोलतेवेळीं कुंदाताईंची नजर सहजच प्रभाकराच्या चर्येवर स्थिरावली असल्यामुळें किशोरच्या नामोच्चारासरशीं त्याच्या मुद्रेंत चलबिचल झाली हें त्यांच्या ध्यानांत आलें.

व चट्कन कांहींएक कल्पना मनांत येऊन त्या स्वतःशींच किंचित् हंसल्या व त्यांनीं पुनः प्रभाकराकडे पाहिलें.

वाऱ्याच्या अकस्मात् झुळुकीनें इतस्ततः उडणारे कागदाचे कपटे भराभरा आंवरण्याचा प्रयत्न करावा त्याप्रमाणें किशोरच्या नामोच्चारासरशीं आपल्या चर्येवर विखुरलेले मनोविकार आंवरण्याचा प्रभाकर प्रयत्न करीत होता. पण तो एक विचार आंवरावयाला जाई तर दुसरा अधिक ठळकपणें चर्येवर बिंबित होई अशी बिचाऱ्याची त्रेधा उडाली होती.

व ती पाहून कुंदाताईंना आणखीच हंसूं आलें. व त्यांनीं हंसत हंसत

म्हटलें, " प्रभा, ऐन चोरी करतांना चोराला पकडलं म्हणजे तो जसा गोंधळून जातो तसा तूं कां बाबा गोंधळला आहेस ? अं ? प्रभा, तूं नाहीं ना कुठें चोरीबिरी केलीस ?- कीं– तुझी कुणीं चोरी केली आहे ? होय ? "

कुंदाताईंना चेष्टा करण्याची भारी लहर आली होती. प्रभाकर त्यांचा फार लाडका भाचा होता व आतां त्याचें गुपित जें त्यांनीं शोधून काढलें त्याचें स्वरूप कुंदाताईंना इष्ट असेंच असल्यामुळें त्या खूप आनंदल्या होत्या.

प्रभाकरानें त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं नाहींत. पण त्याच्या हंसऱ्या, लाजऱ्या मुद्रेनें कुंदाताईंना सगळें सांगितलें.

मोठ्या कौतुकानें प्रभाकराच्या त्या धांदलीचें निरीक्षण करीत कुंदाताई त्याच्याजवळ येऊन बसल्या व प्रेमळ स्वरांत म्हणाल्या, " प्रभा, माझ्या-जवळ लपवालपवी करतोस ? "

क्षणभर विचार करून प्रभाकर उत्तरला, " मावशी, तुला सारं कळलंच आहे, मग लपवालपवी काय करणार ? "

" एकूण, तुझं किशोरवर प्रेम आहे तर ? "

" होय मावशी, आज किती तरी दिवस मीं किशोरवर प्रेम करीत आहे. " हें बोलतांना प्रभाकराची चर्या किंचित् लाजरी झाली तरी त्याच्या स्वरांत मनाचा निश्चय व अंतःकरणांतील प्रेम भरून राहिलें होतें.

प्रभाकराच्या ह्या उत्तरानें कुंदाताईंना अतिशय समाधान वाटलें. प्रभाकराबरोबर आपल्या लाडक्या किशोरचा विवाह व्हावा अशी त्यांची दृढ इच्छा होती. आणि ती पुरी होण्याची अर्धी संधि तर आतां मिळाली!

प्रेमभरानें प्रभाकराच्या पाठीवरून हात फिरवीत त्या म्हणाल्या, " प्रभा, किशोरचा तुझ्याबरोबर विवाह व्हावा हीच माझीहि इच्छा आहे. पण काय रे, हें तूं आजवर उघड कां बोलला नाहींस ? "

" मावशी, किशोर व मीं मावसभावंडं लागतों. आणि मावसभावंडांचें लग्न होत नाहीं ना ? "

" अरे, आजकाल जिथें हव्या त्या जातींमध्यें लग्नं होताहेत तिथें मावसभावंडांच्या लग्नाला कसला प्रत्यवाय ? "

—हें बोलतांना आपली किशोरहि वेगळ्या जातींत–नव्हे, वेगळ्या धर्मांत लग्न करणार होती ह्याची आठवण होऊन कुंदाताईंचा आवाज किंचित् कंपित झाला.

पण तशाच स्थितींत त्यांनीं म्हटलें, “प्रभा, हें कांहीं खरं कारण नव्हे. होय ना ?”

खालीं मान घालून प्रभाकर उत्तरला, “होय– अं– म्हणजे, किशोरचं माझ्यावर प्रेम असेल असं मला वाटत नव्हतं नि म्हणून मीं आजवर गप्प बसलों.”

प्रभाकरानें दिलेल्या ह्या उत्तरावर पुनः प्रश्न विचारावा कीं न विचारावा असा कुंदाताईंना पेंच पडला.

पण शेंकडा नव्याण्णव माणसं जरी सत्याकडे डोळे उघडून पहाण्यापेक्षां तिकडे डोळेझांक करणारींच असतात. तरी कुंदाताई उरलेल्या एका शेंकड्यांतील होत्या व म्हणून प्रभाकराला ह्याहून अधिक स्पष्ट सवाल करण्याची जरी त्यांना भीति वाटत होती तरी सत्याचें नीट आकलन होणेंच हितकारक वाटून त्या म्हणाल्या, “प्रभा, किशोरचं तुझ्यावर प्रेम नसेल असं का वाटत होतं तुला ?”

कुंदाताईंनीं स्पष्ट प्रश्न विचारला पण प्रभाकर त्याचें स्पष्ट उत्तर देऊं शकला नाहीं. त्याची सुस्वभावी प्रेमळ चर्या व्यथित झाली. आपलें ओंठ त्यानें गच्च दाबून धरल्यामुळें जात्या विशेष रुंद नसतांहि त्याचा जबडा रुंद व भव्य दिसत होता.

नेहमीं सपाट असणाऱ्या त्याच्या भालप्रदेशावर आंठ्यांच जाळं पसरलं होतं—व मनांत उचंबळणारे विचार अनावर होऊं लागल्यामुळें कीं काय त्याचा गळा फुगल्यासारखा दिसत होता—

कुंदाताईंनीं मृदु स्वरांत पुनः प्रश्न केला, “प्रभा, खरं काय असेल तें सांग मला. त्यामुळें मला राग नाहीं कांहीं येणार. हं, सांग बरं.”

प्रभाकरानें एक दीर्घ निःश्वास सोडला व हातांच्या मुठी गच्च आंवळीत तो अर्धस्फुट स्वरांत म्हणाला, “किशोरचं कॉलेजांतील एका मुलावर प्रेम जडलं आहे हें मला ठाऊक होतं–”

प्रभाकर असें उत्तर देणार ही कल्पना असूनहि आतां हे शब्द ऐकतांच कुंदाताई दचकल्या.

प्रभाकराच्या चर्येकडे त्या टक लावून पहात होत्या–त्याचें किशोरवरील दृढ प्रेम व त्या पायीं तो भोगीत असलेल्या मनोयातना त्याच्या चर्येवर यथार्थ उमटल्या होत्या.

कुंदाताईचें हृदय भरून आलें. त्या कंपित स्वरांत म्हणाल्या, "प्रभा, किशोरविषयींची ही बातमी तूं मला आजवर कशी कळविली नाहींस?"

"अं—किशोर स्वतःच तुला तें सांगेल अशी माझी खात्री होती—"

"तें खरं. पण तूं व तो तरुण ह्या दोघांमध्यें आम्हीं निवड करावी ह्या हेतूनें तूं तें आमच्या कानांवर कसं घातलं नाहींस?"

"मावशी, तूं माझी हीच किंमत केलीस? किशोरच्या माघारीं मीं तिच्याविषयीं तुला अशा चहाड्या सांगेन असं वाटलं तुला? शिवाय, तिनें होऊन जर त्या तरुणाला पसंत केलं तर तिथं काय करावयाचं! मावशी, माझं किशोरवर निःसीम प्रेम आहे पण तिला त्याची कल्पनाहि नाहीं. तिचं त्या–त्या तरुणावर प्रेम आहे.—"

"प्रेम आहे नव्हे, प्रभा, प्रेम होतं! त्या तरुणावर आपलं प्रेम आहे असा किशोरला मोह पडला होता. पण तो आतां दूर झाला. तिच्या वडिलांचं व माझं सांगणं तिला पटलं. आणि तिनें तो नाद सोडला.—"

कुंदाताईचे हे शब्द ऐकतांच प्रभाकराच्या चर्येंत विलक्षण फरक झाला! जणूं काळोख्या खोलींत विजेचा ढणढणीत दिवाच लागला!—क्षणापूर्वी विषण्ण, उदास झालेली प्रभाकराची मुद्रा स्मितोज्ज्वल व आशातुर बनली!

"मावशी, मावशी, खरं सांगतेस तूं?" तो अधीरपणें म्हणाला. व आतां मावशी ह्यावरून आपली चेष्टा करील असें वाटून तो ओशाळला.

पण चेष्टेलाहि काळ वेळ पहावी लागते हें ठाऊक असल्यामुळें कुंदाताई गंभीर स्वरांत उत्तरल्या, "होय, प्रभा, अगदीं खरं! आतां हळूहळू किशोरला आपल्यावर प्रेम करायला शिकव? आमचा उभयतांचा तुला मनापासून आशीर्वाद आहे."

त्यावर प्रभाकर कांहीं बोलला नाहीं—बोलण्याची आवश्यकताच नव्हती मुळीं.

त्यानें कुंदाताईकडे ज्या सानंद कृतज्ञतेनें पाहिलें त्यांत त्याच्या खोल पण प्रेमळ हृदयाचा मधुर गुंजारव तर कुंदाताईंना ऐकूं आलाच; पण आपल्या इच्छापूर्तींची सुलभता व आपल्या लाडक्या लेकीचें भावी मंगलहि त्यांना दिसून आलें व समाधानपूर्ण हृदयानें त्यांनीं उसासा टाकला !

## २१ : : वनभोजन !

मार्च महिन्यापासून परीक्षांचा मोसम सुरू झाला. सुधाकर प्रीव्हियस्‌ला बसला. किशोर व विभाकर ह्यांची इंटरची आणि प्रभाकराची सेकंड एल्‌एल्‌. बी.ची परीक्षा संपली. व नंतर विजया मॅट्रिकला बसली.

कमी अधिक प्रमाणांत सर्व मुलांचे पेपर बरे गेले व परीक्षेच्या कांचांतून सुटल्याप्रीत्यर्थ सर्वांनीं मिळून कुठें तरी वनभोजनाला जावयाचें ठरविलें.

मूळ कल्पना कुंदाताईंनीं काढली. मुलांच्या बौद्धिक वाढीबरोबर त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीकडेहि त्यांचें नेहमीं लक्ष असल्यामुळें त्या वारंवार असे करमणुकीचे कार्यक्रम घडवून आणीत.

पण आतां वनभोजनाला जाण्याचा बूट त्यांनीं जो काढला त्याला केवळ हेंच कारण नसून किशोरला प्रेमाचा पाठ शिकविण्याची प्रभाकराला संधि मिळावी हें मुख्य कारण होतें !—

ह्या आंतील कारणांचीं फक्त त्यांना व प्रभाकरपंतांनाच माहिती होती व त्यामुळें ह्या बेताविषयीं त्या दोघांना जरी अतिशय उत्सुकता वाटत होती तरी ‘ अंदरकी बात ’ ठाऊक नसतांहि किशोरला व सुधाकराला तेवढीच उत्सुकता वाटत होती !

वनभोजनाला जावयाचें तर खरें पण कुठें ह्यावर मोठ्या जोरांत वादविवाद सुरू झाला.

सुधाकरानें विहार तलावाचें नांव सुचविलें. प्रभाकरपंतांनीं घारापुरीला जाण्याची सूचना केली. कुंदाताईंनीं जुहूला जाण्याचा विचार दर्शविला.

किशोरनें स्वतंत्र सूचना न करितां प्रभाकरपंतांच्या सूचनेला अनुलक्षून म्हटलें " बाबा, घारापुरीला जावयाचें म्हणजे स्टीमलॉंचमधून. आणि आईला नि मला तें मुळींच सोसत नाहीं."

तेव्हां घारापुरीचा बेत गळला.

पुढें विहार तलाव व जुहू ह्या दोन ठिकाणांबद्दल मतें घेण्यांत आलीं.

सुधाकरानें म्हटलें, " जुहू म्हणजे काय दुसरी चौपाटीच ! त्यांत काय मोठी मौज आहे ?"

" पण जवळच्या जवळ आहे आपलं " कुंदाताई म्हणाल्या.

" सबंध दिवस जर बाहेर काढावयाचा आहे तर अंतराचा काय प्रश्न आहे ?" प्रभाकरपंतांनीं असें म्हणतांच सुधाकरानें लगेच विहार तलावाला जाण्याची निकड लाविली; व तेंच नक्की झालें.

मग कुंदाताईनीं सुनंदाआक्काला, सुशीलाताईला, हेमलतेला व मीराबाईंना बरोबर येण्याचें आमंत्रण दिलें.

त्यानुसार सुनंदाआक्का आपल्या दोघां मुलांसह यावयास तयार झाल्या. त्यांचे पति भाऊसाहेब ह्यांनीं मात्र येण्याचें नाकारलें. त्याचप्रमाणें सुशीलाताईच्या पतिराजांनींहि येण्याचें नाकारल्यामुळें त्यांनीं आपल्या मुलींसह येण्याचें कबूल केलें.

विजयेची आवड पुरविण्यासाठीं तिच्या आईवडिलांनीं येण्याचें ठरविलें.

मिळून एकंदर चौदा माणसं झालीं व एक प्रशस्त मोटरबस ठरवून पुढल्या रविवारीं स्वयंपाकी व गड्यासह ही मंडळी सकाळीं सहा वाजतां विहारला निघालीं.

निघाल्यापासूनच मोठीं माणसं एकीकडे व छोटी माणसं एकीकडे असे भाग पडले.

व विहारला पोंचल्यानंतर चहा घेतांक्षणींच मोठीं माणसं तेथील बंगल्यांत गप्पा मारीत आहेत असें पाहून हीं छोटीं माणसं बाहेर सटकलीं, व तलावाच्या कांठीं फिरूं लागली.

पण उन्हाचा जरा त्रास वाटूं लागल्यामुळें थोड्या वेळानें बंगल्याच्या सांवलींत सतरंजी हांतरून मुलें त्यावर बसलीं.

व आतां काय करावें ह्याबद्दल विचार सुरू झाला. तेव्हां किशोरनें 'मूककोड्याचा' खेळ सुचविला.

हा खेळ कुंदा व वृंदा ह्यांना ठाऊक नसल्यामुळें त्यांना शिकविण्यासाठीं किशोर म्हणाली, हें बघा, आधीं किनई आपापला पार्टनर निवडावयाचा व मग कुठल्या तरी एका जोडीनें राज्य घ्यावयाचें व आपापसांत एकादी म्हण ठरवून त्यांतील प्रत्येक शब्दाचा ओळीनें आविर्भाव त्या दोघांनीं इतरांना करून दाखवावयाचा व त्यावरून एकेक शब्द ओळखून ती म्हण शोधून काढावयाची, कळलं?"

पुढें जोडीदार निवडण्याबद्दल वाटाघाट सुरू झाली. त्याबरोबर सर्वांआधीं प्रभाकरानें चट्दिशीं म्हटलें, "किशोर, तूं नि मी पार्टनर होऊं या, अं—"

व त्याचवेळीं सुधाकरानें कांहीं न बोलतां वृंदेचा हात धरून तिला आपल्या बाजूला ओढलें.

आणि डोळ्यांसमोर येणारी कुरळी बट बोटाभोंवतीं गुंडाळीत विजया लाडिक स्वरांत विभाकराला म्हणाली, "विभाकर, तूं नि मी बरं कां—"

शेवटीं कुंदा मात्र एकटीच राहिली.

तें पाहून मिस्किल वृंदा चेष्टेनें म्हणाली, "हं, हं, ताई, विनूदादाला कां घेऊन आली नाहींस? हो, म्हणजे, जन्माचा जोडीदार इथें आयता उपयोगाला आला असता!"

"म्हणजे वृंदे, आतां जे जोडीदार आपण निवडले आहेत ते आपले जन्माचे जोडीदार होणार असं धरावयाचं कीं काय?" फट्कळ् विजया बडबडली.

सुधाकरहि कांहीं कमी फट्कळ् नव्हता. तो लगेच म्हणाला, "हरकत नाहीं. ही वृंदा आपल्याला आवडेल बुवा जोडीदार—म्हणजे जन्माची जोडीदार!"

पण ह्यावर किशोर जरा रागानें उद्गारली, "सुधाकर, काय आचरटपणा चालविला आहेस रे! यंदा कुठें प्रीव्हियस् झालास तोंच कसल्या लग्नाच्या गोष्टी!"

किशोरच्या रागावण्याला वात्रट सुधाकर कुठला भीक घालणार? तो हंसून उत्तरला, "बरं, आमचं राहिलं; पण इंटरला आणि सेकंड एल्‌एल्‌. बी. ला बसलेलीं माणसं तरी जन्माची जोडीदार होऊं शकतील ना?"

सुधाकराच्या ह्या आचरटपणानें किशोरला भारी लाजल्यासारखें झालें. पण ह्यावर कांहीं न बोलणें म्हणजे सुधाकराच्या चेष्टेला उत्तेजन देणें होय असें वाटून डोळे वटारीत ती म्हणाली, "चल, कांहीं तरीच बडबडतोय्‌ आपला!"

परंतु ह्या दबकावण्यांत रागाचा फारच थोडा अंश होता. व तें पाहून प्रभाकराल फार आनंद झाला!

नंतर खेळाला सुरवात झाली–

वयाच्या क्रमानुसार प्रभाकर व किशोर ह्या जोडीनें पहिला डाव घेतला.

वस्तुतः 'मूककोड्याचा' हा खेळ किशोरनें सुचविलेला. परंतु आतां एकादी म्हण सुचविण्याबद्दल प्रभाकरानें तिला सागतांच ती गडबडूनच गेली.

चुकून विजेच्या तारेचा धक्का लागला म्हणजे नंतर बराच वेळ विद्युत्प्रवाह अंगांत खेळत असल्यागत झिणझिण्या जशा येतात, त्याप्रमाणें सुधाकरानें मघां केलेल्या चेष्टेमुळें किशोरच्या गालावर अद्यापि लज्जेच्या लहरी जात, येत होत्या. त्यामुळें तिला काहींच सुचेना!

उजव्या खांद्यावरून पुढें आलेल्या डौलदार वेणीशीं खेळत ती बाह्यतः स्तब्ध उभी होती.

प्रभाकरानें २।४ म्हणी सुचविल्या पण प्रत्येक वेळीं किशोरनें फक्त थोडें हंसून हुंकार दिला.

तिच्याकडे, वेणीच्या शेंपट्यावरून फिरणाऱ्या तिच्या नाजुक, लांब बोटांकडे पहातां पहातां प्रभाकराला आणखी एक म्हण आठवली व किशोरनेंहि त्याबद्दल संमति दर्शविली.

व मग उजव्या हातांत आपला लांबलचक वेणीचा शेपटा धरून तो हालवीत किशोर मंडळींच्या समोरून गेली.

नंतर आपल्या गळ्यावर दोन्ही हात धरून प्रभाकर आला. व किशोरनें आपली वेणी त्याच्या गळ्यावर धरून कापण्याचा अविर्भाव केला!

सुधाकर पट्दिशीं ओरडला, "केसानें गळा कापणें."

त्याबरोबर ही म्हण सर्वांच्या लक्षांत आली. व ह्यावर मुलांची बरीच चर्चा व हंशा झाला.

नंतर वास्तविक विभाकराची पाळी होती. पण सुधाकराला एक सुंदर म्हण आठवली व मग त्याला धीर धरवेना. त्यामुळें त्यानें विभाकर व विजया ह्यांच्या आधीं आपला व वृंदेचा नंबर लाविला.

२।४ मिनिटांच्या आंतच त्यानें व वृंदेनें सारं ठरविलं. व मग सुधाकरानें मोठ्या घाईघाईनें प्रेक्षकांसमोरून २।३ फेऱ्या घातल्या.

नंतर ऐटींत छातीवर हात जुळवून व मान कलती करून तो सावकाश चालत गेला.

मग वृंदा आली व गुडघ्यांवर हात टेवून, वांकून उभी राहिली.

व आपल्या कपाळाला दोन्ही हाताच्या तर्जनी टेंकवून व इतर बोटें खालीं ताठ सोडून सुधाकर आला आणि त्याच स्थितींत त्यानें आपलें कपाळ वृंदेच्या गुढघ्याला टेकविलें— संपलें!

पण ही म्हण कांहीं कुणाला ओळखतां येईना! व त्यामुळें सुधाकर आणि वृंदा फार खूप झालीं.

मग सर्वजणं हरलीं असें कबूल करून घेऊन सुधाकर म्हणाला "हात्तेच्या! एवढं नाहीं कळलं? 'उतावळा नवरा, गुढघ्याला बाशिंग' ही म्हण होती ती."

सुधाकरानें असें सांगतांच, मघां सुधाकर आधीं घाईघाईनें आला हा 'उतावळा' ह्या शब्दाचा आविर्भाव, नंतर 'नवरा' हा शब्द ध्वनित करण्यासाठीं तो सावकाश, ऐटींत चालला. व मग वृंदेनें 'गुढघा' हा शब्द दर्शविल्यावर कपाळाला बाशिंगवजा हाताचीं बोटें लावून सुधाकरानें हें 'बाशिंग' 'गुडघ्याला' लाविलें हें सर्वांच्या लक्षांत आलें व एकच हंशा पिकला. ह्या म्हणीची सर्वांनाच गंमत वाटली.

पण तेवढ्यानें सुधाकराचें समाधान झालें नाहीं. तो डोळे मिचकावीत म्हणाला, "मघां आमच्या ताईसाहेबांनीं मला उतावीळपणाचा शेरा देतांच ही म्हण माझ्या लक्षांत आली."

त्याच्या ह्या जादा आचरटपणानें आतां किशोरलाहि खूप हंसूं आलें.

नंतर विभाकर व विजया उठलीं व बाजूला गेलीं. पण म्हण ठर-विण्याबद्दल त्यांचें मुळीं एकमतच होईना.

शेवटीं प्रभाकर त्यांच्या मदतीला धांवला. परंतु तितक्यांत त्यांचा वाद एकदांचा मिटला.

आणि विजया व मागून विभाकर अशीं दोघें आलीं. व मग चालतां चालतां विजयेनें एकदम पायाचा आंगठा दुमडला व खालीं वांकून तो धरून ती निःश्वास टाकूं लागली.

सुधाकर तिच्या मागून येत होता. त्यानें तिची ही कृति नीट पाहिली व मग छाती पुढें काढून आणि मान ताठ करून तो पुढें चालूं लागला.

"पुढच्यास ठेंच, मागचा शहाणा," प्रभाकर व किशोर एकदम उद्गारली.

त्यासरशीं विभाकर झटक्यानें म्हणाला, "पाहिलंस विजये, तूं सुच-विलेली म्हण किती सोपी होती तें. मी छान चांगली कठीण म्हण ठरविली होती पण तुला नाहीं ना ती आवडली!"

विभाकरानें असें जरा रागानें म्हणतांच विजयेचें तोंड गोरेंमोरें झालें.

त्याबरोबर लगेच नमतें घेत विभाकर म्हणाला, "बाकी, माझी म्हण सुद्धां सोपीच होती म्हणा! आणि, बरं कां, विजये, आपण अगदीं यथार्थ अभिनय केल्यामुळेंच प्रभादादाला आणि किशोरताईला ती चटदिशीं ओळखतां आली. म्हणजे सोपेपणापेक्षां आपल्या अभिनयकौशल्याचीच त्यांना अधिक मदत मिळाली हं." असें बोलत विभाकरानें हंसून विजये-कडे पाहिलें व मग विजयाहि हंसली.

सर्वांशीं फटकून वागणाऱ्या आढ्यतेखोर विजयेनें विभाकरापुढें इतकें नमतें घेतलें, त्याचप्रमाणें आपल्या फटकळ स्पष्टोक्तींनें कुणाचें मन दुख-विलें गेलें तरी त्याची पर्वा न बाळगणाऱ्या विभाकरानें आतां विजया जरा नाराज होतांच मवाळपणा धरला हें पाहून किशोरला मौज वाटली. व पुनः मधांच्या चेष्टामस्करीची आठवण होऊन तिच्या मनांत आलें, "परस्परांना शेराला सव्वा शेर होऊं शकणारी ही जोडी छान जमेल

खरी—" व मग पुनः तिला प्रभाकर व आपण ह्या जोडीवरून सुधाकरानें केलेल्या थट्टेची आठवण आली. व मघांप्रमाणें पुनः ती लाजली.

व हें कुणाच्या लक्षांत आलें असेल कीं काय अशी शंका वाटून तिनें चट्दिशीं वर पाहिलें. व तिच्याचकडे एकाग्रतेनें पहात राहिलेल्या प्रभाकराची आणि तिची नजरानजर झाली.

त्याबरोबर किशोर आणखीच लाजली. व तें पाहून प्रभाकारला फार मौज वाटली.

तो लहानपणापासून किशोरला पहात होता व हल्लीं कांहीं महिने त्याचें तिच्यावर प्रेम जडल्यापासून तर तिच्या हरेक वृत्तीचें निरीक्षण करण्याची संवयच त्याला लागली होती. व ह्या निरीक्षणामध्यें त्याला बोलकी किशोर, रुसकी किशोर, हंसरी किशोर, रागीट किशोर वगैरे सर्व लहरींतील किशोर दिसली होती. पण आतांसारखी लाजरी किशोर दिसली नव्हती.

आणि आतां दिसली ती त्याला एवढी मोहक वाटली कीं तो देहभान विसरून तिच्याकडे पहातच राहिला!

शेवटीं त्यामुळें भारीच अवघडल्यासारखें वाटून किशोरनें किंचित् गाल फुगवून त्याच्याकडे पाहिलें. त्याबरोबर प्रभाकर मनापासून हंसला. व कां कोण जाणें, किशोरहि खुदकन् हंसली.

व मग नंतर जेवतांना, दोनप्रहरीं पत्ते खेळतांना, संध्याकाळीं बस्‌मधून घरीं येतांना, एवढेंच नव्हे तर घरीं आल्यावर रात्रीं बिछान्यावर पडल्यावेळींहि किशोरला ह्या मजेशीर घटनेची एकसारखी आठवण होत होती!

इतर कुणालाहि ठाऊक नसलेलें असें आपलें व प्रभाकराचें तें गुपित आहे असेंच तिला वाटत होतें व हें वाटणें आनंददायी असल्यामुळें ती त्यांत रमत होती!

त्याचप्रमाणें खेळतवेळीं जोडीदार म्हणून प्रभाकरानें पट्दिशीं आपलीच निवड केली ही घटनाहि तिला पुन:पुनः आठवत होती. व त्या त्या वेळीं तिच्या मनांत येई, "एक तरुण आणि एक तरुणी असेच जोडीदार निवडावयाचे असं कांहीं ठरलं नव्हतं. बरं, तसेच जोडीदार निवडावयाचे

तर सुधाकर व आपण अशी भावंडांची जोडी नसती कां निवडली गेली ? पण–प्रभाकरानें तसें होण्याची संधीहि न देतां मुद्दाम चपळाई करून आपल्याला निवडून घेतलं–तें कां ?—कां ?— ”

हा प्रश्नात्मक ‘ कां ’ तिला पुनः पुनः सतावूं लागला ! आजवर आपला मावसभाऊ ह्या दृष्टीनें तिला प्रभाकराविषयीं पुष्कळ प्रेम वाटत होतें. पण आजवर संथ वाहणाऱ्या ह्या प्रेमौघावर आज थोडेथोडे प्रीतीचे बुड-बुडे येऊं लागले. व हा प्रकार अगदीं अनपेक्षित रीतीनें घडल्यामुळें किशोर बावरल्यासारखी झाली व नंतर दिवसभर ती जरा गप्पगप्पच होती.

मुक्या कळीची रंगसंपदा जशी दृष्टिआड असते तशी किशोरच्या स्तब्धतेखालीं दडलेली ही गोड खळबळ प्रभाकराला अज्ञात होती. किशोरच्या सहवासांत एक सबंध दिवस घालवावयाला मिळाला ह्याचाच त्याला खूप आनंद झाला होता ! परंतु हा आनंद शुद्ध, स्वच्छ पाण्यासारखा सात्त्विक होता. आज घडलेल्या अनेक घटनामुळें किशोरच्या हृदयांत उत्पन्न झालेली नाजुक खळबळ जर त्याला कळून आली असती तर–तर–त्याला जहाल मद्यासारख्या मादक आनंदानें वेडें केलें असतें !

कारण प्रीतीचा खेळ खेळतेवेळीं तरुण पुरुष फार अधीर होतात ! आपल्या प्रेयसीचा कल किंचित् अनुकूल आहे असें दिसतांच ‘ तूं माझी अन् तुझा मीच ’ ही खातर करून घेण्यासाठीं ते अति उतावीळ होतात !

परंतु किशोरची ही नंतरची स्तब्धता आपल्याला अनुकूल स्वरूपाची आहे ही प्रभाकराला कल्पनाहि आली नाहीं व म्हणूनच त्याचा आनंद सात्त्विक स्वरूपाचाच राहूं शकला !

## २२ : : मैत्रिणींना व्याख्यान !

प्रेम आंधळें असतें हें तर खरेंच, पण आपल्या तडाक्यांत सांपडलेल्या व्यक्तींना तें आंधळें बनवितें हेंहि तितकेंच खरें आहे !

विहारला गेल्या दिवसापासून किशोरला प्रभाकराविषयीं किंचित् वेगळी भावना वाटूं लागली होती. परंतु हें स्वतः किशोरच्या काहीं ध्यानांत आलें नाहीं.

विहारला जाऊन आल्यापासून आपल्या मनाला विशेष उल्हास वाटूं लागला आहे हें मात्र तिच्या लक्षांत आलें होतें. परंतु त्याचा प्रभाकराशीं प्रत्यक्ष संबंध जोडण्याचें टाळून तिनें अशी मखलाशी लढविली कीं, यूसफचा नाद सोडावयाचा हें ठरविल्यापासून आपण मुळीं परकी पुरुषांचा सहवासच टाळण्याचा प्रयत्न करीत होतों— आईनें त्या लेक्चरमध्यें सांगितल्याप्रमाणें ज्या गांवाला जावयाचें नाहीं त्याच्या नांवाच्याहि भानगडींत न पडण्याचें आपण ठरविलें. त्यामुळें आज बऱ्याच दिवसांनीं प्रभाकराचा निसर्गाच्या नियमानुसार स्त्रीहृदयाला आकर्षक वाटणारा सहवास लाभतांच आपल्याला साहजिकच आनंद वाटूं लागला आहे !—

किशोरनें वेड्यावांकड्या वळणांनीं असा आपल्या मतें सरळ सिद्धांत लढविला तरी कुंदाताईंनीं त्यांतील खरी मख्खी तेव्हांच ओळखली होती.

त्यामुळें दुसऱ्या दिवशीं जेव्हां किशोरनें मोठ्या उत्सुकतेनें म्हटलें कीं, " ए आई, परवां तुमच्या लग्नाचा वाढदिवस आहे कीं ग. आई, यंदा किनई आपण चांगल्या मोठ्या प्रमाणावर वाढदिवस साजरा करूं या

हं–" तेव्हां कुंदाताईना आश्चर्य मुळींच वाटलें नाहीं. आनंद मात्र वाटला. पण तोहि फारसा उघड करावयाला त्या धजल्या नाहींत.

किशोरकडे पहात त्यांनीं प्रेमळ स्मित केलें.

तेव्हां किशोर पुनः म्हणाली, " मग काय आई, जंगी प्रोग्रॅम करावयाचा ना ? "

ह्यावर सुधाकर चेष्टेच्या स्वरांत बोलला, " अहो ताईसाहेब, आई-बाबांच्या लग्नाचा वाढदिवस दरवर्षीपेक्षां यंदा अधिक झोंकांत कां साजरा करावयाचा ? म्हटलं, लग्नाला पंचवीस वर्षे झालीं म्हणजे मात्र सिल्व्हर ज्युबिली साजरी करितात. नि आईबाबांच्या लग्नाला तर परवां एकवीस वर्षे पुरीं होणार ! "

"मग म्हणूनच त्या दिवशीं जरा विशेष कांहीं करावयाचं. सुधाकर, हें सिल्व्हर ज्युबिलीचं इंग्रजी अवडंबर आपल्याला कशाला हवं ? आपल्यांत एकाचे एकवीस अशी म्हण आहे ? परवां आईबाबांच्या लग्नाला एकवीस वर्षे होणार व म्हणून—"

"शाबास, शाबास ! किशोर, आपल्या संस्कृतीबद्दलचा हा तुझा अभिमान पाहून मला अतिशय आनंद झाला." प्रभाकरपंत मध्येंच कौतुकानें उद्गारले.

पण त्यांनीं असें कौतुक करितांच, हिंदु संस्कृतीचा अभिमान धरणारी आपण त्याहून श्रेष्ठ अशा हिंदु धर्माचा त्याग करावयाला उद्युक्त झालों होतों ही आठवण येऊन किशोरची मुद्रा क्षणभर विषण्ण झाली. परंतु त्या संकटापासून आपल्या आईवडिलांनीं आपल्याला वेळींच सोडविलें असें वाटून तिला त्यांतल्या त्यांत बरें वाटलें !

व तेवढ्यांतच प्रभाकरपंत पुनः म्हणाले, 'बस्स, किशोरताईच्या म्हणण्याप्रमाणें हा एकविसावा वाढदिवस खरोखरीच झोकांत साजरा करावयाचा. काय कुंदे, तुझं मतहि असंच आहे ना ?

कुंदाताईनीं हंसून उत्तर केलें, अर्थातच ! " बरं तर मुलांनो, परवां काय प्रोग्रॅम करण्याची तुमची इच्छा आहे ? "

" आई, माझ्या मित्रांना आणि ताईच्या मैत्रिणींना जेवावयाला बोलवूं

## २२ : : मैत्रिणींना व्याख्यान !

प्रेम आंधळें असतें हें तर खरेंच, पण आपल्या तडाक्यांत सांपडलेल्या व्यक्तींना तें आंधळें बनवितें हेंहि तितकेंच खरें आहे !

विहारला गेल्या दिवसापासून किशोरला प्रभाकराविषयीं किंचित् वेगळी भावना वाटूं लागली होती. परंतु हें स्वतः किशोरच्या कांहीं ध्यानांत आलें नाहीं.

विहारला जाऊन आल्यापासून आपल्या मनाला विशेष उल्हास वाटूं लागला आहे हें मात्र तिच्या लक्षांत आलें होतें. परंतु त्याचा प्रभाकराशीं प्रत्यक्ष संबंध जोडण्याचें टाळून तिनें अशी मखलाशी लढविली कीं, यूसफच्या नाद सोडावयाचा हें ठरविल्यापासून आपण मुळीं परकी पुरुषांचा सहवासच टाळण्याचा प्रयत्न करीत होतों– आईनें त्या लेक्चरमध्यें सांगितल्याप्रमाणें ज्या गांवाला जावयाचें नाहीं त्याच्या नांवाच्याहि भानगडींत न पडण्याचें आपण ठरविलें. त्यामुळें आज बऱ्याच दिवसांनीं प्रभाकराचा निसर्गाच्या नियमानुसार स्त्रीहृदयाला आकर्षक वाटणारा सहवास लाभतांच आपल्याला साहजिकच आनंद वाटूं लागला आहे ! —

किशोरनें वेड्यावांकड्या वळणांनीं असा आपल्या मतें सरळ सिद्धांत लढविला तरी कुंदाताईंनीं त्यांतील खरी मख्खी तेव्हांच ओळखली होती.

त्यामुळें दुसऱ्या दिवशीं जेव्हां किशोरनें मोठ्या उत्सुकतेनें म्हटलें कीं, " ए आई, परवां तुमच्या लग्नाचा वाढदिवस आहे कीं ग. आई, यंदा किनई आपण चांगल्या मोठ्या प्रमाणावर वाढदिवस साजरा करूं या

हं–" तेव्हां कुंदाताईंना आश्चर्य मुळींच वाटलें नाहीं. आनंद मात्र वाटला. पण तोहि फारसा उघड करावयाला त्या धजल्या नाहींत.

किशोरकडे पहात त्यांनीं प्रेमळ स्मित केलें.

तेव्हां किशोर पुनः म्हणाली, " मग काय आई, जंगी प्रोग्रॅम करावयाचा ना ? "

ह्यावर सुधाकर चेष्टेच्या स्वरांत बोलला, " अहो ताईसाहेब, आई-बाबांच्या लग्नाचा वाढदिवस दरवर्षीपेक्षां यंदा अधिक झोंकांत कां साजरा करावयाचा ? म्हटलं, लग्नाला पंचवीस वर्षे झालीं म्हणजे मात्र सिल्व्हर ज्युबिली साजरी करितात. नि आईबाबांच्या लग्नाला तर परवां एकवीस वर्षे पुरीं होणार ! "

"मग म्हणूनच त्या दिवशीं जरा विशेष कांहीं करावयाचं. सुधाकर, हें सिल्व्हर ज्युबिलीचं इंग्रजी अवडंबर आपल्याला कशाला हवं ? आपल्यांत एकाचे एकवीस अशी म्हण आहे ? परवां आईबाबांच्या लग्नाला एकवीस वर्षे होणार व म्हणून—"

"शाबास, शाबास ! किशोर, आपल्या संस्कृतीबद्दलचा हा तुझा अभिमान पाहून मला अतिशय आनंद झाला." प्रभाकरपंत मध्येंच कौतुकानें उद्गारले.

पण त्यांनीं असें कौतुक करितांच, हिंदु संस्कृतीचा अभिमान धरणारी आपण त्याहून श्रेष्ठ अशा हिंदु धर्माचा त्याग करावयाला उद्युक्त झालों होतों ही आठवण येऊन किशोरची मुद्रा क्षणभर विषण्ण झाली. परंतु त्या संकटापासून आपल्या आईवडिलांनीं आपल्याला वेळींच सोडविलें असें वाटून तिला त्यांतल्या त्यांत बरें वाटलें !

व तेवढ्यांतच प्रभाकरपंत पुनः म्हणाले, ' बस्स, किशोरताईच्या म्हणण्याप्रमाणें हा एकविसावा वाढदिवस खरोखरीच झोकांत साजरा करावयाचा. काय कुंदे, तुझं मतहि असंच आहे ना ?

कुंदाताईनीं हंसून उत्तर केलें, अर्थातच ! " बरं तर मुलांनो, परवां काय प्रोग्रॅम करण्याची तुमची इच्छा आहे ? "

" आई, माझ्या मित्रांना आणि ताईच्या मैत्रिणींना जेवावयाला बोलवूं

या ग. ” सुधाकरानें लगेच सुचविलें.

“ अस्सं ! बरं आहे. किशोर, तुझ्या कुठल्या मैत्रिणींना बोलवावयाचें ?

“ एक सुशीलामावशीची कुंदा नि दुसरी माझ्या वर्गांतील मालिनी पंडित. ”

“ एकट्या कुंदेला बोलविणें वाईट दिसेल तेव्हां बरोबर वृंदेलाहि बोलवूं या. नि मग विजयेलाच कां वगळावयाचें ? हो खरं, आक्काच्या प्रभाकर–विभाकरांनाहि बोलावलं पाहिजे, नाहीं ? ” कुंदाताईनीं शेवटला प्रश्न मुद्दाम किशोरलाच विचारला.

परंतु किशोरनें उत्तर दिलें नाहीं. मात्र इतक्या मंडळींना बोलवावयाचेंच असें कुंदाताईनींच पुनः नक्की ठरविल्यावर ती जरा आणखीच उत्साहानें इतर कार्यक्रम ठरविण्यांत भाग घेऊं लागली हें त्यांनीं पाहून ठेविलें.

नंतर कुंदाताई सुधाकराला म्हणाल्या, “ हं, आतां सांग बाबा तुझ्या मित्रांचीं नांवं.”

हातांतील कागदावर कांहीं खरडीत सुधाकर म्हणाला, “ जरा थांब हां आई. झालंच हें.” व मग त्यानें एक यादी आईच्या हातांत ठेविली.

कुंदाताईनीं पाहिलें तर यादींत तब्बल अठ्ठावीस मुलांचीं नांवें होतीं–

सुधाकर अतिशय बोलका व जगमित्र असल्याचा हा अगदीं बिनतोड पुरावा होता !

कुंदाताइनीं हंसत हंसत ही यादी वाचून दाखवितांच किशोर चकित होऊन म्हणाली, “ अरे बापरे ! सुधाकर, अरे, वर्गांतील साऱ्याच मुलांना तूं मित्र समजतोस कीं काय ?”

“ साऱ्याच मुलांना ? हुं ! ताईसाहेब, आमच्या वर्गांत ८४ मुलं आहेत म्हटलं—”

“ मग, वर्गांतील सारे मुलगे मित्र नाहींत तुझे ? ” किशोरनें चेष्टेनें विचारलें.

“ आहेत कीं. पण सगळ्यांना बोलावलं तर आईला त्रास नाहीं कां पडणार ? म्हणून कित्ती विचार करून मीं इतक्या थोड्या जणांना बोलाविण्याचें ठरविलें.”

"अठ्ठावीस पोरं म्हणजे थोडीं ना?" किशोरच्या ह्या उद्गारावर सुधाकर आईकडे वळून म्हणाला, "आई, एवढ्यांना नको ग बोलावूं?"

"बोलाव ना हवं तर. पण बोवाळ फार होईल!"

"मग काय करूं?" सुधाकरानें सखेद उद्गार काढला.

त्यावर प्रभाकरपंतांनीं म्हटलें, "सुधाकर, ह्यांतील तुझे खास मित्र किती आहेत?"

"सगळेच!"

"खरं? म्हणजे, ह्यांतील कोणताहि एकादा मुलगा गाळला तरी तुला वाईट वाटेल?"

"तसंच नव्हे कांहीं. पण बाबा, त्यामुळें त्या मुलाला नाहीं कां वाईट वाटणार?

सुधाकराचें हें उत्तर ऐकून प्रभाकरपंत मनापासून हंसले, आपल्या चिरंजीवाच्या ह्या प्रेमळ स्वभावाचें त्यांना कौतुक वाटलें व ते उत्तरले, "ठीक आहे सुधाकर, बोलाव तूं ह्या साऱ्या जणांना."

आणि सुधाकराच्या निमंत्रणाला मान देऊन त्याचे हे अठ्ठावीसहि मित्र जेवावयाला हजर झाले.

किशोर फक्त एकाच वर्गभगिनीला बोलावणार होती. परंतु त्याप्रमाणें तिला बोलावणें धाडण्याबद्दल कुंदाताईंनीं पुनः सांगतांच एक गंमत झाली. पदराशीं चुळबुळत किशोर म्हणाली, "आई, मालिनीला बोलावूं कीं नको असा प्रश्न पडलाय् बाई मला. ती एकटीच येणार म्हणजे तिला जरा अवघडच नाहीं कां वाटणार?

"मग आणखी कुणाला बोलाविणार आहेस काय? बोलाव कीं खुशाल."

"अंहं, तसं नव्हे. मी म्हणतें हिलाहि नको बोलवायला. असं बघ आई, मला मग धड मालिनीशींहि बोलतां येणार नाहीं नि धड कुंदा, वृंदा व विजया ह्यांच्यांशींहि बोलतां येणार नाहीं."

"कां ग? कुंदेची नि ह्या मालिनीची ओळख आहे ना?"

कुंदाताईंनीं असें पेंचांतच पकडल्यावर नाइलाज होऊन किशोरनें खरें

कारण हळूंच सांगितलें.

ती म्हणाली, "पण आई, विभाकर–आणि–प्रभाकर येणार आहेत ना? मग त्यांच्याशीं कोण बोलत बसणार?"

येणारें हंसूं दाबीत कुंदाताई उत्तरल्या, "होय, हें बरीक खरं हं. सुधाकर असणार आपल्या मित्रांभोंवतीं, तेव्हां प्रभाविभांना अवघडल्यासारखें होईल खरेंच. बरं तर, नकोच बोलावूंस तूं त्या मालिनीला."

व ह्यावर मानेनें संमति देऊन किशोर बाहेर जातांच तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात कुंदाताई स्वतःशींच किंचित हंसल्या व त्याचवेळीं त्यांच्या मनांत आलें, "बरोबर आहे. प्रभाकरासारखा मित्र हवासा वाटूं लागल्यामुळें मैत्रीण नकोशी झाली असणार, किशोरला!"

आणि ह्या विचारानें त्यांना आनंद वाटला—

कार्यावरून कारणाची किंमत कमीजास्त होते हेंच खरं! मध्यंतरीं किशोरला मैत्रिणीच काय, आई, वडील व भाऊ हीं प्रेमाचीं माणसंहि नकोशीं झालीं होतीं. व तें पाहून कुंदाताईंचा जीव त्यावेळीं विलक्षण व्याकुळ झाला होता!

आणि आतां किशोरचें हृदय प्रभाकराकडे आकर्षिलें जात असल्यामुळें तिला मैत्रिणी नकोशा झाल्या आहेत, हें पाहून त्यांचा जीव आनंदानें नाचूं लागला! फार काय, आतां तर किशोरनें जर आई, वडील व भाऊ ह्यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलें असतें तरी कुंदाताईंना त्यामुळें संतोषच झाला असता!

ईश्वर हा मोठाच कुशल कारागीर आहे! मनुष्यांना निर्माण करण्याची जबाबदारी तेवढी त्यानें स्वतःवर घेतली आहे! आणि आपापलीं सुखदुःखें ज्याचीं त्यानें निर्माण करावी म्हणून त्यानें मानवी मनोवृत्ति अत्यंत लवचिक घडविली आहे! म्हणजे माणसांनीं परिस्थित्यनुसार वागून आहे त्या स्थितींत सुख मानून घेण्याचा अति उपयुक्त मूलमंत्र त्यानें मुद्दामच प्रत्येक व्यक्तीच्या हातीं दिला आहे!

—पण कांहीं माणसें तो मूलमंत्र विसरतात! आपली मनोवृत्ति मुद्दामच तीं ताठ करतात! व मग प्रतिकूल परिस्थितीच्या माऱ्याखालीं

वांकण्याऐवजीं ती मोडून जाते व त्या दुःखाखालीं तीं माणसं चिरडून जातात !—

जगांत सुखाप्रमाणें दुःखहि सापेक्ष असतें; आज जें दुःखदायक वाटतें तें उद्यां तितकें वाटेनासें होतें. कोणत्याहि घटनेबद्दल घाईघाईनें मत न बनवितां त्या घटनेच्या परिणामानुसार मत बनवावें, कार्यावरून कारणाची किंमत ठरवावी इत्यादि अनेक उपयुक्त गोष्टींकडे माणसें दुर्लक्ष्य करितात व मग चिखलांत अधिकाधिक रुतत जाणाऱ्या गाईप्रमाणें तीं दुःखांत आणखीच खितपत पडतात !

‘ आस्ते भग आसीनस्य ऊर्ध्वस्तिष्ठति तिष्ठतः ।
शेते निपद्यमानस्य, चराति चरतो भगः ॥

हा उपदेश अतिशय उपयुक्त आहे ! आपलें नशीब केवळ आपल्या स्वाधीन नसलें तरी सुख मानून घेणें किंवा दुःख करणें खात्रीनें आपल्या स्वाधीन असतें ! आणि वरील संस्कृत श्लोकांत सांगितल्याप्रमाणें आशा-वादी माणसांची निःसंशय प्रगति होते !

एका काळीं कुंदाताईचें प्रेमपुष्प न फुलतांच सुकून जाणार असा रंग दिसत होता ! पण त्यांनीं आशा सोडली नाहीं, धीर खचूं दिला नाहीं किंवा रागाच्या भरांत आपल्या इच्छापूर्तीचा मार्ग आपणच रोखूनहि टाकला नाहीं !

आणि त्यामुळें ‘ चराति चरतो भगः ’ हें त्यांच्या बाबतींत अगदीं खरें ठरलें.

व आपल्या पुढील आयुष्यांत त्यांनीं हेंच आपल्या वागणुकीचें धोरण ठरवून टाकलें !

आशा सोडावयाची नाहीं; प्रयत्नांत कसूर करावयाची नाहीं; हें दुहेरी धोरण ठेवून त्या आजवर वागत आल्या व त्याच्याच जोरावर त्या आज-वर आयुष्यांत यशस्वी झाल्या !

* * * *

किशोरच्या बाबतींतहि त्या आपल्या मनाला असाच धीर देत कीं,

अद्यापि प्रभाकरावर किशोरचें प्रेम जडलें नाहीं खरें. पण पुढें मागें तें जडूं शकेल! रिकामं भांडं आपल्याला हव्या त्या वस्तूनें भरून टाकतां येतं!—किशोरचं हृदय सध्यां रिकामं आहे, त्यांत यूसफविषयीं यत्किंचित्‌हि आकर्षण आतां नाहीं ही काय कमी समाधानाची गोष्ट आहे? आतां पुढें मागें हें रिकामं हृदय प्रभाकरविषयींच्या प्रीतीनें भरूं शकेल!—

बस्स! आशा सोडावयाची नाहीं. प्रयत्नांत कसूर करावयाची नाहीं!

आणि मग अर्थातूच आपल्या आशेची पूर्ति होणार, प्रयत्न सफल होणार असा रंग दिसूं लागतांच कुंदाताईंना अतिशय आनंद झाला!

स्वतः कांहीं एक उद्योगधंदा न करितां वडिलोपार्जित इस्टेट मिळाली म्हणजे त्या माणसाला आनंद वाटतो खरा! पण स्वतःच्या बुद्धिकौशल्याचें व पराक्रमाचें चीज होऊन जगांत धन, मान जो मिळवितो त्याला वाटणाऱ्या आनंदाच्या पासंगालाहि हा पहिला लागत नसतो!

कुंदाताईंना सध्यां होणारा आनंद ह्या दुसऱ्या आनंदासारखा अतुल होता!

आणि प्रभाकर जेवावयाला आल्यावेळीं किशोर नकळत आपुलकीनें त्याला हवें, नको विचारूं लागली तेव्हां आजवर तिला प्रभाकराविषयीं वाटत असलेल्या धोपटमार्गामध्यें आतां हळूहळू प्रीतीचीं आडवळणें येऊं लागली अशी त्यांची पुरी खात्री झाली व आतां त्यामध्यें आपण पडण्याचें कारण नाहीं असें त्यांनीं ठरवून टाकलें!

बरोबरच आहे! चालणाऱ्या मुलाला कडेवर कशाला घ्यावयाचें?

❦ ❦ ❦ ❦ ❦

मुलांचा जेवणाखाणाचा धुडगूस दीड वाजेपर्यंत चालला होता.

नंतर ३।। च्या सुमाराला कुंदाताईच्या मैत्रिणी आल्या.

आजच्या दिवसाप्रीत्यर्थ सुभद्राबाईनीं कुंदाताईंना एक सुंदर रेशमी पातळ दिलें व सुनंदा आक्कांनीं पातळाला शोभेशी पर्स दिली.

मिराबाईनीं 'आजच्या तरुण पिढीचे प्रश्न' ह्या नांवाचें निबंधात्मक एक इंग्रजी पुस्तक बक्षिस दिलें.

नंतर हेमलतेनें उत्तम अत्तराच्या तीन उंची कुप्या हळूंच पुढें केल्या. पण त्यांचा स्वीकार न करितां नाखुषीच्या स्वरांत कुंदाताई म्हणाल्या, "हें ग काय हेम ? एवढं किंमतवान् बक्षीस मीं नाहीं बाई घेणार– "

" किंमतवान् बक्षीस ? कुंदाताई, आपल्या सुंदर व्याख्यानानें माझ्या विजयेचा मोह दूर सारून तूं जें अमूल्य बक्षीस आम्हांला दिलंस त्या मानानें हें कांहींच नाहीं. कुंदाताई, नाहीं म्हणूं नकोस गडे. तुजविषयीं मला वाटणाऱ्या कृतज्ञतेची खूण म्हणून ह्याचा स्वीकार कर." हेमलतेनें हें इतक्या आर्जवानें व मनापासून सांगितलें कीं कुंदाताईंना तिचा शब्द मोडवेना.

कुंदाताईंनीं त्या कुप्या घेतल्या. व त्यांतील एक उघडून आंतील अत्तराचा मृदु सुगंध सेवन करीत त्या म्हणाल्या, " अहा ! हेम, किती मधुर, आहे ही तुझी आठवण ! "

"हं कुंदाबाई, ही घ्या आमची साधीसुधी आठवण." असें बोलत सुशीलाताईंनीं हातांतील चार हातरुमाल पुढें केले व म्हटलें, "हे रुमाल कांहीं मोठे उंची नाहींत पण त्यांच्यावरील हें नक्षीकाम वृंदेनें केलें असल्यामुळें तुला खात्रीनें त्यांची किंमत खूप वाटेल! होय ना?"

व कुंदाताईकडे पाहून तिनें डोळे मिचकावले.

त्यासरशीं हेमलतेनें म्हटलें, म्हणजे? ह्याचा काय बाई अर्थ? वृंदेनें नक्षीकाम केल्यामुळें हे रुमाल तुला किंमतवान् कां बाई वाटणार?"

हेमाताईनें प्रश्न केला कुंदाताईंना. पण उत्तरादाखल बोलक्या सुशीलाबाई मध्येंच म्हणाल्या, "म्हणजे माझी वृंदा किनई ह्या कुंदाताईंची सूनबाई होणार आहे हो."

" अगबाई ! एवढ्यांतच लग्नसुद्धां ठरविलंत ? "

" आजकाल लहानपणींच लग्न ठरविणं श्रेयस्कर असतं असं वाटायला लागलंय नि म्हणून आम्हीं आपलं आतांपासूनच सुधाकर–वृंदेचं लग्न जमवून टाकलं ! "

" होय बाई ! " एक निःश्वास सोडून हेमाताई म्हणाली, " हाच शहाणपणा ! नाहीं तर पुढें ह्या पोरींना शिंगं फुटतात ! "

" नि ती आईबापांच्या हृदयांत खुपसतात, असंच ना ?" हेमलतेचें वाक्य सुनंदाआक्कांनीं चेष्टेनें पुरें केलें.

पण त्यावर हेमलता गंभीपणें म्हणाली," अगदीं खरं बोललांत आक्का! मात्र तुम्हांला मुलगी नसल्यामुळें हें दुःख तुमच्या नशिबीचें टळलें आहे नि म्हणून तुम्हांला परदुःख शीतळ वाटतं आहे बरं!"

ह्यावर सुनंदाआक्का किंचित् मृदु स्वरांत म्हणाल्या, " अहो, पण मुलांनीं जातीबाहेर लग्न केल्यानें सुद्धां दुःख नाहीं का होत ?"

" पण आक्का, त्यामुळें परजातीची मुलगी तुमच्या जातींत येते, तुमचं आडनांव धारण करते, तुमचा वंश पुढें चालविते तेव्हां ती सर्वस्वीं तुमची होते! त्या मुलीचे आईबाप मात्र आपल्या मुलीला मुकतात!"

" बघ हो आक्का, तुझ्या मुलांनीं परजातींतील मुलींबरोबर विवाह करावयाला हरकत नाहीं हं हेमाच्या मतें." आक्काकडे लक्षपूर्वक पहात कुंदाताई उद्गारल्या.

त्यांची किशोर आक्काच्या प्रभाकराची सख्खी मावसबहीण असली तरी ती ब्राह्मण पित्याची कन्या अतएव पर जातीची होती! तेव्हां हेमलतेनें आतां सुचविल्याप्रमाणें आपल्या मुलांना परजातींतील मुली करून घेणें जर आक्काला पटत असलें तर उत्तमच होईल अशा हेतूनें कुंदाताइनीं हा उद्गार काढला.

पण आक्का ह्यावर कांहींच बोलल्या नाहींत. किंबहुना सुशीलाताईनीं तिला बोलण्याची संधिच दिली नाहीं.

कारण तितक्यांतच त्यांनीं म्हटलें, " हो खरं, कुंदे, त्या दिवशीं मारवाडी विद्यालयाच्या हॉलमध्यें तूं जें व्याख्यान दिलंस त्यावेळीं ह्या बाबतींत मुलींच्या मातांनाहि दुसरं व्याख्यान देणार असं तूं बोलली होतीस. तेव्हां आतां दे बघूं तें व्याख्यान."

" इश्श! व्याख्यान कसलं आलंय्? पण ह्या विषयावर मला २।४ मुद्दे सुचले आहेत एवढंच! मला आपलं असं वाटतं कीं, आपल्या मुलांमुलींनीं विवाहासाठीं अमुक एका तऱ्हेनेंच निवड करावी अशी जर आपली इच्छा असेल तर आपला व आपल्या मुलांमुलींचा दृष्टिकोण सारखा असणं

आवश्यक आहे ! तेव्हां ज्या कुटुंबांतील मुलांमुलींबरोबर आपल्या मुलीमुलांचे विवाह व्हावे असं आपल्याला वाटत असेल त्यांच्यांशीं आधींपासूनच दळणवळण होऊं द्यावें. कारण कांहीं आईबाप आपल्या मुलांना मुळींच स्वातंत्र्य देत नाहींत तर कांहीं संपूर्ण स्वातंत्र्य देतात ! ह्या दोन्हींचा मध्य म्हणून आपल्या मुलांमुलींना असं मर्यादित स्वातंत्र्य अवश्य द्यावं ! म्हणजे दोन्ही पिढ्यांना पसंत पडणारेच विवाह घडून येतील ! दुसरं असं कीं, आपल्या मुली साधारणपणें ११।१२ वर्षांच्या झाल्या म्हणजे आपण त्यांना मुलांबरोबर मोकळेपणानें वागण्याची मनाई करतों हें अगदीं गैर आहे. कारण ह्याचा परिणाम असा होतो कीं, तरुण वयांत व विशेषतः कॉलेजच्या जगांत तरुण मुलीमुलगे एकत्र आले कीं, आजवर त्यांच्या स्वातंत्र्यावर ठेविलेला दाब संपूर्ण झुगारून देण्याकडे त्यांचा कल होतो !"

"पण कुंदे, मुलांमुलींना लहानपणापासून एकत्र मिसळूं दिल्यानें तरी काय फायदा ?" सुशीलाताईनीं प्रश्न केला.

"कां बरं ? लहानपणापासून एकत्र मिसळण्याचा सराव असला म्हणजे त्यांत विशेष कांहीं वाटेनासें होतें. आणि तेंच तरुण वयांतच मुलगे व मुली एकत्र आलीं तर तारुण्यसुलभ विकारांचा बुद्धीवर पगडा बसून बुद्धीचा तोल चुकतो ! व मग पुष्कळ वेळां अपात्रीं प्रेमाचें दान दिलें जातें. तेंच पूर्वींपासून जर मुलांमुलींनां एकत्र उठण्याबसण्याची मुभा असेल तर त्यांना त्यांत नावीन्य अगर कुतूहल कांहींच वाटणार नाहीं. व त्यामुळें त्यांच्या बुद्धीचा तोलहि सुटूं शकणार नाहीं. म्हणून ह्यासाठीं माझी अशी सूचना आहे कीं, आपल्याला स्पृहणीय वाटणाऱ्या मुलामुलींशीं आपल्या मुलांमुलींची मैत्री जडूं द्यावी. म्हणजे आपल्याला इष्ट वाटणाऱ्या मुलांमुलींच्या जीवनांतील स्वरांत आपल्या मुलांमुलींच्या जीवनांतील स्वर मिसळून त्यापासून सुरेल संगीत निर्माण होईल ! परस्परांना न शोभणारे किंवा धर्मबाह्य विवाह होऊन बेसूर संगीत उत्पन्न होणार नाहीं !"

"खरंच तुझी सूचना फार उत्तम आहे कुंदे. पण चला, माझ्या लेकींच्या लग्नाच्या काळजींतून मी तर सुटलें आहे. आतां इतर मुलींच्या आयांनीं काळजी घ्यावी." सुशीलाताई म्हणाली व त्यांनीं पुढें प्रश्न केला, "पण

काय ग कुंदे, तूं आपल्या किशोरच्या बाबतींत ही सूचना अंमलांत आणली आहेस काय ? ”

“ अद्यापि नाहीं. गेल्या ३।४ महिन्यांत ही कल्पना माझ्या डोक्यांत उद्‌भवली. आतां ह्यापुढें मीं ती प्रत्यक्षांत आणणार. ”

“ पण तुला कुठल्या जातीचा जांवई हवा आहे ? ”

“ कायस्थ ” कुंदाताईनीं पटदिशीं उत्तर दिलें. व लौकर लौकर आक्काकडे पाहिलें.

बरोबर त्याचवेळीं सुनंदा आक्कांनींहि तिच्याकडेच पाहिल्यामुळें तिची ही धांदल आक्कांच्या लक्षांत आली. पण त्याचा अर्थ न कळून त्यांनीं म्हटलें, “ कायस्थ जावई हवा तुला ? बाकी किशोर अर्धी कायस्थ आहे तेव्हां तुला कायस्थ जांवई मिळावयाला कांहींच हरकत नाहीं. ”

आक्कांनीं हे शब्द अर्थात्‌च आपल्या प्रभाकराला उद्देशून कांहीं उच्चारले नव्हते. तरीसुद्धां त्यांनीं निदान त्याबद्दल साफ नकार दर्शविला नाहीं ह्याचाच कुंदाताईना आनंद झाला.

स्पष्ट नापसंतीपेक्षां गुळमुळीत संमति हजारपटीनें बरी नाहीं कां ?— प्रभाकराचें किशोरवर प्रेम होतेंच; किशोर प्रभाकरावर प्रेम करावयाला शिकेल असा चांगलाच संभव दिसत होता ! व ह्या विवाहाला आक्का अडथळा करणार नाहीं अशी आशा तिच्या ह्या शब्दांनीं त्यांना आतां बाटली !

मिळून प्रतिकूल परिस्थितींतहि निराश न होणाऱ्या कुंदाताईना आशा करावयाला आता खूपच अनुकूल परिस्थिति जुळून आली होती !

संध्याकाळीं प्रभाकरपंतांचे मित्र फराळाला येऊन गेल्यावर कुंदाताईनीं ही हकीकत प्रभाकरपंतांना सांगितली.

व त्या उभयतांनीं असें ठरविलें कीं, प्रभाकर–किशोरच्या विवाहाला सुनंदाआक्काचें मत अनुकूल आहे किंवा कसें ह्याचा ह्या महिन्याभरांत अजमास घ्यावयाचा !

## २३ : : विजयेचा नवा नाद!

पण कुंदाताईंना अशा संशयित मनःस्थितींत महिनाभर ठेविण्याची देवाची इच्छा नव्हती! त्यामुळें ही संशयनिवृत्ति होण्याचा एक अचानक मार्ग त्यांना आढळून आला.

दुसऱ्याच दिवशीं दोनप्रहरीं हेमलता त्यांच्याकडे आली. तिच्यासह आपल्या खोलींत जात कुंदाताई म्हणाल्या, " विजयेला तर सुटीच आहे आतां. मग तिला कां नाहीं आणलंस ? "

" पण मी मुद्दामच एकटी आलें आहे. "

" म्हणजे? पुनः मागच्यासारखीच एखादी भानगड आहे कीं काय? "

कुंदाताईच्या ह्या प्रश्नावर हेमलता मंद स्वरात म्हणाली, ' भानगड तर खरीच! पण मागच्यासारखी नाहीं. "

" मग कसली सांग ना. "

" अग, सांगावयालाच तर आलें आहे. कुंदाताई, आमच्या विजयेनें आतां एक नवा नाद घेतला आहे बाई. आपण परवा विठारला गेलों होतों ना, तिथून आल्यापासून पोरगी जरा गप्प गप्पच होती. नि मग दुसऱ्या दिवशीं तिनें आम्हाला चक्क सांगून टाकलं कीं, सुनंदाआक्काच्या विभाकराबरोबर आपण लग्न करणार! आतां ह्याला काय उपाय? "

कुंदाताईंनीं लगेच उपाय न सुचविल्यामुळें कीं काय हेमलता पुढें म्हणाली, " कुंदाताई, काल तूं सांगितलेलं मला फार आवडलं. आणि

खरंच आमच्या जातींतील ५।६ उत्तम मुलगे माझ्या ध्यानांत होतेहि. पण काय उपयोग?"

"म्हणजे हेम, तुमच्या जातींतील ह्या मुलांची नांवं तूं तिला सांगितलीस?"

"होय ग. पण ती म्हणते कीं, आपल्याला मुळीं जातींत लग्नच करावयाचं नाहीं. आजकाल परजातींत लग्न करण्याची फॅशन् निघाली आहे तेव्हां आपणहि तसंच करणार. परधर्मांत नाहीं तर निदान परजातींत तरी लग्न करण्याचा म्हणे निश्चयच केला आहे तिनें."

"शाब्बास! म्हणजे व्यक्तीसाठीं रूढीच्या चाकोरीबाहेर जाणं माणसं पसंत करितात; पण विजया रूढीच्या चाकोरीबाहेर जाण्यासाठीं व्यक्तीला पसंत करणार! छान!"

"पण बाई, त्या परेरापेक्षां तुमचा विभाकर किती तरी पटीनें बरा!"

"तें खरं ग. पण विभाकर तयार आहे काय विजयेबरोबर लग्न करावयाला?"

"त्याचसाठीं तर मीं तुझ्याकडे आलें आहे. तुझा भाचा आहे तो, तेव्हां तूं करून घे एवढं." हेमलतेनें वधूमातेच्या नम्र अजीजीनें विनंति केली.

त्याबरोबर कुंदाताई चटकन् म्हणाल्या, "अग पण, माझ्या हातांत काय आहे? आक्काला नि विभाकराला पसंत पडावयाला हवं."

"विभाकराला बहुतेक पसंत पडेल असें विजयेच्या बोलण्यावरून मला वाटलें. पण आक्काला—"

"हं, हं! म्हणजे हेम, काल इथें आल्यावेळीं बोलतां बोलतां आपल्या मुलांना परजातींतील मुली करून घ्यावयास हरकत नाहीं असें आपलें मत तूं आक्काला सांगितलेंस तें एवढ्याचसाठीं?"

"होय ग. पोरगी जर हटूनच बसली आहे तर काय करणार? पण काय ग हेम, आक्काला त्या दिवशीं माझं मत पटलं असेल काय ग?"

"पटलं असेल असं मला तरी वाटलं, निदान मला तशी आशा वाटली—"

कुंदाताईच्या ह्या उत्तरानें चकित होऊन हेमलतेनें विचारलें, " आशा वाटली तुला ? ती ग कां ?"

किंचित् हंसून कुंदाताई उत्तरल्या, " अग, आक्काचा धाकटा मुलगा तुला जांवई हवा आहे नि मोठा मुलगा मला जांवई हवा आहे, कळलं ?"

" अस्स होय ? वा: ! मग माझं काम होणारच तर! आणि कुंदाताई, खरं सांगू तुला ? आमच्या सारस्वत जातींतील एकादा तरुण जर विजयेनें पसंत केला असता तर मला फार आनंद झाला असता ! पण तिला पर-जातींतच जर विवाह करावयाचा तर विभाकराइतका चांगला मुलगा सांपडणं क्वचित् ! स्वभाव, शिक्षण, रूप, कूळ, सारं कांहीं उत्तम आहे ! "

हें खरं! आणि प्रभाकरहि किती चांगला आहे. त्याचा स्वभावसुद्धां भारी प्रेमळ व साधा !"

" विभाकरहि फार प्रेमळ आहे बरं! आणि बोलका तरी किती!"

" नुसता बोलकाच नव्हे, बडबड्या आहे नुसता! भारी पोरकट आहे! प्रभाकरासारखा समंजस नाहीं तो!"

" पण लहानच आहे ना! आणि सदां म्हाताऱ्यासारखं गंभीर रहा-ण्यापेक्षां पोरकटपणा खूप बरा!"

" वा: ! अगदीं जातिवंत सासू आहेस कीं! किती वर्णन करशील जांवयाचें ?" कुंदाताईनीं चेष्टा केली.

त्यावर उलट चेष्टा करण्यासाठीं हेमलतेनें म्हटलें, " आणि बाईसाहेब, आपल्या जांवयाची आपण काय कमी स्तुति केलीत आतां ?"

" अग, त्यांत काय नवल ? माझा भाचा आहे तो नि भाच्याचें कौतुक मावशीला वाटावयाचेंच !"

कुंदाताईनीं घेतलेल्या ह्या कलाटणीची मौज वाटून हेमलता म्हणाली, " छान, छान! बाकी, तूं काय मला बोलण्यांत ऐकणार! कुठें माझं तुट-पुंज, मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण आणि कुठें तुझं विलायती उच्च शिक्षण! पण तें कांहीं न मानतां तूं माझ्यावर एवढं प्रेम करतेस! वस्तुतः आपल्या दोघींत किती अंतर—"

" कसलं ग अंतर म्हणतेस ? आपण आतां विहिणी होणार नि मग

कुठून असणार अंतर?” आपल्या नेहमींच्या वृत्त्यनुसार कुंदाताईंनीं आपल्या स्तुतीचें पुराण थट्टेवारी नेलें.

व मग अशीच आणखी थोडी चेष्टामस्करी होऊन दुसऱ्या दिवशीं दोनप्रहरीं सुनंदाआक्कांना–कुंदाताईच्या व हेमाताईच्या विहीणबाईला—भेटावयास जाण्याचें नक्की ठरलें.

———

" मग काय आक्का, विभाकराला करून घेणार ना तूं विजया ! " दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं आक्काच्या घरीं गेल्यावेळीं कुंदाताईनीं प्रश्न केला.

" इश्श कुंदे ! यंदा कुठें तो इंटरला बसलाय ! नि इतक्यांत काय त्याच्या लग्नाच्या गोष्टी ? "

" पण आक्का, कॉलेजांतील वारं कानांत अधिक शिरल्यावर विभाकर जर एखाद्या अगदींच भलत्या जातीच्या मुलीच्या जाळ्यांत अडकला तर ? "

" छे: ! माझा विभाकर तसा नाहीं बरं ! माझ्या मुलांची रीत वेगळीच आहे ! विभाकरापेक्षां प्रभाकर चांगला ७।८ वर्षांनीं मोठा पण तो नाहीं कुठें असा जाळ्यांत सांपडला.

आक्काच्या ह्या प्रश्नावर बोलूं न बोलूं करीत कुंदाताई क्षणभर थांबल्या व नंतर मृदु स्वरांत म्हणाल्या, आक्का, प्रभाकर इतर कुणा मुलींच्या जाळ्यांत न सांपडण्याचं तसंच कारण आहे. आक्का तुझ्या प्रभाकराचं माझ्या किशोरवर प्रेम जडलं आहे. "

" काय खरं म्हणतेस ? नि माझ्या कसं तें ध्यानांत आलं नाहीं ?" विस्मयोच्च स्वरांत आक्का उद्गारल्या. व हल्लीं किंचित् निवळू पहाणारी त्यांची पूर्वीची रागीट वृत्ति वर डोकावून त्या पुढें म्हणाल्या " म्हणजे कुंदे, मला नकळत तूं प्रभाकराचं किशोरबरोबर लग्नसुद्धां ठरविलंस कीं काय ?

" आक्का, मीं कधीं तरी असं करीन काय? सुमारें १५।२० दिवसां-पूर्वी प्रभाकराशीं गोष्टी करीत असतांना त्याचं किशोरवर प्रेम जडलं आहे हे मला कळून आलं! परंतु त्यानें अद्यापि किशोरकडे त्याची वाच्यताहि केलेली नाहीं."

" आणि हें माझ्या कांहींच लक्षांत आलं नाहीं?"

" आक्का, मी बोलतें म्हणून रागावूं नकोस पण तूं आपल्या मुलांकडे मोकळ्या मनानें वागत नाहींस. आई ही आपल्या मुलांची खरीखुरी मैत्रीण असते हें तत्त्व तूं आपल्या आचरणांत आणीत नाहींस! त्यामुळें तुझे मुलगे आपलं हितगुज तुझ्याजवळ सांगूं शकत नाहींत!"

कुंदाताई हें सौम्य शब्दांत बोलल्यामुळें व मुख्य म्हणजे सुनंदाआक्कांचा चढेल रागीट स्वभाव वयपरत्वें बराच मावळल्यामुळें त्यांनीं हें मुकाट्यानें ऐकून घेतलें. व प्रश्न केला, " पण विभाकराला विजया पसंत आहे?"

कुंदाताई फार व्यवहारचतुर होत्या. विहारला गेल्यावेळीं विभाकराचा आपल्याकडे ओढा दिसून आला हें विजयेकडून हेमाताईला व तिच्या-कडून कुंदाताईना कळलें असलं तरी तें आतां आक्काला न कळविणेंच श्रेयस्कर असें वाटून त्या म्हणाल्या, " तें विभाकराला तूं विचारून घे. पण आक्का, जर विभाकराला विजया पसंत असली तर ह्या विवाहाला तूं संमति देशील काय? आणि—आणि—आक्का, प्रभाकराचा किशोरबरोबर विवाह झाला तर तुला चालेल काय?"

कुंदाताई हें बोलत असतां सुनंदाआक्का लक्षपूर्वक त्यांच्याकडे पहात होत्या.

लहानपणीं त्यांच्याहातून आक्कांची एकादी आगळीक घडल्यावेळीं आक्कांच्या नजरेपुढें कुंदाताई जशा भयभीत होत तशा त्या आतां झाल्या होत्या!

आक्कांचा स्वभाव जरा तऱ्हेवाईक व आढ्यतेखोर असला तरी त्यांचें कुंदाताईवर फार प्रेम होतें व आतांची कुंदाताईची घाबरीघुबरी मुद्रा पाहून त्या प्रेमांत कौतुकाची भर पडली!—

व आक्का हंसत हंसत म्हणाल्या, " कुंदे, माझ्या मुलाचं तुझ्या मुली-

वर प्रेम जडलं हा जर गुन्हा असला तर तो माझ्या मुलाच्या हातून घडला आहे. पण आतांची तुझी मुद्रा पाहून एकाद्याला वाटेल कीं, तूंच कांहीं तरी भयंकर गुन्हा केला असणार ! ”

थकून भागून गेल्यानंतर आतां घरीं जाऊन स्वयंपाक करावयाचा ह्या विचारानें आणखीच त्रासून गेलेल्या तरुणीला घरीं सुग्रास जेवण तयार असल्याचें आढळून येतांच जसा अनपेक्षित साश्चर्य आनंद वाटतो तसा आक्कांच्या ह्या चेष्टेनें कुंदाताईंना आनंद वाटला !

त्यांनीं हंसून आक्काकडे पाहिलें. पण त्या हंसण्यांत व पहाण्यांतहि त्यांच्या अंतःकरणांतील साशंकता ध्वनित होत होती.

त्यामुळें आक्का लगेच म्हणाल्या, “ कुंदे, आजकाल दिवस आले आहेत विचित्र ! प्रभाकराने एकादी पारशीण किंवा किरिस्तावीण गळ्यांत बांधून घेण्यापेक्षां तुझी किशोर हजार पटीनें बरी ! शिवाय, तुझी किशोर माझी भाचीच आहे. आतां ह्या हेमाताईंची विजया परजातीची आहे खरी ! पण त्या दिवशीं ह्यांनींच सांगितल्याप्रमाणें परजातीची मुलगी लग्न झाल्यावर आपली होत असते ! आणि कायस्थ, ब्राह्मण व सारस्वत ब्राह्मण ह्या तिन्ही जातींच्या रीतरिवाजांत साम्य आहे. तेव्हां विभाकराला जर विजया पसंत असेल तर मला कांहीं हरकत नाहीं.”

“ आक्का, तुझीं मतं इतकीं उदार आहेत हें पाहून मला फार आनंद वाटतो आहे.”

“ पण कुंदे, ह्या उदारतेमध्यें एक मोठीच गोम आहे ! अग, आज-काल किनई, आपला मान आपणच ठेवावा लागतो ! आणि माझ्या आळवाची खाज मला नीट ठाऊक आहे ! कुंदे, प्रभाकर एरवीं गरीब, प्रेमळ असला तरी एखाद्या वेळीं चिरडीला गेला तर त्याच्याएवढा तापट डोक्याचा कोणी नाहीं. त्याचं किशोरवर जर प्रेम आहे तर मी संमति देण्यांतच माझा मोठेपणा आहे ! नाहीं तर कदाचित् तो आमची संमति साफ गुंडाळूनसुद्धां ठेवायचा ! बरं विभाकरहि त्याचाच भाऊ ! त्याला विजयेशीं लग्न करण्याची इच्छा असतांना परजातींतील सून नको अशी मी जर मनाई केली तर मुद्दाम माझ्यावर उलटा घाव मारण्यासाठीं तो

एखादी परधर्मांतील बया गांठावयाचा! तेव्हां एवढं होऊं देण्यापेक्षां आपणच मोठेपणानें परवानगी द्यावी हें बरं नाहीं कां?"

"आणि आक्का, भाऊसाहेबांचं मत ग?"

"ते माझ्याबाहेर जाणार नाहींत कुंदे. बाकी, अगदीं खरं सांगावयाचं तर मला मनापासून जातींतील सुना हव्या होत्या. पण आजकालच्या अति थराला पोंचलेल्या सुधारणेला बळी पडून प्रभा–विभांनीं परधर्मी बायका करण्यापेक्षां परजातींतील मुली माझ्या सुना झालेल्या पुरवल्या! अग, दगडापेक्षां वीट मऊ!"

सुनंदाआक्का हें सहज बोलल्या. पण त्यासरशीं कुंदाताईंना यूसफ प्रकरण व हेमाताईला परेरा प्रकरण आठवलें. व त्या मोहपाशांतून आपल्या मुली आतां कायमच्या सुटल्याबद्दल त्या दोघींना अपरिमित आनंद झाला!

मानवी मनाची मौजच अशी असते कीं, आपल्याला थोडीशी नको वाटणारी घटनाहि घडूं नये म्हणून आपण फार जपतों! पण त्यापेक्षांहि अधिक नकोशी वाटणारी दुसरी घटना घडणार असें वाटतांच त्यापेक्षां ती पहिली घटना तरी घडून येवो असें वाटून त्या बाजूनें आपण प्रयत्न करितों!—

सारा सापेक्षतेचा खेळ! सुनंदाआक्कांनीं म्हटल्याप्रमाणें 'दगडापेक्षां वीट मऊ' हाच न्याय आपण हरघडी लागू करीत असतों!

## २५ : : मुकी कळी उमलली!

विभाकराला विजया पसंत आहे हें कळतांच तो बी. ए. झाल्यावर हें लग्न उरकून टाकण्याचें सुनंदाआक्कांनीं व भाऊसाहेबांनीं नक्की केलें. व प्रभाकर—किशोरनीं परस्परांत जमविल्यास आपली संमति देण्याचेंहि त्यांनीं ठरवून टाकलें.

आक्का व भाऊसाहेब ह्या दोघांचीं मतें इतकीं सुधारलीं ह्याबद्दल कुंदाताईंना आश्चर्य वाटलें!

पण वास्तविक ह्यांत आश्चर्यकारक कांहीं नव्हतें. सुनंदाआक्का व भाऊसाहेब ह्यांच्यासारख्या बहुजनसमाजाच्या मागून मुकाट्यानें जात रहाणाऱ्या माणसांना वास्तविक स्वतःचें मतच नसतें!

आणि नव्या सुधारणा व नवीं मतं ह्यांचा फार सुळसुळाट झाला कीं बहुजनसमाज जुन्यांत शिरूं पहात असतो!

प्रौढविवाह, अतिप्रौढविवाह, प्रीतिविवाह, आंतर्जातीयविवाह, आंतर्धर्मीयविवाह अशा पायरीपायरीनें सुधारणा होऊं लागल्या. व आतां पश्चिमेकडील वारा आणखीच कानांत शिरून नवी पिढी विवाहाला करारार्चें स्वरूप देणार कीं काय असें भय वाटूं लागल्यामुळें बऱ्याच सुधारकांनाहि ह्या अतिसुधारणांची शिसारी येऊं लागली!

व पुनः जुन्यांत शिरण्यामध्यें ह्याचें पर्यवसान होऊं लागलें. पूर्वीचे साधारण प्रौढविवाह आतां बरे वाटूं लागले!

मुलांना आपल्या अनुभवाचा—आपल्या ज्ञानाचा फायदा जर द्याव-

याचा असेल तर त्यांना पंख फुटण्याच्या आधीं तो देतां येतो हें बहुतेक आईबापांना आतां पटूं लागलें आहे!

त्यामुळें साधारण २०।२२ वर्षांच्या वयाला मुलाचें व १७।१८ वर्षांच्या-सुमाराला मुलींचें लग्न करणें श्रेयस्कर असें वाटूं लागलें आहे!—

मुलें फार प्रौढ झाल्यावर तीं आईबापांचें मत गुंडाळून ठेवितात व मग आपल्या मतानें त्यांनीं केलेले विवाह सुखाचे झाले तरी त्यांत आई-बापांना स्वारस्य वाटत नाहीं. व ते सुखाचे न झाले तरी आईबापांकडून मुलांना सहानुभूति मिळत नाहीं. अशी चमत्कारिकच परिस्थिति निर्माण होती!

ह्याला उपाय म्हणजे विवाहाला वयोमर्यादा घालणें! आणि हें इतरां-प्रमाणें सुनंदाआक्का व भाऊसाहेब ह्यांनाहि कळून आलें होतें. व म्हणून आंतर्जातीय विवाहांना त्यांनीं जरी परवानगी दिली तरी त्यापुढें जाऊन मुलांनीं धर्मबाह्य विवाह तरी निदान करूं नये म्हणून विभाकराचा विवाह सध्यांच ठरवून टाकण्याची त्यांनीं घाई केली!

व त्याप्रमाणें आणखी २।३ वर्षांनीं वृंदेबरोबर सुधाकराचा विवाह करा वयाचा हेंहि कुंदाताईनीं व प्रभाकरपंतानीं आतांच नक्की करून टाकलें!

सुशीलाताईच्या नणंदेचा मुलगा विनायक एकदांचा एम्. बी. बी. एस्. झाल्यामुळें यंदा त्याचा कुंदेशीं विवाह होणार होता!

मिळून प्रभाकर व किशोर ह्यांच्या विवाहाचा प्रश्नच तेवढा लोंबकळत राहिला! परंतु त्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागावा अशी कुंदा-ताईची कितीहि इच्छा असली तरी त्यांत ढवळाढवळ करण्याची त्यांची इच्छा नव्हती. किंबहुना त्यांत ढवळाढवळ करण्याचें त्यांना भय वाटत होतें. कारण किशोरच्या हटवादी स्वभावाचा त्यांना चांगला परिचय होताच, परंतु युसफबरोबर विवाह करण्याच्या हेतूला आईनें जो मोडता घातला तो एकाद्या बारा वर्षांच्या परकऱ्या पोरीप्रमाणें वडील माणसांनीं ठरविलेल्या कुणातरी तरुणाशीं लग्न करून टाकण्यासाठीं असें किशोरला वाटूं नये म्हणून त्या फार जपत होत्या. व म्हणूनच त्या ह्या बाबतींत कांहींहि भाग घेत नव्हत्या!

बरं, प्रभाकराचें किशोरवर दृढ प्रेम असलें तरी त्याचा किशोरकडे उच्चार करण्याला त्याची संकोची वृत्ति आड येत होती!

अशा रीतीनें सुमारें दोन महिने गेले. युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या परीक्षांचे निकाल एकामागून एक प्रसिद्ध झाले.

विजयेनें मॅट्रिकमध्यें चांगलें यश मिळविलें. कुंदा आणि विभाकर इंटरच्या परीक्षेला सेकंड क्लासांत आलीं.

व मग सर्वांत शेवटीं सेकंड एल्‌एल्. बी. चा निकाल लागला. आणि प्रभाकरानें फर्स्ट क्लास मिळविल्याचें जाहीर झालें.

प्रभाकराच्या ह्या यशानें सर्वांनाच फार आनंद झाला. व २।३ वर्षें इकडे तिकडे फुकट गेलीं तरी ह्या शेवटल्या परीक्षेंत पहिला वर्ग मिळवून आपल्या बुद्धिमत्तेला योग्य श्रेय मिळालें असें वाटून प्रभाकराला फारच समाधान वाटलें. परंतु ह्या यशाचें इतर सर्वांनीं कौतुक केलें तरी त्यामुळें प्रभाकराला खरी तृप्तता वाटली नाहीं.

व ही खरी तृप्तता मिळविण्यासाठीं तो त्याच दिवशीं संध्याकाळीं किशोरकडे आला.

त्यावेळीं तीं सर्व मंडळी दिवाणखान्यांत गप्पा मारीत बसलीं होतीं.

प्रभाकर येतांच सर्वांआधीं सुधाकर मोठ्यांदा ओरडला, " कॉंग्रॅच्युलेशन्स प्रभादादा ! पेढे काढ, पेढे काढ. "

त्यानंतर प्रभाकरपंत म्हणाले, " प्रभाकर, छान यश मिळविलंस हं ! फार छान ! "

मग प्रभाकराच्या पाठीवरून हात फिरवीत कुंदाताई म्हणाल्या, " प्रभाकर, शाब्बास ! आम्हांला फार आनंद झाला, बाबा ! आक्काला तर केवढा आनंद झाला असेल, नाहीं ? "

ह्यावर प्रभाकर उत्तरादाखल काय पुटपुटला कोण जाणे! फार काय, ह्या तिघांनीं आपलें कसें कोणत्या शब्दांत अभिनंदन केलें हेंहि प्रभाकरानें धड ऐकलें नाहीं. त्याचे डोळे किशोरच्या मुखकमलाकडे धांवत होते. व किशोर अभिनंदनादाखल एक अक्षरहि जरी बोलली नाहीं तरी तिच्या मुद्रेवरील हंसरा आनंद पाहूनच प्रभाकराला कृतार्थ वाटलें.

तळपायाची आग जशी मस्तकाला पोंचते त्याप्रमाणें हृदयांत प्रादुर्भूत होणारा प्रीतिरोग बुद्धीपर्यंत पोंचून तिला बधिरत्व आणीत असणार खास! कारण, नाहीं तर इतरांच्या लांबलचक अभिनंदनापेक्षां किशोरच्या ह्या मौनाची किंमत प्रभाकराला अधिक कशी वाटली असती?

परंतु प्रभाकराला ह्या प्रीतिरोगानें पुरतेंच पछाडलें होतें. त्या दिवशीं किशोर त्याच्याजवळ एक शब्दहि बोलली नाहीं तरी यत्किंचित्‌हि नाराज न होतां प्रभाकर पुनः दुसऱ्या दिवशीं तिकडे आला.

आज मात्र किशोर एकटीच दिवाणखान्यांत वाचीत बसली होती.

प्रभाकराला पहातांच ती हंसून म्हणाली, "या, वकीलसाहेब" ह्यावर प्रभाकर उत्तरादाखल किंचित् हंसला. परंतु किशोरनें पुढें केलेल्या खुर्चीवर तो बसला मात्र नाहीं.

अस्वस्थ मनानें तो फेऱ्या घालूं लागला, वकीलीचा शिक्का मिळतांच त्या धंद्याला अत्यवश्यक असणारें बोलकेपणाचें भांडवलहि आपोआप प्राप्त होत असतें तर फार बरें झालें असतें असें त्यावेळीं प्रभाकराला वाटलें.

शेवटीं नाइलाज होऊन त्यानें सर्व धैर्य एकवटलें व किशोरच्या जवळ येऊन व जरा पुढें वांकून तो म्हणाला, "किशोर, माझं तुझ्यावर प्रेम आहे हें तुझ्या लक्ष्यांत आलं असणारच! किशोर, तुझ्याबरोबर लग्न करण्याची माझी इच्छा आहे. पण—तुझं—तुझं माझ्यावर प्रेम आहे काय?"

प्रभाकराचे हे शब्द ऐकतांच किशोर बावरली.

प्रभाकर जें बोलला तें वास्तविक तिला अनपेक्षित वाटलें नाहीं पण त्याचा प्रत्यक्ष उच्चार होतांच ती लाजली, गडबडली.

जरा थांबून प्रभाकर पुनः म्हणाला, "किशोर, बोल ना, माझ्यावर आहे कां तुझं प्रेम?"

"मी—मी-- त्याबद्दल कधीं विचारच केला नाहीं." किशोर हळंच पुटपुटली.

किशोर प्रीतीचे खेळ खेळण्यांत खरोखरीच नवखी होती! तिला खऱ्या, विशुद्ध प्रेमाची ओळख आजवर पटलीच नव्हती. यूसफवर आपलें प्रेम आहे असें तिला वाटत होतें, पण वस्तुतः त्याच्या लाघवी भाषणाची, धिप्पाड

बांधेसूद शरीराची व रसिक वृत्तीची तिला भूल पडली होती, एवढंच !

पण प्रभाकराला तिच्याविषयीं जी निर्मळ प्रीति वाटत होती त्या प्रीतीचा बहर अद्यापि तिच्या हृदयांत फुलला नव्हता ! तिचें हृदय अद्यापि मुक्या कळीसारखें होतें.

त्यामुळें आतां प्रभाकरानें आपलें प्रेम उघड करितांच, ती गोंधळून गेली. व तिच्या सुंदर चर्येवर हा गोंधळ इतका यथार्थ उमटला कीं त्यामुळें तशा स्थितींतहि प्रभाकराला हंसूं आलें व मौज वाटली !

आजकाल किशोरपेक्षां वयानें, शिक्षणानें किती तरी लहान असणाऱ्या मुली खुशाल प्रेमाचे आचरट खेळ खेळतात आणि वीस वर्षांची, शिकली सवरलेली किशोर ह्या बाबतींत एवढी नवखी, लाजवट होती !

४।५ मिनिटें दोघंहि स्तब्धच होतीं.

नंतर प्रभाकर अनुनयाच्या स्वरांत म्हणाला, किशोर, आज तुझं माझ्यावर प्रेम नसलं तरी पुढें केव्हां तरी जडेल काय ? किशोर, माझ्या-विषयीं तुला कांहींच आपुलकी वाटत नाहीं ?"

" असं कसं म्हणतोस प्रभाकर ? तूं मला कितीतरी आवडतोस."

" पण किशोर, आवड आणि प्रेम हीं भिन्न आहेत !"

" पण—पण आवड ही पहिली पायरी नाहीं कां ?" किशोर हळूंच म्हणाली.

" होय. पण त्या पहिल्याच पायरीवर तूं रहावंस अशी माझी इच्छा नाहीं. तूं पुढल्या पायरीवर कधीं चढणार ?" प्रभाकरानें आतुर स्वरांत प्रश्न केला.

एक मंद निःश्वास सोडून किशोर म्हणाली, " तें मीं कसं बरं सांगूं ?",

" पण—पण तूं तसा प्रयत्न तरी करशील ना ?" प्रभाकरानें हा प्रश्न इतक्या आर्जवानें, प्रेमानें विचारला कीं, किशोरच्या हृदयाला गोड गुद-गुल्या झाल्या.

परंतु तिला आपल्या हृदयाची ओळख पटली नव्हती. त्यामुळें तिनें ह्यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं.

प्रभाकर प्रेमी तरुण असला तरी अधीरपणानें प्रेम मिळत नसतें हें तो

जाणून होता. त्यामुळें आपल्या उतावीळ हृदयावर त्यानें दाब ठेवला. किशोरला आपल्याविषयीं अगदींच उदासीन भाव वाटत नाहीं. ह्यांतच त्यानें समाधान मानलें व तोंडावर उसनें स्मित आणीत तो म्हणाला, " बरं तर जातों मीं."

व दारापर्यंत गेल्यावर सहज वळून पहात तो म्हणाला, " किशोर, बॅरिस्टर होण्यासाठीं पुढल्या महिन्यांत मीं इंग्लंडला जाणार."

आणि मग डोळे विस्फारित करून तो किशोरकडे पहातच राहिला. कारण क्षणापूर्वीं हंसरी परंतु निर्विकार दिसणारी किशोरची मुद्रा आतां एकदम बदलली.

तिचे हंसरे गाल निस्तेज झाले व चमकणारे डोळे खिन्न दिसूं लागले.

तिच्या हृदयाची मुकी कळी क्षणार्धांत उमलली!

प्रभाकर दूर—इंग्लंडला—जाणार हे शब्द ऐकतांच त्याच्याविषयीं आपल्याला निव्वळ आपुलकी वाटत नसून विशुद्ध प्रीति वाटत आहे हें झट्दिशीं तिच्या लक्ष्यांत आलें—

व त्याचें प्रतिबिंब तिच्या चर्येवर उमटलें.

तिच्या हृदयाच्या उमलत्या कळीचे रंगोपरंग तिच्या लाजऱ्या गालावर व विचकलेल्या नेत्रांमध्यें नाचूं लागले.

व तें पाहून जवळजवळ धांवत प्रभाकर परत आला.

तो भारी गोंधळून गेला होता.

किशोरचें आपल्यावर प्रेम आहे हें त्याला कळून आलें!— पण हा चमत्कार घडला कसा तें त्याला कळेना!

आपल्यावर प्रेम जडलें नसल्याची प्रामाणिक कबुली किशोरनें क्षणापूर्वीं दिली नि इतक्यांत एवढा फरक झाला कसा, हें त्या फर्स्टक्लास एल्एल्. बी. ला कळेना!—

पण आतां ह्याबद्दल विचार करीत थांबणें चुकीचें आहे हें मात्र त्याला कळलें.

हा क्षण बुद्धीचा नसून हृदयाचा आहे हें त्यानें ओळखलें व किशोरच्या खांद्यावर दोन्ही हात ठेवून पुढें वांकत तो म्हणाला, " किशोर, तुझं

माझ्यावर प्रेम आहे तर? होय? खरं?"

आपल्या धडधडणाऱ्या हृदयावर डावा हात ठेवीत किशोर सलज्ज स्वरांत उत्तरली, "होय-- "

व प्रभाकरानें पसरलेल्या बाहूंचा आवडीनें आश्रय घेत ती लाडक्या, लाजऱ्या स्वरांत म्हणाली, "तूं इंग्लंडला जाणार असं ऐकतांच मला कसं तरीच झालं.–नि–नि मला कळलं कीं ... कीं ......"

"हं, बोल ना पुढें." प्रभाकर हंसत म्हणाला—

"अं हं, मीं नाहीं जा. तुला ठाऊक आहे काय तें" रुसक्या स्वरांत किशोर बोलली.

त्याबरोबर प्रभाकर मनापासून हंसला व आपल्या छातीवर विसांवलेल्या किशोरच्या मस्तकावर त्यानें आपला गाल टेंकला.

त्याक्षणीं किशोरविषयींच्या आत्यंतिक प्रेमानें त्याचें हृदय उचंबळत असलें तरी आपल्या इंग्लंडला जाण्याच्या बेताचा ऐनवेळीं उल्लेख करण्याची बुद्धि सुचविल्याबद्दल व त्या योगानें किशोरचें व आपलें जीवन सुरेल संगीतमय बनविल्याबद्दल ईश्वराविषयींची कृतज्ञताहि त्याच्या हृदयांत तितक्याच वेगानें स्फुरत होती !

---

उदयोन्मुख लघुकथा लेखक
**शंकर वामन कुलकर्णी** यांची
ग्रामोद्योगानें अखिल भारतवर्षांत जागृति निर्माण करून ऐक्य कसें निर्माण करतां येईल याचा सांगोपांग उहापोह करणारी अशी ग्रामीण जीवनावर आधारलेली व स्वानुभवानें लिहिलेली
—हृदयंगम कादंबरी—
**-स मा धा न-**
**लौकरच प्रसिद्ध होईल !**

# वीणा प्रकाशन

—उत्कृष्ट वाङ्मयप्रकाशन संस्था—

१ समरभूमि— ( कादंबरी ) प्रो. ना. सी. फडके.
कि. रु. १॥

२ स्वैर विचार—( निबंधसंग्रह ) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
कि. रु. १॥

३ दोन मनें— ( कादंबरी ) श्री. वि. स. खांडेकर
कि. रु. २

४ कांता— ( कादंबरी ) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
फेब्रुवारींत प्रसिद्ध होईल.

५ आविष्कार—( कादंबरी ) गीता साने

वरील सर्व पुस्तकें, एक रुपया प्रवेश फी भरून वीणा-प्रकाशनाचे कायम ग्राहक झाल्यास पाऊणपट किंमतींत मिळतील. ट. ख. निराळा. प्रत्येक पुस्तक घेतलेंच पाहिजे असें बंधन नाहीं.

वीणा प्रकाशन,
सिताबर्डी, नागपूर.

# आमचीं कांहीं उत्कृष्ट पुस्तकें

**पूजनः**—लेखकः—वि. स. खांडेकर

लेखकानें स्वतः निवडलेल्या लघुकथांचा संग्रह किं. १॥ रु.

**काम आणि कामिनीः**—लेखिकाः—कु. प्रेमा कंटक

विवाहोत्तर ब्रह्मचर्याची चर्चा करणारी व गांधीवादावर अधिष्ठित झालेली एक उत्कृष्ट कादंबरी. किं. २॥ रु.

**मावळता चंद्रः**—लेखकः—बा. भ. बोरकर

श्री. बोरकर हे गोमांतकीय प्रसिद्ध कवि असून त्यांची ही कादंबरी म्हणजे नितांत सुंदर व रमणीय अशा गद्य काव्याचा एक उत्कृष्ट नमुनाच होय. किं. १। रु.

**आजचें स्वराज्यः**—लेखकः—वा. वा. जोशी

ह्या पुस्तकांत १९३५ च्या कायद्याची थोडक्यांत सुलभ रीतीनें माहिती दिली असून सामान्य माणसांना व विद्यार्थ्यांना हें पुस्तक अत्यंत उपयुक्त असें ठरलें आहे. किं. ६ आ.

**जीवन-प्रकाशनः**—साने गुरुजी

लहान मुलांना टिळक, गांधी, श्रद्धानंद व बॅ. दास ह्या थोर पुढाऱ्यांचा गोष्टीरूपानें ह्या पुस्तकांत परिचय करून दिला आहे. किं. ३ आ.

**सीतास्वयंवरः**—ले. कवि नागेशकृत किं. २–८ आ.

**पुष्प-परागः**—(कथासंग्रह) ले०–कु. कुमुदिनी प्रभावळकर, B. A.

'कृष्णाबाई'नंतर महाराष्ट्र सारस्वताच्या लघुकथा-प्रांतांत दुसरें मानाचें स्थान घेणारी स्त्री–लेखिका म्हणून कु. कुमुदिनी प्रभावळकर ह्या प्रसिद्ध असून, त्यांनीं ह्या लघुकथांमधून स्त्री-पुरुषांचें परस्पर संबंध साध्या सोप्या भाषेमध्यें मनोवेधक रीतीनें मांडले आहेत. त्यामुळें प्रत्येक गृहिणीस अवश्य वाचनीय असा हा कथासंग्रह झाला आहे. किं. १। रु.

**करवीराच्या कळ्याः**—(लघुकथा–संग्रह) किं. १। रु.

**चौपाटीवरः**—डॉ. श्री. वाळिंबे किं. १। रु.

याशिवाय सर्व प्रकारचीं पुस्तकें आमचेकडे मिळतात.

**— महाराष्ट्र ग्रंथ भांडार, महाद्वार रोड, कोल्हापूर.—**

# सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें २.

*१, २ सत्याचे प्रयोग अथवा महात्मा गांधींचें आत्मचरित्र
किंमत प्रत्येक भागास १ रुपाया.

३ **खादी-मीमांसा**—ले. बाळूभाई मेहता. १॥ रुपया.
( सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति )

४ **स्वराज्यशिष्टाई**—
महात्मा गांधींचीं गोलमेजपरिषदेपुढील भाषणें आणि विलायतेंतील इतर मुलाखती, वगैरे. किं. ६ आणे.

५ **संयम कीं स्वैराचार ?**—ले. महात्मा गांधी. किं. ८ आणे.

६ **हिंडलग्याचा प्रसाद**—ले. काका कालेलकर. किं. ९ आणे.

*७ **हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना**—ले. बाळूभाई मेहता.
प्रख्यात तत्त्वज्ञ सर राधाकृष्णन् यांच्या 'Hindu view of life' या अत्यंत नांवाजलेल्या ग्रंथांचें सुबोध भाषांतर वाचून हिंदुधर्माचें सिद्धांत जाणून घ्या. किं. १ रु.

*८ उपनिषदांतील दहा गोष्टी—(पुनर्मुद्रण) ले. शंकर दत्तात्रय देव.
किं. ६ आणे.

*९ **विद्यार्थीजीवन**—( पुनर्मुद्रण ) ले. श्रीपाद सदाशिव महाजन.
विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक उन्नतीला पोषक अशा विविध विषयांचें या पुस्तकांत सोप्या भाषेंत विवेचन केलें आहे. किं. ८ आणे.

*१० **फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास**—
ले. त्र्यं. देवगिरीकर.

३५० वर्षांच्या पारतंत्र्यांत फिलिपिनोजनीं बंडें केलीं, परक्या राष्ट्राच्या मदतीकरितां याचना केली, कौन्सिलें लढविलीं, राष्ट्रसंघापुढें गाऱ्हाणीं मांडलीं, पण व्यर्थ गेलें. जोसेफ रिझॉलचें चरित्र म्हणजे स्फूर्तीचा अखंड झरा आहे. स्पेनच्या ताब्यांतून सुटून अमेरिकेच्या ताब्यांत हीं बेटें कशीं गेलीं याचा संतापजनक इतिहास या पुस्तकांत आढळतो. स्वतंत्र होऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक तरुणानें हा इतिहास एकदां तरी अवश्य वाचावा. किं. १ रु.

**११ कॉंग्रेस इतिहास**—( आवृत्ति दुसरी )

कॉंग्रेसच्या गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास म्हणजेच भारतवर्षानें आतांपर्यंत स्वातंत्र्याप्रीत्यर्थ केलेल्या चळवळींचा संपूर्ण इतिहास ह्या पुस्तकांत दिलेला आहे. प्रत्येक स्वातंत्र्येच्छु मनुष्यास हें पुस्तक संग्रहीं ठेवतां यावें म्हणून ह्या साडेआठशें पानांच्या पुस्तकाची किं. २ रुपयेच ठेविली आहे.

**१२ समाजवादच कां?**—अनुवादक—ना. ग. गोरे B. A. LL. B.

समाजवादच कां प्रस्थापित झाला पाहिजे, समाजवाद म्हणजे काय, समाजवादच प्रस्थापित झाला म्हणजे समाज कसा सुखी होईल, याचें अगदीं सोप्या भाषेत या पुस्तकांत वर्णन केलें आहे. किं. १० आणे.

**१३ खानबंधूंचा अल्प परिचय**—अनुवादक--प्रेमा कंटक.

अबदुल गफूरखान व डॉ. खान ह्या बंधुद्वयाचें अल्पचरित्र. किं. ९ आणे

या पुस्तकांत सरहद्द प्रांतांतील लोकांवर काय काय जुलूम, जबरदस्ती व छळ होत आहेत आणि तेथील लोक किती अज्ञानांत व गुलामगिरींत ठेविले आहेत याचें हृदयद्रावक वर्णन' सरकारी कागदपत्रांच्या आधारेंच दिलेलें आहे. तरी प्रत्येक हिंदवासी स्त्री–पुरुषाने हें पुस्तक एकवार तरी अवश्य वाचावें.

**१४ जवाहरलाल नेहरू**—( आत्मचरित्र )

अनुवादक—श्री. ना. ग. गोरे, बी. ए. एल्‌एल्. बी.

या ग्रंथांत जवाहरलाल नेहरू यांनीं आपल्या जीवनांत बाळपणापासून कसें परिवर्तन होत गेलें याचें अतिशय जिव्हाळयानें वर्णन केलें आहे.

" ...मूळचें आत्मचरित्र इंग्रजींत असून त्याचें मराठी रूपांतर श्री. नारायण गणेश गोरे यांनीं केलें आहे. हें रूपांतर इतकें सफाईनें लिहिलें आहे कीं, जणूं काय त्याची रचना प्रथमपासून मराठींत झाली आहे असा भास होतो. "

—केसरी ता. २३।२।३७ मूल्य ५ रुपये.

***विश्राम**—ले.—साने गुरुजी. किं. १० आणे.

***१६ भारतीय संस्कृति**—ले. साने गुरुजी

भारतीय संस्कृति हा शब्द लाखों लोकांच्या तोंडीं असतो, परंतु भार-

तीय संस्कृतीची अल्पस्वल्प स्पष्ट कल्पना पुष्कळांना नसते. प्रस्तुत छोट्या पुस्तकांत सरळ सुंदर रीतीनें भारतीय संस्कृतीचा मोठेपणा दाखविण्यांत आलेला आहे. भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांनीं व भारताचीं भूतकालीन ध्येयें काय होतीं हें समजून घेऊं इच्छिणाऱ्यांनीं हें पुस्तक वाचल्याशिवाय राहूं नये. आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना समजेल अशा सोप्या हृदयंगम भाषेंत हें पुस्तक लिहिलेलें आहे. **मूल्य १॥ रुपया.** ( टपालखर्चासह एक रुपया दहा आणे. )

**१७ प्रसाद–दीक्षा**—

[ महात्माजींचीं एका आश्रमवासी सेविकेस आलेलीं पत्रें. ]

हीं पत्रें १९३० सालापासून १९३८ सालपर्यंतचीं आहेत. थोडक्यांत म्हटलें तर महात्माजींच्या आत्मचरित्राचा हा तिसरा भागच होय.

किं. १ रु.

**१८ भिल्ल साधु श्री गुला महाराज यांचें चरित्र**—

एका भिल्ल साधूनें एक लाख भिल्ल लोकांमध्यें दारूबंदी कशी केली याचा त्रोटक इतिहास. किं. ६ आ.

**१९ आधुनिक भारत**—ले. शंकर दत्तात्रय जावडेकर.

गेल्या सव्वाशें वर्षांचा आधुनिक भारताचा सर्वांगीण सांस्कृतिक राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक इतिहास; राजा राम मोहन राय, दादाभाई, प्रो. न्यायमूर्ति रानडे, आगरकर, लो. टिळक, म. गांधी व पं. जवाहिरलाल यांचेपर्यंत झालेल्या सर्व राष्ट्रनिर्मात्या विभूतींच्या विचारांची व कार्याची माहिती, स्वतंत्र व शास्त्रशुद्ध तात्विक विवेचन, या सर्व दृष्टींनीं अपूर्व असलेला ग्रंथ; राष्ट्रीय कार्यकर्त्यांना आजचें व उद्याचें कर्तव्य समजून घेण्यास अत्यंत उपयुक्त. किं. ४ रुपये.

साने गुरुजी यांचीं सर्व पुस्तकें आमचेकडे मिळतील.

**सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, ३७३ शनिवार, पुणें नं. २.**

---

* ही पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड सरकार विद्याखात्यांनीं शाळांकरितां मंजूर केलीं आहेत.